सोलापूर

# तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, २५ ऑक्टोबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २१२ | पाने : ८+४ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## जपानने महाराष्ट्राला मशरुम, आंबा उत्पादनात मदत करावी: राज्यपाल राधाकृष्णन



तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई,दि.२४ ऑक्टोबर:

जपान व भारत हे एकमेकांचे स्वाभाविक भागीदार असून जपानमधील मशरूम तसेच मियाझाकी' आंबा आकाराने मोठे, चवदार व उत्कृष्ट दर्जाचे असतात .जपानने राज्यातील शेतकऱ्यांना तसेच महिला बचत गटांना मशरुम व आंबा उत्पादनात मदत करावी ,अशी अपेक्षा राज्यपाल सी. पी.राधाकृष्णन यांनी गुरूवारी व्यक्त केली. जपानचे मुंबईतील वाणिज्यदूत यागी कोजी यांनी राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांची राजभवन मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी यागी म्हणाले,' उभय देशांचे संबंध आज सर्वोच्च पातळीवर आहेत. जपानचे महाराष्ट्राशी संबंध विशेष चांगले असून जपान महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठासोबत कौशल्य प्रशिक्षणासाठी सहकार्य करीत आहे.जपानने राज्यातील अटल सेतू, बुलेट ट्रेन, मेट्रो लाईन यांसह अनेक पायाभूत सुविधा प्रकल्पांना अर्थसहाय्य केले आहे असे सांगून सध्या जपान ५०० किमी प्रतितास चालणाऱ्या लिनिअर मोटार कार रेल्वेवर काम करीत असून महाराष्ट्रातील १४ उच्च शिक्षण संस्थांमध्ये जपानी भाषा शिकवली जात असल्याचे यागी कोजी यांनी यावेळी राज्यपालांना सांगितले. आपण कॉयर बोर्डचे अध्यक्ष असताना टोकियो व ओसाका येथे भेट दिली होती. या संदर्भात उभय देशातील कृषी विद्यापीठांमध्ये सहकार्य स्थापित व्हावे असे राज्यपाल यांनी सांगितले. जपानमधील प्रसिद्ध 'मियाझाकी' आंबा अतिशय चवदार असून त्याला जगभरात सर्वाधिक बाजारमूल्य मिळते असे सांगून सदर आंब्याची लागवड महाराष्ट्रात करण्यासाठी देखील जपानने राज्याला मदत करावी जेणेकरून त्याचा लाभ राज्यातील शेतकरी बांधवांना होईल.

# मुख्यमंत्र्यांच्या जिल्ह्यात बंडोबांना थंड करण्याचे महायुतीपुढे आव्हान

तभा वृत्तसेवा/ जमीर काझी

मुंबई , दि.२४ ऑक्टोबर:

ठाणे जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांची यादी महायुतीकडून जाहीर झाल्यापासून महायुतीमध्ये बंडाचे वारे वाहू लागले आहे. तर, महाविकास आघाडी आणि मनसेत तूर्तास तरी बंडखोरी होताना दिसून आलेली नाही. ठाणे शहर, कोपरी-पाचपखाडी, कल्याण पूर्व, कल्याण पश्चिम, मुरबाड आणि ऐरोली मतदारसंघामध्ये महायुतीकडून उमेदवारी न मिळाल्यामुळे नाराज झालेल्या इच्छुकांनी अपक्ष निवडणूक लढविण्याची तयारी सुरू केली आहे. यामुळे ठाणे जिल्ह्यात बंडोबांना थंड करण्याचे मोठे आव्हान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमोर उभे राहिले आहे. ४ नोव्हेंबर नंतर खरे चित्र स्पष्ट होणार आहे.

ठाणे जिल्ह्यात ऐरोली, बेलापूर, कोपरी-पाचपखाडी,ओवळा- माजीवडा, ठाणे शहर, मीरा-भाईंदर, भिवंडी ग्रामीण, भिवंडी पूर्व, भिवंडी पश्चिम, कल्याण ग्रामीण, डोंबिवली, कल्याण पूर्व, कल्याण पश्चिम, उल्हासनगर, अंबरनाथ, मुरबाड आणि शहापूर असे १८ विधानसभा मतदारसंघ आहेत.. या ठिकाणीं प्रामुख्याने महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा सामना रंगणार असून काही ठिकाणी मनसेने उमेदवार उभे केल्याने तिरंगी लढत होणार आहे. तीन दिवसांपूर्वी भाजपने पहिली यादी जाहीर करत ठाणे शहरमधून संजय केळकर, डोंबिवलिमधून रविंद्र चव्हाण, एरोलीमधून गणेश नाईक, भिवंडी पश्चिमेतून महेश चौगुले, मुरबाडमधून किसन कथोरे या विद्यमान आमदारांना उमेदवारी दिली. तर, कल्याण पूर्वेमध्ये आमदार गणपत गायकवाड यांच्या पत्नी सुलभा गायकवाड यांना उमेदवारी दिली. उल्हासनगरमध्ये भाजपने अद्याप उमेदवार जाहीर केलेला नाही. मात्र, ही यादी जाहीर होताच या मतदार संघामध्ये निवडणूक लढण्यासाठी इच्छुक असलेल्या शिंदे सेनेच्या काही पदाधिकारी नाराज झाले असून त्यांनी आता उमेदवारी अर्ज घेत अपक्ष निवडणूक लढण्याची तयारी सुरू केली आहे.

ठाणे शहरांमध्ये भाजप उमेदवार संजय केळकर यांच्याविरोधात शिंदे सेनेचे माजी नगरसेवक संजय भोईर, माजी महापौर मीनाक्षी शिंदे यांच्यासह भाजपचे माजी नगरसेवक मिलिंद पाटणकर यांनी अपक्ष निवडणूक लढण्याची तयारी सुरू केली आहे. कल्याण पूर्वमध्ये सुलभा गायकवाड यांच्याविरोधात शिंदेंच्या सेनेचे पदाधिकारी महेश गायकवाड अपक्ष निवडणूक लढण्याची तयारी सुरू केली आहे. मुरबाडमध्ये किसन कथोरे यांच्याविरोधात निवडणूक लढण्यासाठी शिंदेच्या सेनेतील सुभाष पवार यांनी पक्षाला रामराम ठोकत राष्ट्रवादी (शरद पवार गटात) प्रवेश करून उमेदवारी घेतली आहे. याच मतदारसंघात शिंदेच्या सेनेचे वामन म्हात्रे हेसुद्धा अपक्ष निवडणूक लढण्याची तयारी करत आहेत. एरोलीमध्ये भाजपचे गणेश नाईक यांच्याविरोधात शिंदेच्या सेनेचे पदाधिकारी विजय चौगुले हे अपक्ष निवडणूक लढण्याच्या तयारीत आहेत.

शिंदेच्या शिवसेनेने जाहीर केलेल्या पहिल्या यादीतील ४५ उमेदवारांमध्ये ठाणे जिल्ह्यातही कोपरी- पाचपखाडी, ओवळा-माजीवडा वगळता एकही उमेदवार जाहीर केलेला नाही. कोपरी-पाचपखाडीमधून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना तर, ओवळा-माजीवडामधून प्रताप सरनाईक यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. ठाणे शहरात शिंदेच्या सेनेतील इच्छुकांनी बंडखोरी करण्याची तयारी सुरू केल्यामुळे भाजपचे माजी नगरसेवक भरत चव्हाण यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्याविरोधात निवडणूक लढण्याचा इशारा दिला आहे. या बंडखोरांमुळे महायुतीच्या नेत्यांची डोकेदुखी वाढली असून या बंडोबांना थंड करण्याचे मोठे आव्हान महायुतीपुढे आहे.

## भिवंडी ग्रामीण विधानसभा मतदारसंघात भाजपा नेत्याची बंडखोरी ; शक्ती प्रदर्शन करीत भरला अर्ज

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.२४ ऑक्टोबर :

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांच्या नावाची घोषणा पक्षाकडून होत होत असताना नाराजना शांत करण्यात पक्ष नेतृत्वाला मोठे प्रयत्न करावे लागत आहेत. त्यातुन बंडखोरीही होत असून महायुतीत भिंवडी ग्रामीण विधानसभा मतदार संघातून भाजपच्या स्नेहा पाटील यांनी बंडखोरी केली आहे. स्नेहा पाटील या माजी केंद्रीय मंत्री कपील पाटील यांच्या समर्थक म्हणून ओळखल्या जातात. हा मतदार संघ महायुतीत शिवसेना शिंदे गटाच्या वाट्याला जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे पाटील यांनी आपला उमेदवारी अर्ज गुरूवारी दखल केला. विद्यमान आमदार शांताराम मोरे हे शिंदे गटात आहेत. त्यामुळे भिवंडी ग्रामीण विधानसभा मतदारसंघात महायुतीमध्ये बिघाडी झाल्याचे चित्र आहे. भाजपकडून स्नेहा पाटील यांनी बंडखोरी केली आहे. स्नेहा या भाजप युवती मोर्चाच्या तालुकाध्यक्ष आहेत. शिवाय त्या काल्हेर ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच देखील आहेत. स्नेहा या माजी मंत्री कपील पाटील यांच्या खंद्या समर्थक म्हणून ओळखल्या जातात. स्नेहा देवेंद्र पाटील यांनी जोरदार शक्ती प्रदर्शन गुरुवारी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. यावेळी संपूर्ण भिवंडी तालुका ग्रामीण मधील माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील समर्थक भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते मोठा संख्येने सहभागी झाले होते.

या मतदार संघात शिवसेना शिंदे गटाचे शांताराम मोरे हे आमदार आहेत. त्यांनी भिवंडी ग्रामीणचे दहा वर्ष आमदारपद भूषवले आहे. शिवसेनेतील बंडाळीनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना त्यांनी साथ दिली होती. मात्र शिवसेना शिंदे गटाने जाहीर केलेल्या पहिल्या यादीत त्यांना स्थान देण्यात आले नाही. त्याच वेळी भाजपाच्या युवती मोर्चाच्या तालुकाध्यक्ष असलेल्या स्नेहा देवेंद्र पाटील यांनी गुरुवारी जोरदार शक्तिप्रदर्शन करीत उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

यावेळी त्यांच्या सोबत तालुक्यातील भाजपाचे जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्य, सरपंच आणि भाजपा पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामुळे भिवंडी ग्रामीण विधानसभा मतदार संघात महायुतीमध्ये बंडखोरी आता अटळ झाली आहे असे समजले जाते.



नगर : नगर शहर विधानसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार विद्यमान आमदार संग्राम जगताप यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिर येथे दर्शन घेऊन आरती केली (फोटो – राजु खरपुडे, नगर)

## वैजापुर तालुक्यातुन ए.के.जाधव यांचा अर्ज दाखल महायुतीला खिंडार

वैजापूर प्रतिनिधी : वैजापूर विधानसभा मतदारसंघातुन (११२) गुरुवारी (२४ ऑक्टोबर) भारतीय जनता पक्षाच्या राज्य कार्यकारिणीचे सदस्य एकनाथ जाधव यांनी अपक्ष म्हणुन आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. एकनाथ जाधव हे भाजपच्या राज्य कार्यकारिणीचे सदस्य आहेत. वैजापूर विधानसभा मतदारसंघाची जागा भाजप प्रणित महायुतीतील शिवसेना या घटक पक्षाला सुटली असुन महायुतीतर्फे विद्यमान आमदार रमेश पाटील बोरनारे (शिवसेना) यांना ही उमेदवारी जाहीर झाली आहे. असे असतांना भाजपचे एकनाथ जाधव यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज गुरुवारी निवडणुक निर्णय अधिकारी डॉ. अरुण जहाड व सहायक निवडणुक निर्णय अधिकारी सुनील सावंत यांच्याकडे दाखल केला. हा अर्ज निवडणुक रिंगणात कायम राहिल्यास महायुतीमध्ये तडे जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. एकनाथ जाधव हे मागील अनेक वर्षांपासुन भारतीय जनता पक्षात कार्यरत असुन त्यांनी यापुर्वी २०१४ मध्ये भारतीय जनता पक्षाच्या तिकिटावर निवडणुक लढवुन जवळपास २५ हजार मते मिळवली होती. त्यामुळे या मतदारसंघात अजुनही भाजपचा निश्चित असा मतदार असुन महायुतीमध्ये बंडखोरी झाल्यास मतविभाजन अटळ आहे असे बोलले जात आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर भाजपचे एकनाथ जाधव यांनी मागील काही महिन्यापासुन विधानसभा मतदारसंघात संवाद यात्रेच्या माध्यमातुन मतदारांशी संवाद साधण्यास सुरुवात केली आहे. त्यांनी वैजापूर विधानसभा मतदार संघात प्रलंबित असलेल्या विकास कामांवर लक्ष केंद्रीत केले आहे.




वैजापुरातुन ३५ जणांनी खरेदी केले ७० अर्ज

दरम्यान, वैजापूर विधानसभा मतदार संघातुन तीन दिवसांत (गुरुवार अखेर) ३५ इच्छुक उमेदवारांनी ७० अर्ज खरेदी केले. यात डॉ. दिनेश परदेशी, शिल्पा परदेशी, नबी पटेल, मंजाहरी गाढे, ज्ञानेश्वर घोडके, बाबासाहेब पगारे, माजी खासदार इम्तियाज जलील आदी उमेदवारांनी उमेदवारी अर्ज खरेदी केले आहेत.

## प्रचाराचे व्हिडिओ बनविताना उमेदवारांनी धार्मिक स्थळांचा, चिन्हांचा, वापर करू नये

### जाहिरात,व्हीडीओ बनवतांना घ्या काळजी

तभा वृत्तसेवा

नांदेड,दि. २४ ऑक्टोबर

निवडणुकांमध्ये प्रचारासाठी हल्ली उमेदवाराच्या कार्यकर्तृत्वाचा अहवाल देणारा व्हिडिओ तयार करण्याची सर्वमान्य प्रक्रीया आहे. मात्र ही प्रक्रिया किचकट असते. त्याला वेळ लागतो. त्यामुळे हा व्हिडिओ बनवतानाच भारत निवडणूक आयोगाने केलेल्या सूचनांचे पालन केल्यास याची मान्यता तातडीने मिळण्यास मदत होईल, त्यामुळे आयोगाला अमान्य असणाऱ्या गोष्टी टाळण्याच्या आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

उमेदवारांसाठी तयार करण्यात येणाऱ्या प्रिंट माध्यमांसाठीच्या जाहिराती, प्रचार रथांवरील व्हीडीओ ,समाज माध्यमांसाठी रिळ, रेडिओ सार्वजनिक तसेच खाजगी एफएम चॅनल बलके एसएमएस रेकॉर्ड केलेले व्हॉइस मेसेजेस सोशल मीडिया इंटरनेट संकेतस्थळे यावर द्यावयाच्या जाहिराती यामध्ये हे व्हिडिओ व रीळ प्रामुख्याने वापरले जातात.

निवडणुकीच्या उमेदवारांचे हे सर्व व्हिडिओ माध्यम प्रमाणिकरण व सनियंत्रण कक्षाकडून मान्यताप्राप्त असणे आवश्यक आहे. त्यामुळे मान्यतेला देण्यापूर्वीच या व्हिडिओमध्ये काय असावे व काय असू नये हे जाणून घेणे आवश्यक आहे. वृत्तपत्रांच्या अर्थात प्रिंट मीडियाच्या जाहिराती संदर्भात शेवटचे दोन दिवस परवानगी घेणे आवश्यक आहे. व्हिडिओमध्ये अभिरुचीहीन किंवा सभ्यतेविरुद्ध प्रसारण, मित्र देशांवर टीका,धार्मिक किंवा जातीय तेढ निर्माण करणारे दृश्य, किंवा शब्दांचा समावेश असलेले चित्रण,अश्लील, बदनामीकारक,जाणीवपूर्वक, चुकीचे किंवा अर्धसत्य माहिती, प्रसारण, हिंसेला प्रोत्साहन, कायदा व सुव्यवस्थेला बाधा आणणारे किंवा राष्ट्रविरोधी व्यक्तींना उत्तेजन देणारे चित्र, न्यायालयाचा अवमान, राष्ट्रपती आणि न्यायपालिकेच्या सचोटीविरुद्ध आक्षेप व्यक्त करणारे प्रसारण,राष्ट्रीय ऐक्यास बाधा आणणारे प्रसारण,नैतिक जीवन मलीन करणारी टीका,अंधश्रद्धा किंवा भोंदूगिरीस खतपाणी घालणारे चित्रण, महिलांचे विकृतीकरण दर्शवणारे चित्रण, बालसंहितेविरुद्ध प्रसारण, विशिष्ट भाषिक आणि प्रादेशिक घटकांच्या संदर्भात उपरोधिक आणि निंदनीय वृत्ती दर्शविणारे दृश्य किंवा शब्द असणारे प्रसारण या शिवाय सीनेमेट्रोग्राफ कायदा १९५२ च्या तरतुदीचे उल्लंघन करणारे प्रसारण दाखवण्यात येऊ नये. पुढील प्रकारच्या जाहिरातीस प्रतिबंध आहे. कोणत्याही वंश, जात, वर्ण, पंथ, आणि राष्ट्रीयत्वाचा उपहास करणे, भारतीय राज्यघटनेचा अवमान करणे, गुन्हा करण्यास प्रवृत्त करणे, हिंसाचार करणे किंवा कायद्याचे उल्लंघन करणे किंवा अश्लील त्याचे उदातीकरण करणे, गुन्हेगारी योग्य असल्याचे सादर करणे, राज्यमुद्रा किंवा राज्यघटनेच्या कोणत्याही भागाची किंवा राष्ट्रीय नेत्याचे किंवा राज्याच्या व्यक्तीचे किंवा व्यक्तिमत्त्वाच्या स्वतःच्या फायद्यासाठी वापर करणे, स्त्रियांचे चुकीचे चित्रण करणे, विशेषतः महिलांची बदनामी करणाऱ्या कोणत्याही दृष्याला परवानगी दिली जाणार नाही. सिगारेट तंबाखूजन्य किंवा नशा आणणाऱ्या पदार्थांच्या जाहिरातींना प्रतिबंध करण्यात आला आहे.

## नगर शहर विधानसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार आ संग्राम जगताप यांचा अर्ज दाखल

### शहर विकासाच्या मुद्द्यावर निवडणूक लढवणार : आ. संग्राम जगताप



अ.नगर : शहर विधानसभा मतदारसंघातून महायुतीच्या वतीने आमदार संग्राम जगताप यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी माजी महापौर बाबासाहेब वाकळे, माजी उपमहापौर गणेश भोसले, शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष अनिल शिंदे, राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, भाजपाचे समन्वयक महेंद्र भैय्या गंधे, सचिन जाधव, किशोर डागवाले, अविनाश घुले, प्राध्यापक माणिकराव विधाते, संजय चोपडा, रवींद्र बारस्कर, अमोल गाडे, प्रा. अरविंद शिंदे, संजय ढोणे, सतीश शिंदे, अजय चितळे, उदय कराळे, नरेंद्र कुलकर्णी, अभिजीत खोसे, वैभव ढाकणे, ज्ञानेश्वर काळे, अमित गटणे, मनोज ताठे, अजिंक्य बोरकर, सुमित कुलकर्णी आदी उपस्थित होते.

यावेळी महायुतीचे उमेदवार संग्राम जगताप म्हणाले की, विधानसभेची निवडणूक ही विकासाच्या कामावर लढवली जात असून सर्वांना बरोबर घेऊन जनतेचे आशीर्वाद घेतले जातील, निवडणूक लढवीत असताना गेल्या दहा वर्षांमध्ये केलेली विकास कामे जनतेपर्यंत घेऊन जाण्याचे काम केले आहे, आपल्या शहरा बद्दल सकारात्मक दृष्टिकोन ठेवून विकासाच्या योजना राबवत आहे. जनतेच्या मतरुपी आशीर्वादामुळे माझा विजय निश्चित असून पुढील ५ वर्षात विकास कामातून शहराचा कायापालट करेल असे ते म्हणाले

## निर्भय, निष्पक्ष निवडणुकासाठी सतर्क रहा -जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

छत्रपती संभाजीनगर, दि.२४(जिमाका):- विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा सुव्यवस्था राखून निवडणूक प्रक्रिया निर्भय व निष्पक्ष वातावरणात होण्यासाठी सतर्क रहा, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनीआज दिले. कायदा सुव्यवस्थेच्या अनुषंगाने नियोजन सभागृहात आयोजित आढावा बैठकीस पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस अधीक्षक विनयकुमार राठोड, अप्पर पोलीस अधीक्षक सुनील लांजेवार ,पोलीस उपायुक्त प्रशांत स्वामी, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर ,निवडणूक निर्णय अधिकारी चेतन गिरासे, ब्रिजेश पाटील, व्यंकट राठोड, यांच्यासह जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशनचे पदाधिकारी सर्व मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी दूरदृश्यप्रणालीद्वारे या बैठकीस उपस्थित होते. जिल्ह्यामध्ये कायदा सुव्यवस्थेच्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहेत. या आदेशाचे तसेच लोकप्रतिनिधित्व कायदा १९५१ कलम (१२७ क ) भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ कलम १६३ या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करून संभाव्य उपद्रव वेळीच रोखावे.नामनिर्देशन प्रक्रिया, विविध सभा, प्रचार सभा, मतदान, मतमोजणी या सर्व टप्प्यावर पोलीस बंदोबस्ताचे योग्य नियोजन करावे. पोलीस विभागाने व संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने समन्वयाने हे नियोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले. समाज माध्यमावर अधिक लक्ष ठेवून पोस्ट किंवा मेसेज तसेच प्रसिद्धी माध्यमातून येणाऱ्या बातमीची दखल घ्यावी व तेढ निर्माण करणारे, बनावट, खोटी माहिती देणाऱ्या आशय, मजकूराबाबत योग्य ती कार्यवाही करावी, असेही जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले.

# बंदाघाटवर तीन दिवस रंगणार दिवाळी पहाट!

तभा वृत्तसेवा

नांदेड,दि. २३ ऑक्टोबर

एखादा संगीत महोत्सव, एखाद्या शहराची ओळख व्हावी व त्या ओळखीने एक तपपूर्ती करावी, असा दुग्धशर्करा योग यंदा नांदेडच्या संगीत प्रेमींना दिवाळी पहाटमुळे लाभणार आहे. गीत,गझल, ख्याल व बंदीशी, ठुमरी, दादरा, सुगम संगीत आणि लोकसंगीत यांनी दिवाळीच्या शुभेच्छांची सूरमयी पहाट अर्थात दिवाळी पहाट दिनांक ३१ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर या कालावधीत, बंदाघाट येथे गोदावरीच्या रम्य काठावर संपन्न होणार आहे.

नांदेड जिल्ह्याच्या सांस्कृतिक महोत्सवांच्या परंपरेतील, रसिकांनी डोक्यावर घेतलेला उत्सव म्हणजे दिवाळी पहाट! गेली ११ वर्षांची अखंड परंपरा लाभलेला दिवाळी पहाट हा कार्यक्रम यावर्षी १२ वे वर्ष तपपुर्तीने साजरे करीत आहे, हे या महोत्सवाचे खास आकर्षण असणार आहे. शास्त्रीय संगीतासह, नाट्यगीत, सुगम संगीत, सिने संगीतांची मेजवानी नांदेडकरांना देण्याचा प्रयत्न जिल्हा प्रशासन, गुरुव्दारा सचखंड बोर्ड, नांदेड शहर मनपा, नांदेड व नागरी सांस्कृतिक समिती यांच्या वतीने साजरा होत आहे.

यापूर्वी या कार्यक्रमात गायक पं.राहुल देशपांडे, पं.निनाद आजगांवकर, पं.राजा काळे, श्वेता देशपांडे, धनश्री देव-देशपांडे, पं.नंदेश उमप, शास्त्रीय नृत्यंगणा भार्गवी विकास देशमुख, पं.ब्रजेश्वर मुखर्जी, पं.ईश्वर घोरपडे, मेघा गायकवाड, डॉ. कल्याणी जोशी, धनंजय जोशी, सौ.आसावरी जोशी बोधनकर या नामांकित कलाकारांनी हजेरी लावली आहे.

यावर्षीच्या दिवाळी पहाट कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण भीमराव पांचाळे यांच्या गजल गायनाच्या कार्यक्रमांसह रागी किर्तनाची परंपरा जगभर प्रसार करणारे पटीयाला घरण्याचे गायक सतनिंन्दर सिंघ बोडल यांच्यासह अनुजा वर्तक व संच असणार आहे. पंडित रशीदखां यांचे पट्टशिष्य नागेश आडगांवकर यांच्या सुरेल मैफलीचा आस्वाद घेता येणार आहे. जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी दिवाळी पहाट आयोजनाच्या वेळोवेळी बैठका घेऊन, निर्देश दिले आहेत. त्यास प्रतिसाद देत नियोजन समितीने पुढील प्रमाणे कार्यक्रम आयोजित केले आहेत.

यावर्षीच्या दिवाळी पहाटचा प्रारंभ दिनांक ३१ ऑक्टोबर रोजी पहाटे ५ वाजता सचखंड गुरुव्दारा नांदेड येथील रागी यांच्या शबद किर्तनाने होईल. त्यानंतर पहाटे ५.३० वाजता मुंबई येथील टीव्हीस्टार व सुप्रसिध्द गायिका अनुजा वर्तक तसेच सूर नवा ध्यास नवा या कार्यक्रमाची गायिका सई जोशी व मुंबई आयडाल मितांशू सावंत यांचा कार्यक्रम सादर होणार असून त्याचे निवेदन प्रसिद्ध मानसोपचार तज्ञ डॉ.नंदकुमार मुलमुले हे करणार आहेत. दि.३१ ऑक्टोबर च्या सायंकाळी सांज दिवाळीमध्ये पटीयाला येथील शाम चौरसीया घराण्याचे ख्यातीप्राप्त गायक सतनिंन्दर सिंघ बोडल यांच्या गुरुगोबिंद दा दरबार या कार्यक्रमाचे सादरीकरण होणार आहे. या कार्यक्रमाचे निवेदन गझलकार बापू दासरी हे करणार आहेत. दिनांक १ नोव्हेंबर रोजी शुक्रवारी पहाटे परंपरेप्रमाणे स्वंयवर प्रतिष्ठान नांदेड प्रस्तुत शास्त्रीय संगीतावर आधारीत स्वर सरीता या मैफिलीने होणार आहे. यात पंडित रशीदखां यांचे पट्टशिष्य नागेश आडगांवकर यांचे गायन होईल. या मैफिलीचे निवेदन कवी देवीदास फुलारी हे करणार आहेत. यादिवशी लक्ष्मीपूजन असल्या कारणाने यावर्षी देखील सायंकाळी कोणतेही सादरीकरण होणार नाही. दि.२ नोव्हेंबर शनिवारी रोजी दिवाळी पाडवा पहाट या कार्यक्रमात नांदेड येथील स्थानिक कलावंताचा नियोजीत कार्यक्रम 'ह्रदयसंगम'चे आयोजन पत्रकार विजय जोशी यांच्या प्रस्तुतीने होणार आहे. या कार्यक्रमाची संकल्पना व निवेदन अ‍ॅड.गजानन पिंपरखेडे यांची असून, संगीत दिग्दर्शन डॉ. प्रमोद देशपांडे यांचे आहे. गायिका शर्वरी डोंगरे, विजय जोशी, चैती दिक्षित, अपूर्वा कुलकर्णी, शुभम कांबळे, नामदेव इंगळे, समिक्षा चंद्रमोरे यांचे सादरीकरण असणार आहे. या कार्यक्रमाची थीम प्रसिध्द संगीतकार व गायक पं.ह्रदयनाथ मंगेशकर यांच्या रचनांवर आधारीत आहे.

व्यवस्थापन सहाय्य पत्रकार विजय बंडेवार यांचे आहे. दि.२ नोव्हेंबर २०२४ रोजी सायंकाळी गजल नवाज भीमराव पांचाळे यांच्या सुश्राव्य गझलमैफिलीने होणार आहे. निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर हे करणार आहेत.

आचारसंहितेच्या काळात होणाऱ्या या कार्यक्रमामध्ये स्विप उपक्रमांतर्गत श्रोत्यांना मोठ्या संख्येने मतदान करण्याबाबत प्रत्येक कार्यक्रमांमधून आवाहन केले जाणार आहे. नागरिकांनी दिवाळी सणानिमित्त आयोजीत दिवाळी पहाट या त्रिदिवसीय महोत्सवास दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी भरघोस प्रतिसाद द्यावा व आयोजित कार्यक्रमांचा मनमुराद आनंद लुटावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या व संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## खर्च निरीक्षकांनी घेतला अकोले मतदारसंघातील खर्च विषयक कामकाजाचा आढावा



अ.नगर दि. २४ :- भारत निवडणूक आयोगामार्फत अकोले विधानसभा मतदारसंघासाठी नियुक्त निवडणूक खर्च निरीक्षक देबशीष बिस्वास (आय.आर.एस) यांनी अकोले विधानसभा मतदारसंघातील निवडणूक खर्च विषयक कामकाजाचा आढावा घेतला. निवडणूक निर्णय अधिकारी अनुपसिंह यादव यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सिद्धार्थ मोरे व खर्च पथकातील इतर अधिकारी उपस्थित होते.

बिस्वास यांनी सर्व समन्वयक अधिकारी व खर्च व्यवस्थापनासंदर्भात उपस्थित इतर अधिकारी-कर्मचाऱ्यांना निवडणूक खर्च व्यवस्थापन वेळीच आणि योग्यप्रकारे करण्याच्या सूचना दिल्या. त्यांनी तसेच विधानसभा क्षेत्रनिहाय संवेदनशील भागाविषयी माहिती जाणून घेतली.

निवडणूकीत उमेदवारी दाखल करणाऱ्या सर्व उमेदवारांच्या खर्चावर नोडल अधिकारी तसेच सहाय्यक खर्च निरीक्षकांनी लक्ष ठेवून दैनंदिन अहवाल विहीत वेळेत सादर करावेत. निवडणुकीसाठी उमेदवारांच्या खर्चाचे मूल्यमापन करण्यासाठी दर निश्चित करण्यात आले असून त्यानुसार उमेदवारांचा खर्च निश्चित करावा,अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

खर्च निरीक्षकांचा मुक्काम संगमनेर येथे

देबशीष बिस्वास (आय.आर.एस) यांचा मुक्काम शासकीय विश्रामगृह संगमनेर येथे असणार आहे. त्यांच्याशी ८९०२१९९९०० या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधता येणार आहे. त्यांचे संपर्क अधिकारी म्हणून अपर प्रवरा सब डिव्हीजनचे सहायक अभियंता प्रमोद माने यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक ८६५७५७७७७७, ८९७५२२४८१९ असा आहे, असे निवडणूक शाखेमार्फत कळविण्यात आले आहे. खर्च निरीक्षक यांच्याशी निवडणूकविषयक प्रश्नाबाबत भेटीची वेळ ही सकाळी ११.०० ते १२.०० दरम्यानची निश्चित केली असून खर्च निरीक्षक यावेळेत अकोले तहसील कार्यालय (नवीन इमारत) येथे उपस्थित असतीलअसे निवडणूक निर्णय अधिकारी श्री. यादव यांनी कळविले आहे.

## नाशिकमध्ये २ लाचखोर पोलिस एसीबीच्या जाळ्यात

नाशिक, २४ ऑक्टोबर : दोन हजार रुपयांची लाच स्वीकारताना सातपूर पोलीस ठाण्यातील दोन पोलीस कर्मचाऱ्याना रंगेहाथ पकडण्यात आले. धनराज सोनु गावित वय-५७ पद- सहाय्यक पोलीस उपनिरिक्षक वर्ग -३ आणि पोलीस हवालदार कांतीलाल रघुनाथ गायकवाड दोन्ही नेमणुक सातपुर पोलीस स्टेशन नाशिक अशी या लाचखोरांची नावे आहे- यातील तक्रारदार यांचे सुमारे ६ वर्षांपूर्वी सातपुर येथील सम्राट बिल्डर यांचे कडे अपना घर स्कीम नं १ आनंदवल्ली शिवार नाशिक येथे रुपये २३,५०,०००/-मध्ये २ इक्ष्म फ्लॅट बुक केले होते .व त्यासाठी सम्राट बिल्डर चे डायरेक्टर श्रीमती श्वेता गुप्ता यांचे बँक अकाउंटवर २१०००/- रु चेक द्वारे दिले होते .पैसे देऊन ६ वर्षांचा कालावधी झाला तरी सुद्धा यातील तक्रारदार यांना फ्लॅटचे कागदपत्र किंवा ऍडव्हान्स म्हणुन दिलेले २१०००/- परत न दिल्याने तक्रारदार यांनी सातपुर पोलीस स्टेशन येथे तक्रारी अर्ज दिला होता.

# एमजीएममध्ये 'उत्तम आरोग्यासाठी' पुस्तकाचे प्रकाशन संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि.२४ : 'उत्तम आरोग्यासाठी' या शकुंतला देसरडा यांच्या पुस्तकाचे प्रकाशन आज एमजीएम विद्यापीठाच्या बोर्ड रूम येथे मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. यावेळी, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, अर्थतज्ञ प्रा.एच. एम. देसरडा, श्रीमती शशिकला बोराडे, अधिष्ठाता डॉ. रेखा शेळके व सर्व संबंधित उपस्थित होते.

यावेळी बोलताना कुलपती अंकुशराव कदम म्हणाले, लेखिका शकुंतला देसरडा यांच्या मार्गदर्शनाखाली शेतीमध्ये विविध प्रयोग सुरू असून गांडूळ शेतीसह नैसर्गिक शेतीमध्ये त्यांनी महत्वपूर्ण काम केलेले आहे. 'उत्तम आरोग्यासाठी' या पुस्तकात लेखिकेने अत्यंत पोटतिडकीने लिहिले आहे. विद्यार्थी आणि आपण सरावांनी यात लिहिलेल्या गोष्टी पाळणे ही काळाची गरज आहे.



समकालीन काळामध्ये आपल्या सर्वांची जीवनशैली बदलत चालली असून आपल्या निरोगी आणि उत्तम आरोग्यासाठी लेखिका देसरडा यांनी लिहिलेले 'उत्तम आरोग्यासाठी' हे पुस्तक अनुकरणीय आहे. यामध्ये खूप छोट्या - छोट्या मात्र अत्यंत प्रभावशाली बाबी लेखिकेने अभ्यासपूर्ण आणि प्रयोगाने मांडल्या असल्याचे श्रीमती शशिकला बोराडे यांनी यावेळी सांगितले.

कुलगुरू डॉ.विलास सपकाळ यावेळी बोलताना म्हणाले, आपले स्वयंपाकघर ही एक प्रयोगशाळा असून निसर्गाने आपल्या सर्वांना भरभरून दिले आहे. या पुस्तकात बहुविद्याशाखीय आणि आंतरविद्याशाखीय ज्ञान उपलब्ध करून देण्यात आले आहे. आपल्या जीवनात या नमूद गोष्टी कशा आणता येतील याचा विचार सर्वांनी करणे आवश्यक आहे. हे पुस्तक वाचल्यास आपल्याला लक्षात येते की, या पुस्तकाचा संशोधनासाठी एक संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोग होऊ शकतो.

आरोग्य चांगले राहण्यासाठी आपण व्यायाम करणे आवश्यक आहे. श्रमाशिवाय जगणे म्हणजे पंखाविना पक्षी असे जगणे असते. 'उत्तम आरोग्यासाठी' या पुस्तकाची मांडणी चांगली झाली आहे. या पुस्तकात दिलेले काही आरोग्यदायी विचार आपल्या जीवनात वास्तवामध्ये आणणे गरजेचे आहे. आपण कोणती आसने करावीत, नाभी चिकित्सा, सांधे दुःखी, बाजरी सँडविच अशा असंख्य बाबी यामध्ये नमूद करण्यात आल्या असल्याचे अधिष्ठाता डॉ. रेखा शेळके यांनी यावेळी सांगितले.

लेखिका शकुंतला देसरडा यावेळी बोलताना म्हणाल्या, भारत हा युवकांचा देश असून तरुण सध्या अस्वस्थ आहेत. मी पहिल्यांदा वर्धा आश्रमात गेल्यानंतर महात्मा गांधी यांनी केलेल्या प्रयोगातून खूप गोष्टी शिकले. तेथील प्रत्येक गोष्टींचे बारीक निरीक्षण करीत असे प्रयोग आपणही करू शकतो, ही प्रेरणा तिथे मिळाली. फास्टफुड मुळे आजच्या पिढीचे आरोग्य धोक्यात आले आहे. सर्वांनी सात्विक आहार घेणे काळाची गरज आहे. कड्धाण्य दररोजच्या जेवणात असणे आवश्यक असून अवेळी जेवण करणे उत्तम आरोग्यासाठी धोकादायक आहे.

साध्या सोप्या शब्दात माहिती सांगितलेली आहे. सर्व आजारांवर असलेला उपचार आणि प्रेग्नसीमध्ये काय करायला हवे आणि काय करायला नको याबद्दल या पुस्तकात सविस्तरपणे विवेचन करण्यात आले आहे. प्रत्येक अवयवांची माहिती अत्यंत चांगल्याप्रकारे दिली असून सर्व विद्यार्थ्यांनी हे पुस्तक वाचावे अशी विनंती मी करते असे डॉ.मुंडे यांनी यावेळी सांगितले.

आरोग्य आणि शिक्षण यावर सर्वांनी काम करणे आवश्यक आहे. लेखिकेने अत्यंत मेहनतीने या पुस्तकाची निर्मिती केली असून विद्यार्थ्यांनी या पुस्तकाचे वाचन करावे. माणुसकीच्या वाटेवरून चालत सर्वांना उत्तम आणि निरोगी आरोग्य लाभावे या सदिच्छेसह सर्वजण हे पुस्तक वाचून यातील गोष्टींचे अनुकरण करतील हा विश्वास अर्थतज्ञ प्रा.एच. एम. देसरडा यांनी यावेळी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. मारोती गायकवाड यांनी केले तर आभार प्रदर्शन ॲड संगीता तोडरवाल यांनी केले.

'उत्तम आरोग्यासाठी' पुस्तकाविषयी माहिती :

'उत्तम आरोग्यासाठी' हे पुस्तक शकुंतला देसरडा यांनी लिहिले असून यामध्ये एकूण २० प्रकरणे आहेत. यामध्ये सामाजिक विषमता दूर करण्यासाठी, लठ्ठपणा अनेक आजारास कारणीभूत, स्त्रियांच्या जीवशास्त्रीय तसेच सामाजिक समस्या, मुलांचा सर्वांगीण विकास, सुंदर दिसण्यासाठी, जीवनसत्वे आणि खनिज द्रव्ये अशा विविध प्रकरणांचा समावेश आहे. लेखिकेने आपल्या जीवनामध्ये स्वत: प्रयोग करीत असंख्य ग्रंथांचा अभ्यास करून या जीवनोपयोगी पुस्तकाची निर्मिती केलेली आहे.

# चालकास मारहाण प्रकरणी एक वर्ष कारावास

वैजापूर प्रतिनिधी

राज्य परिवहन महामंडळ गंगापूर आगाराच्या चालकास लाकडी दांड्याने जबर मारहाण करून डोके फोडून हात मोडणाऱ्या आरोपीस एक वर्ष सश्रम कारावास व वीस हजार रुपये दंडाची शिक्षा सहायक सत्र न्यायाधीश एल. जी. पाच्छे यांनी सुनावली. मनोज उर्फ सिराज रशीद शहा (२७) राहणार शितलनगर विटावा, ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर असे शिक्षा सुनावण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. केसरलाल कोंडीराम शेलार (५३) राहणर. तिसगाव, छत्रपती संभाजीनगर हे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ गंगापूर आगारात चालक म्हणून कार्यरत आहेत. २ एप्रिल २०२३ रोजी दुपारी दोन वाजता बस क्र. एमएच २० बीएल १०८७ ने गंगापूर येथून छत्रपती संभाजीनगर येथे जाण्यासाठी निघाले असतांना बस अंबेलोहळ मार्गे दुपारी चार वाजेचे सुमारास विटावा गावाचे जवळ आल्यावर विटावा गावाकडून खाजगी कंपनीची बस क्र. एमएच १४ सीडब्ल्यू ४४८३ आली म्हणून खाजगी बसला निघण्यासाठी रस्ता मिळावा म्हणून फिर्यादिने बस रस्त्याच्या बाजूला उभी केली. तेंव्हा कंपनीचा बस चालक घटनेतील आरोपी फिर्यादीस म्हणाला की, तुमची बस रस्त्याच्या खाली घ्या. तेंव्हा फिर्यादी त्यास म्हणाला की, बस रस्त्याच्या खाली घेत नाही या बाजूला ओढा आहे तुमची बस व्यवस्थित निघून जाईल असे म्हणून बसच्या खाली उतरले तेव्हा आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. तेंव्हा फिर्यादी आणि बसमधील प्रवाशांनी आरोपीस समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याने कोणाचेही न ऐकता त्याच्या हातातील लाकडी दांडा फिर्यादीच्या डोक्यात मारला त्यामुळे फिर्यादीचे डोक्यात जखम होऊन रक्त येऊ लागले. त्यानंतर आरोपी परत फिर्यादीचे डोक्यात दांडा मारण्याचा प्रयत्न करत असतांना फिर्यादीने त्याचा हात आडवा केला तेंव्हा तो दांडा फिर्यादीचे हातावर लागला. त्यानंतर बस मधील प्रवाशांनी फिर्यादीची आरोपीच्या तावडीतून सुटका केली. त्यानंतर फिर्यादीने जखमी अवस्थेतच बस स्वतः चालवत एमआयडीसी वाळूज पोलीस ठाणे येथे फिर्याद देणे कामी नेली. फिर्याद देण्यासाठी पोलीस ठाण्यात जात आरोपी गेटवरच उभा होता तेंव्हा त्याने पुन्हा फिर्यादीस शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. अशा आशयाच्या फिर्यादीवरुन पोलीस ठाणे येथे सरकारी कामात अडथळा केला आणि कर्तव्यावर असताना जबर मारहाण केली म्हणून म्हणून भा.दं.वि. कलम ३५३, ३३२,३३३ व ५०४ प्रमाणे आरोपी मनोज उर्फ सिराज रशीद शहा याचेवर गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तपासिक अंमलदार एस एन पागोटे यांनी प्रकरणाचा तपास करून न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले होते. सरकार पक्षातर्फे एकुण आठ साक्षीदार तपासण्यात आले होते. प्रकरणातील फिर्याद, साक्षीपुरावा आणि अतिरिक्त सरकारी अभियोक्ता श्री. जी. सी. मंझा यांनी केलेला मुद्देसुद युक्तीवाद ग्राह्य धरून आरोपीस कलम ३५३ प्रमाणे एक वर्ष साधा कारावास व दहा हजार रूपये दंड, कलम ३३२ प्रमाणे सहा महिने साधा कारावास व पाच हजार रुपये दंड, कलम ३३३ प्रमाणे सहा महिने साधा कारावास व पाच हजार रुपये दंड, दंडाची रक्कम न भरल्यास तीन महिने अतिरिक्त साधा कारावास अशी शिक्षा तसेच दंडाच्या रकमेतून दहा हजार रुपये फिर्यादीस देण्याचे आदेश सहायक सत्र न्यायाधीश श्री. एल. जी. पाच्छे साहेब यांनी दिले. सरकार पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता जी. सी. मंझा यांनी काम पाहिले. पैरवी म्हणून सहायक फौजदार श्री. दत्तात्रय गवळी यांनी सहाय्य केले. तर शिरस्तेदार म्हणुन महेश नाईक यांनी काम केले.

## निवडून आल्यावर चार वर्ष तोंड न दाखवणाऱ्यांना धडा शिकवणार

### वंचितचाच आमदार होणार प्रचार नियोजन बैठकीत सूर

वाळूज महानगर (प्रतिनिधी) : आज पर्यंत सत्ताधाऱ्यांनी पश्चिम मतदार संघातील मतदारांना आमिष दाखवून गाजर दाखवण्याचे काम केलेले आहे निवडून आल्यानंतर चार वर्ष मतदारांकडे पाठ फिरवणारे आणि निवडणुका जवळ आल्या की कामे उरकणाऱ्या सत्ताधाऱ्यांना आता पश्चिम मतदार संघातील मतदार चांगलाच ओळखून आहे त्यामुळे यापुढे त्यांची चलाकी आम्ही चालू देणार नाही असा निर्धार वंचित बहुजन आघाडीच्या प्रचार बैठकीत कार्यकर्त्यांनी केला. बजाज नगरातील गणपती मंदिरात काल दिनांक २२ ऑक्टोबर रोजी वंचित बहुजन आघाडीच्या प्रचार नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते या बैठकीत अनेक विषयावर चर्चा तर झालेच परंतु आज आज पर्यंतच्या प्रस्थापितांच्या राजकारणाने त्रस्त झालेल्या मतदारांनी आपले मन मोकळे केले यावेळी अनेकांनी अंजन साळवे हे गोरगरिबांचे कैवारी असून अर्ध्या रात्रीला मदतीला धावून येणारा कार्यकर्ता आहे त्यामुळे या कार्यकर्त्याला वंचित बहुजन आघाडीने पश्चिम मतदारसंघातून उमेदवारी देऊन एक प्रकारे आमच्यावर उपकारच केला आहे असे मत प्रत्येक कार्यकर्ता म्हणत होता. तर बैठकीला आलेल्या कार्यकर्त्यांचे आभार मानतांना अंजन साळवे यांनी ज्यावेळी नारेगाव येथील कचरा डेपो तिसगाव परिसरात येण्याचा घाट घालण्यात आला होता, त्या डेपोस आमदारांनी कोणताही विरोध न करता मुक समिती दिली होती, परंतु अंजन साळवे सारखा खंदा कार्यकर्ता या सर्व सत्ताधाऱ्यांना जाऊन भिडला, त्यावेळी मला अनेक अमिष दाखवून विकत घेण्याचा प्रयत्न करण्यात आला होता परंतु माझी जनसामान्याबरोबर नाळ जोडलेली असल्याने त्यांना भविष्यात होणारा त्रास दिसत होता म्हणून मी कोणत्याही आमिषाला बळी न पडता, विरोध करून येथून कचरा डेपो हटवायलाच लावला असे सांगत त्यावेळी केलेल्या जन उठावाची आठवण करून देत यावेळी मला साथ दिली तर मी वाळूज महानगरसह पश्चिम मतदारसंघाचे रुपडे पालटून दाखवेन असा विश्वास वंचित बहूजन आघाडीचे अधिकृत उमेदवार अंजन साळवे यांनी बोलून दाखवला. यावेळी जिल्हा कार्यकारीणीसह स्थानिक कार्यकर्त्यांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

# सभापती साहेबराव औताडे उबाठात दाखल



वैजापूर प्रतिनिधी

खरेदी विक्री संघाचे विद्यमान सभापती साहेबराव औताडे पाटील यांनी सहकार्यांसह शिवसेनेच्या शिंदे गटातुन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे (उबाठा) गटात विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे व माजी नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी, उपजिल्हा प्रमुख अविनाश गलांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी प्रवेश केला.रविवारी माजी नगराध्यक्ष डॉ दिनेश परदेशी यांच्या संपर्क कार्यालयात हा कार्यक्रम पार पडला.विधान परीषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या हस्ते सर्वांचा सत्कार करण्यात आला.

वैजापूर खरेदी विक्री संघाचे सभापती साहेबराव औताडे, माजी सभापती सूर्यभान जगताप, भगवान गायकवाड, वेणूनाथ इंगळे, दिगंबर चव्हाण, भास्कर अत्रे, योगेश मोरे, प्रवीण तुरकणे, हसन शेख, संभाजी तुरकणे, नवनाथ पडवळ, प्रशांत तुरकणे, त्र्यंबक तुरकणे, प्रसाद मोरे, साहिल सय्यद, संजय गोरसे, रवींद्र शेटे, राजू पडवळ, लक्ष्मण बाबुराव इंगळे, चांगदेव बनकर, अविनाश वाडगे, आदिंनी प्रवेश केला. याप्रसंगी डॉ दिनेश परदेशी,उपजिल्हाप्रमुख अविनाश गलांडे, तालुका प्रमुख सचिन वाणी,विधानसभा संघटक मनाजी मिसाळ,शहरप्रमुख प्रकाश चव्हाण,तालुका संघटक मनोज गायके, जितेंद्र जगदाळे, नंदू जाधव, युवासेना जिल्हा युवाधिकारी विठ्ठल डमाळे, प्रेम राजपूत, अक्षय साठे व ऋषिकेश राजपूत उपस्थित होते.

## शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात कार्यकर्त्यांचे मोठ्या संख्येने प्रवेश

वैजापूर प्रतिनिधी : वैजापूर-गंगापूर विधानसभा मतदारसंघातील मौजे मनेगाव येथील कार्यकर्त्यांनी माजीनगराध्यक्ष तथा जिल्हा बँकचे संचालक डॉ.दिनेश परदेशी व शिवसेना तालुकाप्रमुख सचिन वाणी यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात जाहीर प्रवेश केला.

माजी सरपंच साहेबराव साळुंके, माजी चेअरमन भाऊसाहेब पाटील पवार, ग्रामपंचायत सदस्य सिताराम नाना पवार, निवृत्ती पवार, माजी सरपंच दिनकर पवार, सोसायटी संचालक भास्कर बागुल, गोटीराम पवार, ज्येष्ठ शिवसैनिक कारभारी शिंदे, राजू जाधव, अशोक साळुंके, नाना पाटील पवार, नारायण पवार, साहेबराव गुंजाळ, रुस्तम बागुल, सुदाम पवार, भगवान पवार, भास्कर पवार, सुरेश साळुंके, चंद्रकांत साळुंके,रुस्तुम बागुल, संतोष गवारे, बाळासाहेब पवार, दीपक तुपे, गणपत पिंगळे, अशोक साळुंके, भाऊसाहेब पवार, संजय पवार, नवनाथ जाधव, ग्रामपंचायत सदस्य दादासाहेब जाधव, रामदास पवार, जनार्दन पवार,भारत पवार, रितेश कुलकर्णी, कृष्णा पवार,सदाशिव पवार,मोहन पवार,मिनीनाथ साळुंके, उमेश साळुंके,प्रवीण पवार, हरी साळुंके, अमोल पवार,पंकज साळुंके, रमेश पवार, दिगंबर पवार,दादासाहेब पवार, किशोर साळुंके, किशोर पवार, बाळासाहेब पिंगळे, रामकिसन पवार,कैलास वाघ, भागिनाथ पवार, प्रकाश सुरासे, उमेश पवार,साहेबराव बागुल, भगवान पवार,नाना पवार,सुखदेव पवार, अरुण पवार,कार्तिक जाधव यांचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश झाल्यानंतर स्वागत करण्यात आले.

## बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट व ईव्हीएम मशिन्सची प्रथम सरमिसळ पूर्ण

मुंबई, २४ ऑक्टोबर, - विधानसभा निवडणुकीसाठी पुरेशा संख्येने ईव्हीएम मशिन उपलब्ध आहे. सर्व बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट व ईव्हीएम मशिन्सची प्रथम सरमिसळ १८ ते २१ ऑक्टोबर, २०२४ या कालावधीत सर्व जिल्ह्यांकडून पूर्ण करण्यात आली असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत कळविण्यात आली आहे. महाराष्ट्र विधानसभा २०२४ च्या निवडणुकीच्या अनुषंगाने १ लाख १८६ इतक्या मतदान केंद्रासाठी २ लाख २१ हजार ६०० बॅलेट युनिट (२२१ % ) १ लाख २१ हजार ८८६ कंट्रोल युनिट (१२२%) व १ लाख ३२ हजार ९४ व्हीव्हीपॅट (१३२%) इतक्या प्रथमस्तरीय तपासणी मशिन्स उपलब्ध असून एकूण प्रथमस्तरीय करण्यात आलेल्या ईव्हीएम मशिन्स पैकी प्रशिक्षण व जनजागृतीच्या कार्यक्रमाकरिता त्यापैकी ५ हजार १६६ बॅलेट युनिट, ५ हजार १६६ कंट्रोल युनिट व ५ हजार १६५ व्हीव्हीपॅट इतक्या ईव्हीएम मशिन्सचा वापर करण्यात आला आहे.

**Format C-7**

(for political parties to publish in the newspapers, social media platforms & website of the party)

Information regarding individuals with pending criminal cases, who have been selected as candidates, along with the reasons for such selection, as also as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates.

(As per the Commission's directions issued in pursuance of the Order dated 13.02.2020 of the Hon'ble Supreme Court in contempt petition(C) no. 2192 of 2018 in WP(C) no. 536 of 2011)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**

***Name of the Election : Maharashtra Legislative Assembly-2024**

**Name of State/UT : Maharashtra**

**(1) Name of the Constituency : 102-Badnapur**

**Name of the candidate : NARAYAN TILAKCHAND KUCHE**

| Sl. No. | | | |
|---|---|---|---|
| 1 | Criminal antecedents | | |
| | a. | Nature of the offences | 143, 149, 447 IPC, 135 B.P.Act |
| | b. | Case no. | S.C No-262/2023 |
| | c. | Name of the Court | Distric & Sessions Court Jalna |
| | d. | Whether charges have been framed or not (Yes/No) | Yes |
| | e. | Date of conviction, if any | Not Applicable |
| | f. | Details of punishment undergone, if any | Not Applicable |
| | g. | Anyother information required to be given | Not Applicable |
| 2 | The reasons for the selection of the candidate. Selection shall be with reference to the qualifications, achievements and merit of the candidate, and not mere "winnability" at the polls (not more than 100 words) | | Candidate Narayan Tilakchand Kuche is Senior Legislator. He has very strong administrative capacity. Looking at his experience he has been chosen. |
| 3 | Reasons as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates (not more than 100 words) | | All other names who were, aspirants did not have any relevant experience in public life to holds such senior post. |

**(2) Name of the Constituency : 102-Badnapur**

**Name of the candidate : Narayan Tilakchand Kuche**.......................................................and so on

* In the case of election to Council of States or Election to Legislative Council by MLAs, mention the election concerned in place of name of Constituency.

Signature of office bearer of the Political Party

Name and designation...

**Chandrashekhar Bawankule**

**President,**

**Bharatiya Janata Party, Maharashtra**

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अनोळखी बेवारस मयत व्यक्तीबाबत आवाहन

अ.नगर : शहरातील सारडा कॉलेज गेट समोर अपघातात जखमी झालेल्या अनोळखी बेवारस व्यक्तीचा (वय ५५) उपचारादरम्यान मृत्यू झालेला आहे. या व्यक्तीच्या अंगात गुलाबी रंगाचा शर्ट असून उजव्या पायाला प्लास्टर आहे. चेहरा उभट, उंची ५ फूट ६ इंच असून ही व्यक्ती दिनांक १७ ऑक्टोबर रोजी मयत घोषित करण्यात आलेली आहे. या व्यक्तीबाबत किंवा वारसांबाबत कोणाला काहीही माहिती असल्यास तोफखाना पोलीस स्टेशनचे पो.हे. कॉ. व्ही.सी. गंगावणे - ९५५२५२१५८४ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात येत आहे.

## नवीन उत्पादने ऍमेझॉन ग्रेट इंडियन फेस्टिवल २०२४ मध्ये

मुंबई:ऍमेझॉन ग्रेट इंडियन फेस्टिवल २०२४ दरम्यान कारिगर, सहेली, लोकल शॉप्स आणि लॉन्चपॅड यासारख्या ऍमेझॉन च्या विक्रेता कार्यक्रमांचा भाग असलेल्या एसएमबीजद्वारे ९५०० पेक्षा जास्त नवीन उत्पादने सादर करण्यात येणार आहेत. अल्पिनो, फूल, आजोल, ताशा क्राफ्ट आणि इतर ब्रँड्स ऍमेझॉन डॉट इन वर त्यांची अद्वितीय उत्पादने सादर करणार आहेत आणि भारतातील १००% सेवा दिल्या जाणाऱ्या पिन कोड्समध्ये ग्राहकांपर्यंत पोहोचणार आहेत. ऍमेझॉन डॉट इन गृह, स्वयंपाकघर, किराणा, वस्त्रप्रावरणे आणि इतर श्रेणींतील १६ लाख विक्रेत्यांकडून करोडो उत्पादने उपलब्ध करून देते.ग्रेट इंडियन फेस्टिव्हल दरम्यान उत्पादनांच्या वाढलेल्या मागणीची अपेक्षा पूर्ण करण्यासाठी विक्रेत्यांना तयार करण्याकरता ऍमेझॉन ने विविध उपक्रम आणि उपाययोजना आणल्या आहेत.

## भव्य 'मेट्रो - फेस्टिव्ह गिफ्टिंग' विशेष

मुंबई : मेट्रो कॅश अँड कॅरी, भारतातील आघाडीच्या संघटित घाऊक विक्रेते आणि खाद्य विशेषज्ञ, भारतातील यशस्वी ऑपरेशन्सच्या २१ व्या वर्षाचे स्मरण करताना, २१ व्या सणाच्या भेटवस्तू ऑफरची 'मेट्रो - फेस्टिव्ह गिफ्टिंग' लहान आणि स्वतंत्र व्यवसायांसाठी मेट्रो भारतातील घाऊक दुकाने सुरुवात केली आहे-मेट्रो इंडियाचे ३ दशलक्षाहून अधिक लहान आणि स्वतंत्र व्यावसायिक ग्राहक १ ऑक्टोबरपासून अधिकृतपणे सुरू झालेल्या आणि ३ नोव्हेंबर २०२४ पर्यंत चालणाऱ्या ३५ दिवसांच्या उत्सवात विशेष सणाच्या भेटवस्तू ऑफरचा लाभ घेऊ शकतात. मेट्रो घाऊक दुकानांव्यतिरिक्त, विशेष भेटवस्तू ऑफर आणि डील मेट्रोच्या वेबसाइट वर ऍक्सेस केले जाऊ शकतात आणि मेट्रो घाऊक पवर देखील उपलब्ध केले गेले आहेत आहे.

## टाटा मोटर्सकडून 'कस्टमर केअर महोत्सव' लाँच

मुंबई : टाटा मोटर्स या भारतातील सर्वात मोठ्या व्यावसायिक वाहन उत्पादक कंपनीने व्यावसायिक वाहन ग्राहकांसाठी सर्वसमावेशक ग्राहक सहभाग उपक्रम 'कस्टमर केअर महोत्सव २०२४'च्या लाँचची घोषणा केली. हा उपक्रम २४ डिसेंबर २०२४ पर्यंत राबवण्यात येईल. हा अद्वितीय व मूल्यवर्धित उपक्रम देशभरातील २५०० हून अधिक अधिकृत सर्विस आऊटलेट्समध्ये आयोजित करण्यात येईल, जेथे ताफा मालक व ड्रायव्हर्स माहितीपूर्ण चर्चांसाठी एकत्र येतील. या महोत्सवाच्या माध्यमातून ग्राहक अनेक फायद्यांचा आनंद घेऊ शकतात, जसे प्रशिक्षित टेक्निशियन्सकडून करण्यात येणारे बारकाईने वेईकल चेक-अप्स आणि मूल्यवर्धित सेवा. तसेच, ड्रायव्हर्सना सुरक्षित व इंधन-कार्यक्षम ड्रायव्हिंग पद्धतींबाबत व्यापक प्रशिक्षण आणि कंपनीच्या संपूर्ण सेवा २.० उपक्रमांतर्गत सर्वोत्तम ऑफरिंग्ज मिळतील.

# एक पेड मॉ के नाम उपक्रम संपन्न



तभा वृत्तसेवा

कन्नड -दि.२४ ऑक्टोबर - पर्यटन संचालनालय प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर व भारतीय पर्यटन विभागा अंतर्गत राबवण्यात आलेल्या एक पेड मॉ के नाम या उपक्रमांमध्ये साने गुरूजी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी शाळेतील प्रांगणात तसेच सार्वजनिक ठिकाणी विविध प्रकारच्या ६० झाडांची लागवड करून हा उपक्रम राबवला. यामध्ये अनेक प्रकारच्या वनस्पतींची लागवड विद्यार्थ्यांनी केली. याद्वारे विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या वनस्पतींची ओळख झाली. त्याचबरोबर पर्यावरणाच्या रक्षणासाठी वनस्पतींचे जतन आणि संवर्धन करणे किती महत्त्वाचे आहे हे विद्यार्थ्यांना या उपक्रमातून समजले.

याप्रसंगी पर्यटन संचालनालय प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर उपसंचालक प्रभोदय मुळे, पर्यटन संचालनालय प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर सहाय्यक संचालक विजय जाधव व भारतीय पर्यटन मंडळाच्या सहाय्यक संचालिका श्रीमती मालती दत्ता मुख्याध्यापक धैर्यशील केरे, नितीन पाटील तसेच पर्यटन संचनालय प्रादेशिक कार्यालयांचे अभिषेक मुदिराज यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले

यावेळी युवा पर्यटन मंडळा सचिन चव्हाण, अबोली पवार, रंजना राठोड, सपना इंदापुरे, शोहेब शहा, हर्षदा जोगदंड,उषा साबळे, सागर गायकवाड, रोहित मगरे,हर्षदा कदम,राकेश निकम,महेश अहिरराव,गणेश निकम, रंगनाथ शेळके,शिवराज पाटील,दिनेश परदेशी आदींची उपस्थिती होती.

## जरांगे पाटलांकडून उमेदवारी मिळाली तर जनतेचा आर्शिवाद म्हणून स्विकारणार : प्रा. सोनवणे



### माघार नाही, गंगापुरमधून २८ ला उमेदवारी दाखल करण्याची घोषणा

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी : गंगापुर - खुलताबाद विधानसभा मतदार संघातुन मराठा आरक्षणाचे आदोंलक मनोज जरांगे पाटील यांच्याकडून उमेदवारी मिळाली तर जनतेचा आर्शिवाद म्हणून स्विकारणार असून न मिळाल्यास अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करणार आहे. कोणत्याही आमिषाला, कोणाच्याही दबावाला बळी न पडता, कोणाच्या दडपशाहीला घाबरून माघार नसून जनतेच्या विश्वासावर निवडणूक लढवणार असल्याचे गरूड झेप ॲकडमीचे प्रा. सुरेश सोनवणे यांनी बुधवारी (दि.२३) आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले. त्यामुळे या मतदार संघात बहुरंगी लढतीची शक्यता आहे.

खुलताबाद तालुक्यातील गदाणा सर्कलमधून भारतीय जनता पक्षाकडून माजी जिल्हा परिषद सदस्य असलेले गरूड झेप ॲकडमीचे प्रा. सुरेश सोनवणे यांनी बंडाचे निशान फ डकवले आहे. माझी जन्मभुमी खुलताबाद आणि कर्मभूमी गंगापुर आहे. सोनवणे यांनी बुधवारी जोरदार शक्तीप्रदर्शन केले. यावेळी बोलतांना ते म्हणाले की, माझ्या मतदार संघातुनच निवडणूक लढवणार असून येत्या २८ तारखेला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहे. तसेच मी कोणत्याही नेत्यावर किंवा कोणत्याही पक्षावर मी टीका करणार नाही. जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी मी निवडणुकीच्या मैदानात उतरणार असल्याचे त्यांनी सांगितले. कोणत्याही राजकीय पक्षाची ऑफर आली तर मी स्विकारणार नाही.


**NOTICE**

NJ MUTUAL FUND
BUILT ON RULES

**Unaudited Half Yearly Financial Results of the Schemes of NJ Mutual Fund ("the Fund") for the half year ended September 30, 2024**

**Investors may note that in accordance with Regulation 59 of the SEBI (Mutual Funds) Regulations, 1996, read with SEBI circulars issued in this regard from time to time, the unaudited half-yearly financial results of the schemes of NJ Mutual Fund for the half year ended September 30, 2024, has been hosted on the website of the Fund i.e www.njmutualfund.com in a user-friendly and downloadable format (spreadsheet) and on the website of Association of Mutual Funds in India ("AMFI") i.e. www.amfiindia.com.**

For NJ Asset Management Private Limited
(Investment Manager of NJ Mutual Fund)
Sd/
Vineet Nayyar
Director and Deputy Chief Executive Officer
(DIN: 10690316)

Date: : October 24, 2024
Place: Mumbai

For further details, please contact: NJ Asset Management Private Limited (CIN U67100GJ2005PTC046959) Registered office: Block no. 601, 3rd floor, C Tower, Udhna Udyognagar Sangh Commercial Complex, Central Road No.10, Udhna. Surat- 394210. Gujarat. Telephone Number– 0261 6715601. Corporate office: Unit no. 101A, 1st floor, Hallmark Business Plaza, Bandra (East). Mumbai– 400051. Telephone number: 022 68940000 /1860 500 2888 / 040-49763510.

Email id: customercare@njmutualfund.com
Website:www.njmutualfund.com

MUTUAL FUND INVESTMENTS ARE SUBJECT TO MARKET RISKS, READ ALL SCHEME RELATED DOCUMENTS CAREFULLY


## सिमेंट मिक्सर ट्रक आणि स्विफ्ट कारचा अपघात

तभा वृत्तसेवा पैठण दि २३ :- पैठण तहसील कार्यालय जवळील स्वातंत्र्यवीर सावरकर चौकात पैठणहुन छत्रपती संभाजीनगरच्या दिशेने निघालेल्या सिमेंट मिक्सर ट्रक तसेच स्विफ्ट कारचा अपघात झाला असून या अपघातात सुदैवाने जीवितहानी नाही. अपघातावेळी स्विफ्ट कार मध्ये चार व्यक्ती असल्याची माहिती प्रत्यक्षदर्शी यांनी दिली असून यातील दोघांना पायाला व हाताला जबर मार लागले आहे.

तहसील कॉर्नर स्वातंत्र्यवीर सावरकर चौकात बुधवारी सायंकाळी ०६:३० च्या दरम्यान पैठणहून छत्रपती संभाजीनगरच्या दिशेने भरधाव वेगात जाणाऱ्या सिमेंट मिक्सर ट्रक क्रमांक ाह २० शस ३७२८ आणि रस्ता क्रॉस करून येणाऱ्या स्विफ्ट कार क्रमांक ाह२० सश २०७५ यामध्ये मोठा अपघात झाला. ट्रक ने स्विफ्ट कारला जवळपास १०० मीटर फरफटत नेल्याने कारचे मोठे नुकसान झाले आहे. शेवटी शेजारील नाल्यावरील डिव्हाडरमध्ये आल्याने ट्रक व कार थांबल्यागेली या अपघातात ट्रक आणि कारचे मोठे नुकसान झाले असून सुदैवाने जीवितहानी नाही. पोलीस निरीक्षक संजय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली अपघाताची नोंद करण्यात आली आहे.

## जाहीर प्रगटन

**मा.श्री ए.बी. बिरादार साहेब, दिवाणी न्यायाधिश क. स्तर सिल्लोड यांच्या न्यायालयात.**

एम ए आर जे आय नंबर ३८२/२०२४

अर्जदार - १) रामदास पुंडलिक हावळे, वय ५७ वर्षे, धंदा शेती, रा. मांडणा ता. सिल्लोड ज़ि औरंगाबाद २) प्रल्हाद पुंडलिक हावळे, वय ५४ वर्षे, धंदा शेती, रा. मांडणा ता. सिल्लोड जि. औरंगाबाद ३) निवृत्ती पुंडलिक हावळे, वय ४६ वर्षे, धंदा- शेती, रा. मांडणा ता. सिल्लोड जि औरंगाबाद ४) कुशिवर्ताबाई पुंडलिक चव्हाण, वय ६० वर्षे, धंदा- घरकाम, रा. खंडाळा ता. सिल्लोड जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी साहेब, औरंगाबाद

विषय : बाम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये अर्ज

सर्व जनतेस या जाहिर प्रगटनाव्दारे कळविण्यात येतो की, अर्जदाराचे वकिल ॲड. अनिल एस. लोखंडे यांच्या मार्फत अर्जदार यांनी त्यांचे वडील मयत पुंडलिक तोताराम हावळे यांचे वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी मा. सिल्लोड न्यायालयात अर्ज दाखल केला असुन मयत पुंडलिक तोताराम हावळे हे मौजे मांडणा ता. सिल्लोड येथील रहिवाशी होते व त्यांचा दि.०९/०१/२०२० रोजी मौजे मांडणा ता. सिल्लोड येथे मृत्यु झालेला असून मयत पुंडलिक तोताराम हावळे यांची पत्नी नामे सखुबाई पुंडलिक हावळे यांचा सुध्दा दि. १०/११/२०२२ रोजी मृत्यु झालेला असुन दोघांचेही मृत्यु प्रमाणपत्र प्रस्तुत अर्जासोबत जोडलेले आहे अर्जदार क्र.०१ ते ०३ हे मयत पुंडलिक तोताराम हावळे यांचे मुले असून अर्जदार क्र. ०४ हि त्यांची मुलगी आहेत. अर्जदार क्र. ०१ ते ०४ यांच्या व्यतिरीक्त मयत पुंडलिक तोताराम हावळे यांना इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना मयत पुंडलिक तोताराम हावळे यांच्या वारस प्रमाणपत्राची शासकीय व निमशासकीय तसेच महसुल कामासाठी आवश्यकता असल्याने अर्जदार यांना प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्याचे कारण घडले आहे. जर अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत पुंडलिक तोताराम हावळे यांचे कायदेशीर वारस नसल्या बाबत ज्या कोणास आक्षेप उजर हरकती असेल अशानी हे जाहीर प्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासुन ३० दिवसाच्या आत आक्षेप उजर हरकती या न्यायालयात हजर होऊन सादर कराव्यात जर मुदतीत कोणी आक्षेप उजर हरकती नोंदवाव्यात नसता अर्जदार यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. करीता प्रस्तुत जाहीर प्रगटन

आज दि. २३/१०/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख दि.०३/१२/२०२४

आदेशावरून

विभागीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क स्तर सिल्लोड

## 'सागा ऑफ एन्सियंट फेदर्स सणाची सजावट

पुणे- फिनिक्स मार्केटसिटी पुणेने दिवाळी साजरी करण्यासाठी एक खास 'सागा ऑफ एन्सियंट फेदर्स नावाचा सुंदर उत्सव सुरू केला आहे. या उत्सवात परंपरेची, साहित्याची आणि कलेची सुंदर सादरीकरणं आहेत, ज्यामुळे मॉल मध्ये येणारे खरेदीदार, अभ्यागत आणि कला प्रेमींना एक अनोखा अनुभव देत आहे. या अप्रतिम सजावटीचा मुख्य भाग आहे 'द टाइमलेस क्विल, एक ३५ फुटांची भव्य मूर्ती. दोन पुरातन काळातील शाईपेने आकर्षक नक्षीकाम आणि मिरर मोज़ेकने सजवलेली आहेत, जी सर्जनशीलता आणि शब्दांची ताकद दर्शवणारे प्रतीक आहे. हे प्रकाशमान शिल्प हवेतील काव्यात्मक शब्द प्रकाशमय करीत आहे तसेच अभ्यागतांना त्यांच्या दिवाळीशी संबंधित प्रतीकांसह मंत्रमुग्ध करीत आहे.

## सांस्कृतिक वारसा जश्न-ए-अदब हा साहित्य संमेलन पुण्यात रंगणार !

पुणे, ऑक्टोबर २०२४: भारतातील सर्वात लोकप्रिय साहित्य महोत्सव आणि साहित्य आणि संगीताचा महाकुंभ 'जश्न-ए-अदब सांस्कृतिक कारवां विरासत' पुणे शहरात सुरू होत आहे. हा दोन दिवसीय महाकुंभ २६ आणि २७ ऑक्टोबर २०२४ रोजी नॅशनल फिल्म आर्काइव्ह ऑफ इंडिया सभागृह, एनएफडीसी लॉ कॉलेज रोड येथे आयोजित केला जाणार आहे. भारतीय संस्कृती, कला आणि साहित्याचा उत्सव साजरा करण्यासाठी समर्पित साहित्य उत्सव हा कार्यक्रम शास्त्रीय गायन, गझल गायन, पॅनेल डिस्कशन, नाटक, मुशायरा आणि कवी संमेलन, वाद्य वादन, शास्त्रीय नृत्य आणि लोकगायन इत्यादी उपक्रमांनी भरभराटीला येणार आहे. कार्यक्रमासाठी प्रवेश पूर्णपणे विनामूल्य आहे .

## सोनी मॅक्सवर बडे मियां छोटे मियां'

नाशिक- बॉलीवूडचे दोन ॲक्शन स्टार अक्षय कुमार आणि टायगर श्रॉफ आपल्या जबरदस्त ॲक्शन-कॉमेडीने परिपूर्ण असा 'बडे मियां छोटे मियां' चित्रपट घेऊन प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यास येत आहेत! अली अब्बास झफर दिग्दर्शित या चित्रपटाचा प्रीमियर सोनी मॅक्सवर २७ ऑक्टोबर २०२४ रोजी बघायला मिळणार आहे. या प्रीमियरच्या आधी अक्षय कुमारने या चित्रपटात टायगर श्रॉफ बरोबर काम करण्याचा आपला अनुभव सांगितला.

## जाहीर प्रगटन

**मेहेरबान दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कन्नड (व्हि. एन. काटकर) यांच्या कोर्टात.**

दिवाणी अर्ज क्र- ३१७/२०२४

अर्जदार : १. जगदीश पिता रंगनाथ निकम, वय ४३ वर्षे, धंदा- नौकरी रा. गणेश कॉलणी, राम मंदीर जवळ, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. ह. मु. शिवाजी नगर औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद २. राजेंद्र पिता रंगनाथ निकम, वय ४३ वर्षे, धंदा- नौकरी रा. गणेश कॉलणी, राम मंदीर जवळ, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. ह. मु. शिवाजी नगर औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद ३. सुरेखा भ्र. राजु सोनवणे, वय ४६ वर्षे, धंदा घरकाम, रा. गांधनगर चितेगांव ता. व जि. औरंगाबाद ४. वर्षा भ्र. प्रकाश केरे, वय ४५ वर्षे, धंदा घरकाम, रा. मुरलीधर नगर, पाथर्डी फाटा, नाशिक, ता. जि. नाशिक.

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे - जिल्हा अधिकारी औरंगाबाद.

अर्ज:-बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे कायेदशीर वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी तमाम जनतेस कळवीण्यात येते की, वरील अर्जदार क्र. १ ते ४ यांनी ॲड. एन. बि. थोरात कन्नड यांच्या मार्फत न्यायालयात अर्ज सादर केला की, मयत रंगनाथ नामदेव निकम हे दि.३.१२.२००९ रोजी व चंद्रकलाबाई भ्र. रंगनाथ निकम हे दि. २९.०१.२००८ रोजी मयत झालेले असुन त्यांच्या पश्चात अर्जदार नं. १ ते ४ हे त्यांचे वारस असुन अर्जदार क्र. १ व २ ही मुले व ३ व ४ ह्या विवाहीत मुली आहेत रंगनाथ नामदेव निकम व चंद्रकलाबाई भ्र. रंगनाथ निकम हे मयत झाल्यामुळे त्यांच्या पश्चात वारस म्हणुन अर्जदार यांना शासकीय कामे करण्यासाठी, ग्रा पं. कार्यालय तसेच तहसील कार्यालय, तलाठी कार्यालय, जिल्हाअधिकारी कार्यालय औरंगाबाद, तसेच ईतर शासकीय व निमशासकीय कार्यालयात कामे करण्यासाठी वारस प्रमाणपत्र आवश्यकता असल्यामुळे सदरील अर्जदार यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. व तशी मागणी अर्जात केली आहे.

त्याअर्थी सदरील अर्जाबाबत कोणाचा काही उजर आक्षेप असल्यास सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत कोर्टात सादर करावा कोणाचा उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करुन अर्जदार नं. १ ते ४ च्या हक्कात कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन

दिनांक. २३/१०/२०२४

प्रकरणात पुढील तारीखः-०४.१२.२०२४

आदेशावरीत

क. लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायाधीश क. स्तर कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १८०/२०१५

१/- अरुणाबाई रमेश चौधरी, वय ६१ वर्ष, धंदा घरकाम, रा. जरंडी, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर. २/- वैष्णवी रमेश पाटील, वय ३६ वर्ष, धंदा व रा. वरीलप्रमाणे, ३/- शारदा मुकेश चौधरी, वय ३१ वर्ष, धंदा व रा. वरीलप्रमाणे, ४/- दिनेश रमेश चौधरी, वय २८ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.

विरूद्ध

निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. सचिन सुनिल गिरी, सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत रमेश नथ्थू चौधरी यांचा दि. १५.०९.२०२४ रोजी मौजे जरंडी, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे मृत्यू झालेला असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क. १ ते ४ हे वारस आहेत, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क. १ ते ४ ते मयत रमेश नथ्थू चौधरी यांचे वारस असुन त्याना मयत रमेश नथ्थू चौधरी यांचे शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल.

आजरोजी दि.२४/१०/२०२४ रोजी साही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु. ता. १२/१२/२०२४

आदेशावरुन

क. लिपीक — सहाय्यक अधिश्वक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव)

## Format C-7

(for political parties to publish in the newspapers, social media platforms & website of the party)

Information regarding individuals with pending criminal cases, who have been selected as candidates, along with the reasons for such selection, as also as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates.

(As per the Commission's directions issued in pursuance of the Order dated 13.02.2020 of the Hon'ble Supreme Court in contempt petition(C) no. 2192 of 2018 in WP(C) no. 536 of 2011)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**

***Name of the Election : Maharashtra Legislative Assembly-2024**

**Name of State/UT : Maharashtra**

**(1) Name of the Constituency : 89-Naigaon**

**Name of the candidate : RAJESH SAMBHAJIRAO PAWAR**

| Sl. No. | | | |
|---|---|---|---|
| 1 | **Criminal antecedents** | | |
| | a. | Nature of the offences | 1) U/s. 420, 409, 406, 471 of IPC & Sec 13 C & 13 D IPC code Cheating in payment of dues<br>2) U/s. 15 R/W 16 Water (Prevention and control of pollution act) (Delay obtaining EC Clearance |
| | b. | Case no. | 1) ABC No. 3/2018<br>2) RCC No.0404255/2015 |
| | c. | Name of the Court | 1) 12-District Judge-2, Addl., Sessions Judge, Beed.<br>2) RCC Special Judicial Magistrate, Pune. |
| | d. | Whether charges have been framed or not (Yes/No) | No |
| | e. | Date of conviction, if any | Nil |
| | f. | Details of punishment undergone, if any | Nil |
| | g. | Any other information required to be given | The cases are still under consideration before the Hon'ble Court. |
| 2 | The reasons for the selection of the candidate. Selection shall be with reference to the qualifications, achievements and merit of the candidate, and not mere "winnability" at the polls (not more than 100 words) | | Candidate Rajesh Sambhajirao Pawar is Senior Legislator. He has very strong administrative capacity. Looking at his experience he has been chosen. |
| 3 | Reasons as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates (not more than 100 words) | | All other names who were, aspirants did not have any relevant experience in public life to holds such senior post. |

**(2) Name of the Constituency : 89-Naigaon**

**Name of the candidate : RAJESH SAMBHAJIRAO PAWAR** ........................................................ and so on

* In the case of election to Council of States or States or Election to Legislative Council by MLAs, mention the election concerned in place of name of Constituency.

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...

**Chandrashekhar Bawankule**
**President,**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

## अग्रलेख...

# संघर्षातून शांतीचे मोदींचे सनातन प्रयत्न

भारताने नेहमीच जागतिक शांततेसाठी प्रयत्न केले आहेत आणि शांतता प्रस्थापित करण्यासाठी पावले उचलली आहेत. जगाच्या इतिहासाचा धांडोळा घेतल्यास भारताने कधीच कुठल्या देशावर स्वारी केलेली नाही, कुठल्या देशावर हल्ला केला नाही, कुठल्या देशाला मांडलिक बनवले नाही, ना कुठल्या देशावर ताबा मिळवून, त्या देशातील मनुष्यबळाचा, संपत्तीचा आपल्या देशाच्या विकासासाठी उपयोग केला, हे निदर्शनास येईल. 'वसुधैव कुटुंबकम्' अर्थात 'जग एक कुटुंब आहे' ही येथील सनातन धर्माची मूळ संस्कृती आणि विचारधारा आहे. आपण अणुचाचण्याही केल्या, पण त्या युद्धासाठी नव्हे तर शांततेसाठी. शक्तिसंपन्न राष्ट्रांना इतर देश वचकून असतात, या भूमिकेतून अणुस्फोट घडवून भारत सामर्थ्यशाली राष्ट्रांच्या मांदियाळीत बसला. आम्ही युद्धाच्या नव्हे तर बुद्ध-महावीरांच्या शांतीच्या मार्गानेच मार्गक्रमण केले आणि महात्मा गांधींच्या अहिंसेचा मंत्रही जपला. त्यानुरूप भारताने इतर देशाच्या कल्याणाचाच विचार केला अन् जागतिक ऐक्यासाठी प्रयत्नही केले. याच विचारधारेवर पाऊल ठेवत रशिया-युक्रेन संघर्षावर शांततेच्या मार्गाने तोडगा काढण्यास भारताचे सर्वतोपरी सहकार्य राहील, अशी ग्वाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन यांना ब्रिक्स परिषदेच्या पृष्ठभूमीवर कझान येथे ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिकेच्या उपस्थितीत दिली. या परिषदेत उभय नेत्यांमध्ये द्विपक्षीय चर्चा झाली. यावेळी मोदी म्हणाले, रशिया-युक्रेन संघर्षावर शांततेच्या मार्गाने तोडगा निघायला हवा, अशी भारताची भूमिका राहिली आहे. या आधीही भारताने दोन्ही देशांमध्ये शांतता आणि स्थैर्य प्रस्थापित करण्यासाठी घेण्याची इच्छा व्यक्त केली आहे. युद्धाने कोणताही प्रश्न सुटणार नाही. युद्ध असो अथवा दहशतवादी हल्ला, यात मोठी जीवितहानी होते. याचे परिणाम इराण-इराक, इस्रायल-पॅलेस्टाईन, अमेरिका-अफगाणिस्तान संघर्षात जगाने बघितले. 'आमचा मानवतेवर विश्वास आहे. त्यामुळे शांततेच्या मार्गाने समस्येवर तोडगा काढण्याची गरज आहे. यासाठी भारताकडून पूर्णपणे सहकार्य आणि मदत करण्यात येईल,' असा पुनरुच्चारही त्यांनी यावेळी केला. याआधी मोदींनी जुलैमध्ये रशियाला भेट दिली, त्यावेळीही त्यांनी रशिया-युक्रेन युद्ध थांबविण्यासाठी प्रयत्न केले होते. यावेळीही त्यांनी रशियाच्या दुसऱ्या दौऱ्यामध्ये पुतिन यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करताना त्याच भूमिकेचा पुनरुच्चार केला. याआधी पंतप्रधानांनी ऑगस्ट महिन्यात कीव्ह येथे युक्रेनचे अध्यक्ष व्होलोडिमिर झेलेन्स्की यांची भेट घेतली होती. त्यावेळी झेलेन्स्की यांच्याशी झालेल्या चर्चेत मोदी म्हणाले की, युक्रेनमध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी भारत नेहमीच सक्रिय भूमिका बजावण्यास तयार आहे. आम्ही (भारत) तटस्थ नाही. सुरुवातीपासूनच आम्ही बाजू घेतली असून आम्ही शांततेची बाजू निवडली आहे. युक्रेन-रशिया युद्धाचा भडका उडाल्यानंतर अनेक देशांनी भारताला रशियाची बाजू घेण्याचा सल्ला दिला होता. पण भारताने तो नाकारला आणि आम्ही कुणाचीही बाजू घेणार नाही, असे ठणकावून सांगितले.

रशिया-युक्रेनियन युद्ध हा प्रदीर्घ संघर्ष आहे. तो कधी संपेल याचे उत्तर आज तरी कुणाजवळच नाही. या संघर्षात एकीकडे रशिया आणि रशिया-समर्थक सैन्य तर दुसरीकडे युक्रेन आणि मित्र देश आहेत. रशिया युक्रेनवर लष्करी आक्रमण करण्याचा विचार करीत आहे, असे ज्यावेळी स्पष्ट झाले, तेव्हा उभय देशांत संघर्षाला तोंड फुटले. रशियासोबतची राजनैतिक चर्चा अयशस्वी झाल्यामुळे फेब्रुवारी २०२२ मध्ये रशियाने फुटीरतावादी नियंत्रित प्रदेशात सैन्य हलवल्यामुळे संकट अधिक गडद झाले. २४ फेब्रुवारी रोजी रशियाने युक्रेनवर पूर्ण शक्तिनिशी आक्रमण सुरू केले. युक्रेन-रशिया संघर्षात भारताची भूमिका संतुलित आणि तटस्थ राहण्याची आहे. भारताने दोन्ही देशांशी मजबूत संबंध ठेवले आहेत आणि संघर्षाच्या प्रारंभापासून शांततेचा आग्रह धरला आहे. भारताने युक्रेनच्या सार्वभौमत्वाचा आदर केला आहे, परंतु रशियावरही टीका करण्यापासून भारत दूर राहिला आहे. भारताने या संघर्षात जागतिक शांतता आणि स्थिरतेसाठी संवादाचे महत्त्व अधोरेखित केले. भारताने युक्रेनमध्ये नागरिकांच्या सुरक्षेसाठी आणि मानवी मदतीसाठी हातभार लावला. भारताच्या या भूमिकेमुळे त्याने आंतरराष्ट्रीय स्तरावर एक संतुलित आणि जबाबदार देश म्हणून आपली ओळख तयार केली. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी युक्रेन-रशिया युद्ध थांबवण्यासाठी दोन्ही देशांच्या नेत्यांशी संवाद साधला आणि शांततेसाठी एकत्रितपणे काम करण्याचे आवाहन केले. मोदींनी रशियाचे अध्यक्ष पुतिन यांना स्पष्टपणे सांगितले की, युद्धाचे युग संपले आहे आणि त्यांनी संवाद व चर्चा यांना प्राथमिकता देण्याचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच, भारताने युक्रेनला अन्न, औषध आणि अन्य आवश्यक वस्त्रांचा पुरवठा केला. मोदी सरकारने आंतरराष्ट्रीय मंचावर युक्रेनमधील संकटाच्या मानवतेच्या पैलूवर लक्ष केंद्रित केले. प्रारंभी युक्रेन रशियाच्या हल्ल्यामुळे नांगी टाकेल, असे वाटले होते; पण युक्रेनने अनेक मित्रपक्ष जोडले आणि रशियापुढे तगडे आव्हान उभे केले. युनायटेड स्टेट्सने युक्रेनला मोठ्या प्रमाणात लष्करी आणि मानवी मदत केली. युरोपियन सदस्य देशांनी आर्थिक, लष्करी आणि मानवी मदतीसाठी विविध पॅकेजेस जाहीर केले. युनायटेड किंगडमने लष्करी साधनांची मदत आणि आर्थिक सहाय्य प्रदान केले. कॅनडा, ऑस्ट्रेलिया, जपान या देशांनी विविध प्रकारांच्या मदतीसाठी हात पुढे केला. नाटोनेदेखील युक्रेनच्या सुरक्षेसाठी समर्थन दर्शविले आहे. चीनने रशियाला आर्थिक आणि राजनैतिक समर्थन दिले असले, तरी त्याने थेट लष्करी सहाय्य केल्याचा पुरावा नाही. बेलारूसने रशियाला युद्धात थेट समर्थन प्रदान केले आहे. कझाकस्तान, अर्मेनिया हे देश काही प्रमाणात रशियाच्या समर्थनात उभे आहेत, परंतु थेट युद्धात सहभागी नाहीत.

युद्धाच्या रणांगणावर सध्या शांतता दिसत असली, ही परिस्थिती नक्कीच एका गंभीर वळणावर आहे. रशिया-युक्रेनमधील सर्वात प्रख्यात शहर खार्किवच्या दिशेने वाटचाल करीत आहे. युद्धक्षेत्रावरील धोरणात्मक घडामोडी हळूहळू होत असूनही ते रशियाला युक्रेनच्या पूर्वेला नवीन सीमांकनांसह पुनर्स्थापित करू शकते. दुसरीकडे युक्रेनला यूएस काँग्रेसने मंजूर केलेल्या ६० अब्ज डॉलर्सच्या शस्त्रास्त्रांच्या मदतीमुळे चांगलीच हवा मिळाली आहे. रशिया-युक्रेन युद्ध वाढत गेले, तसतसे भारताकडून जागतिक अपेक्षा बदलल्या आहेत. भारताला संभाव्य मध्यस्थ म्हणून पाहण्यापासून ते युक्रेन आणि रशिया या दोन्ही देशांमधील भागीदारी असलेला पक्ष म्हणून पाहण्यापर्यंतचा समावेश आहे. जसजसे युद्ध लांबले आहे, तसतसे या अपेक्षा पुन्हा उफाळून आल्या आहेत. भारतापुढील सुप्त आव्हाने कोणती आहेत आणि युरोपीय युद्ध- भौगोलिकदृष्ट्या खूप दूरचे- भारताच्या धोरणात्मक गणितात कुठे बसते, असाही प्रश्न आहे. भारत आणि रशिया यांच्यात ७० वर्षांहून अधिक काळचे संबंध आहेत. संरक्षण आयातीपासून ते धोरणात्मक भागीदारीपर्यंत या दोन देशांमधील संबंध खोलवर आहेत. संरक्षण उपकरणे आणि देखभालीसाठी भारत रशियावर अवलंबून राहणे महत्त्वपूर्ण आहे. दोन्ही देशांशी मैत्रत्व कायम राखताना भारताला तारेवरची कसरत करावी लागत आहे. पण मोदींनी शांतता प्रस्थापित करण्याच्या दिशेने पावले टाकली आहेत. अनेक युरोपीय देशसुद्धा आज मोदीच या देशांमध्ये शांततावार्ता सुरू करू शकतात, असे बोलू लागले आहेत. अनेक आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये भारताला मिळत असलेल्या महत्त्वाकडे बघता मोदी या दोन देशांमध्ये शांतता पुनर्स्थापित करू शकतात, असे जागतिक नेत्यांनाही वाटू लागले आहे. या पृष्ठभूमीवर मोदींच्या नावाचा नोबेल शांतता पुरस्कारासाठी विचार केला जाऊ शकतो. त्या पुरस्कारासाठी ते पात्रदेखील आहेत. भारतीय, सनातन विचारसरणीच शांततेची पुरस्कर्ती आहे. त्यात मोदींचा सनातन संस्कृतीच्या पालनाचा आग्रह त्यांना शांततेपासून ढळू देत नाही. देशांतर्गत राजकारणामध्येही ३५६ कलमाचा वापर करण्याजोगी परिस्थिती असतानाही ना त्यांनी पश्चिम बंगालमध्ये ना मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवट लावण्याची शिफारस केली. साऱ्या जगाला त्यांच्या नेतृत्वाची मोहिनी पडली असून त्यांनी रशिया-युक्रेन समझोत्यासाठी टाकलेले पाऊल यशस्वी व्हावे, ही सदिच्छा!

## इतस्तत:

**डॉ. विवेक राजे**

# प्रभाव युद्ध

लोकशाही, स्वातंत्र्य, मानवाधिकार इत्यादी संकल्पनांच्या बुरख्याआडून तथाकथित समाजसेवेच्या संस्थांच्या नावाखाली सध्याची जागतिक सुपर पदांवरील अमेरिका आणि होऊ घातलेली सुपर पॉवर चीन विविध देशांमध्ये आज उलथापालथ करण्याचा प्रयत्न करताना दिसतात. जो देश या सुपर पॉवर्सच्या निशाण्यावर असेल त्या देशातील ठरावीक 'एनजीओं'ना मोठ्या प्रमाणावर निधी देऊन घुसखोरी करून तेथील संस्कृती आणि जनमताचा विध्वंस करण्यासाठी आज त्यांचा वापर करून घेण्यात येतो. एखाद्या सरकारची परिणामकारकता अथवा केलेली विविध लोकोपयोगी कामे लोकांपासून लपविण्यासाठी तसेच चुकीच्या नॅरेटिव्हजच्या आधारे सर्वसाधारण जनमत एखाद्या लोकप्रिय सरकारच्या विरोधात बदलण्याची तजवीज केली जाताना दिसते.

वास्तविक अनेक बातम्यांना पहिल्या पानावर टॉप हेडलाईन मिळायला हवी अशी स्थिती असते; पण अनेक वार्तापत्रातून आणि न्यूज चॅनल त्यांची दखलही घेत नाहीत. त्याच वेळी सामान्य वाचकाचा या देशात हिंदुत्ववादी सरकार काहीच काम करीत नाही, असा गैरसमज करून देण्यासाठी अकारण काहीही बातम्या छापल्या जातात. बातम्यांचे महत्त्वदेखील आता या जागतिक महाशक्ती आणि सोरोस वा फोर्ड फाऊंडेशन ठरवताना दिसत आहेत. या प्रकाराला 'इन्फ्लुएन्स ऑपरेशन्स' म्हटले जाते. या एक प्रकारच्या मानसशास्त्रीय युद्धात एखाद्या देशातील नागरिकांवर आपल्या इच्छेनुसार ठरावीक प्रभाव पाडण्यासाठी व्यूहरचना केली जाते. यामध्ये बडे देश विशिष्ट देशातील एनजीओंना प्रचंड प्रमाणात निधी देऊन सर्वसामान्य माणसाला प्रभावित करून त्या देशात अस्थैर्य निर्माण करण्यासाठी बाध्य करीत असतात. भारतासारख्या टोकाची आर्थिक, सामाजिक, भाषिक, धार्मिक विविधता असलेल्या देशात जनमत प्रभावित करणे जागतिक महाशक्तींना नेहमीच सोपे असते. मुळात लोकमानस प्रभावित करण्यासाठी लोकशाही आणि लोकशाही संस्थांचे स्वातंत्र्य, मानवाधिकार, त्या देशातील निवडणूक घेण्याची पद्धत आणि निवडणूक भ्रष्टाचार, स्त्री सबलीकरण अशा अनेक उद्दिष्टांचे एक आवरण घेऊन काम करणाऱ्या सामाजिक संस्था साधारणपणे वापरण्याची पद्धत आहे. हे तंत्र अलिकडच्या काळात जगातील सर्वच महाशक्ती वापरताना दिसतात. या महाशक्ती म्हणजे जसे काही देश आहेत तसेच याच देशांतील काही अतिश्रीमंत उद्योगपतींचे एक संकुचित असे संघटन आहे. यालाच अनेक लोक 'डीप स्टेट' असेही म्हणतात. हे डीप स्टेट जागतिक महाशक्तींच्या हेरखात्यांबरोबर हातमिळवणी करून संभावितपणे आपल्या कारवाया इतर देशांमध्ये करीत असतात. माहिती तंत्रयुद्ध, जनमत प्रभावित करण्याचे तंत्र आणि त्या त्या देशातील न्यायव्यवस्थेतील विविध कायद्यांच्या आधारे न्यायिक युद्ध असे याचे तीन ढोबळ विभाग असतात. या तीनही तांत्रिक बाबी वापरून त्या त्या देशातील जनमत प्रभावित करून, आपल्याला धार्जिणे असे सरकार त्या देशांमध्ये स्थापन करणे हे या डीप स्टेटचे उद्दिष्ट होय. वास्तवात हे एक युद्धतंत्रच असून यात दुसऱ्या देशातील सामाजिक मानसिकता, अर्थ पुरवठा, राजकारण व तंत्रज्ञान यांचा वापर करून लोकमानस/जनमत प्रभावित करण्यात येते. यात शक्तिशाली देश कमजोर देशातील काही समाजसेवा करणाऱ्या संस्था हाताशी धरतात. अशा संस्थांना प्रचंड प्रमाणात निधी पुरवण्यात येतो. या संस्थांमधील काही समाजसेवकांना मग आंतरराष्ट्रीय पुरस्कार जाहीर करण्यात येतात. काही लोकांना मेगॅसेसे, नोबेल अशा पुरस्कारांसाठी नामनिर्देशित करण्यात येते. मग या व्यक्तींची प्रचंड मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी करण्यात येते. याचा परिणाम म्हणजे त्या व्यक्तीची दखल आभासी पद्धतीने घेण्यात येऊन समाजात अस्वस्थता पसरते आणि त्या देशातील जनतेमध्ये अशा व्यक्तीला विशेष प्रसिद्धी आणि स्थान प्राप्त होते. (उदा. अरविंद केजरीवाल, तिस्ता सेटलवाड इ.) अशा व्यक्तींना त्यानंतर या कोणत्या तरी मुद्यावर उपोषण करण्यास सांगितले जाते. अशा आंदोलनांना आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्धी देण्यात येते आणि आपल्याच देशाच्या प्रस्थापित व्यवस्थेविरोधात बंड करण्यास उद्युक्त केले जाते. राष्ट्र पातळीवर हे आंदोलन भडकवण्यात येते. सरकार चर्चा करण्यास तयार असले आणि चर्चेच्या अनेक फेऱ्या झाल्या तरी यातून काहीही निष्पन्न निघणार नाही, याची काळजी घेतली जाते. मग जनमताचा रेटा, हिंसक आंदोलन आणि आंतरराष्ट्रीय राजनैतिक प्रभाव याचा वापर करून प्रस्थापित सरकार पाडण्यात येते. प्रस्थापित व्यवस्था उलथून टाकण्यात येते आणि जागतिक महाशक्तींना धार्जिणी अशी व्यवस्था व सरकारची स्थापना करण्यात येते. आपला शेजारी देश बांगलादेशमध्ये हीच पद्धत वापरली गेली. आधुनिक काळात पारंपरिक युद्ध हे अत्यंत खर्चिक होते. याची प्रचंड मोठी किंमत मोजावी लागते. म्हणजेच ते किफायतशीर ठरत नाही तसेच पारंपरिक युद्ध हे आंतरराष्ट्रीय नियमांनुसार करावे लागते. या उलट आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून लढले जाणारे हे प्रभाव युद्ध कमी खर्चिक असून हवा तो परिणाम दीर्घकाळ साधणारे ठरते आहे. बांगलादेशच्या शेख हसीना सरकारने अमेरिकेला आपली जमीन वापरण्यास परवानगी दिली नव्हती. पण नवे आलेले सर्वेसर्वा मुहम्मद युनूस हे नोबेल पुरस्कारप्राप्त अमेरिकेत आश्रय मिळालेले व्यक्ती आहेत. ते निश्चितच अमेरिकेचा वरदहस्त लाभल्यामुळे आज बांगलादेशचे सर्वेसर्वा आहेत. त्यांच्याकडून आता अमेरिका काय वाटेल ते काम करवून घेऊ शकते. बांगलादेशमध्ये घडलेले सत्ताबदल आंदोलन हे आता सीआयएच्या देखरेखीखाली जनमत प्रभावित करून घडवून आणले गेले होते, हे आता जगासमोर आलेले आहे. पाकिस्ताननेदेखील जवळजवळ ४००० माहिती व प्रभाव युद्ध विशेषज्ञांची एक तुकडी तयार केली असल्याचे कळते. ही सगळी तजवीज भारत विरोधी नॅरेटिव्हज पसरविण्यासाठीच केली जात आहे, हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे. संपूर्ण जग आपल्या मतप्रणालीनुसार चालावे. जगावर आपली निरंकुश सत्ता असावी आणि अमेरिका व अमेरिकेतील काही अतिश्रीमंत व्यक्तींचेच हित साधले जावे, अशी ही विचारसरणी आहे. बांगलादेशातील शेख हसीना सरकार उलथून टाकल्यानंतर भारताचे तुकडे करणे हा असाच एक कार्यक्रम आहे. या सगळ्यांचं एकमत आहे. यासाठी सातत्याने भारतीय लोकशाहीवर ताशेरे ओढणे, लोकशाही कमजोर होत आहे, नरेंद्र मोदी लोकशाहीच्या विविध संस्थांची स्वायत्तता संपुष्टात आणत आहेत, अशा आवया उठवून विविध समाजघटकांमध्ये वाद निर्माण करून फूट पाडणे, भारतीय अर्थव्यवस्थेत किंवा समाजात नसलेल्या मुद्यांवरून आंदोलन भडकवणे असे सगळे प्रकार आपल्या देशात हे डीप स्टेट, सीआयए, वामपंथी वोक विचारांसरणी, ख्रिश्चन चर्च आणि जिहादी सध्या एकत्रितपणे करीत आहेत. भारतात काही प्रसिद्ध आणि पुरस्कारप्राप्त व्यक्ती व सगळे विरोधी पक्ष सध्या या डीप स्टेटचा पैसा, सीआयएची संसाधने आणि वामपंथी बुद्धी याचा वापर करून लोकशाही मार्गाने निवडून आलेल्या केंद्र सरकारच्या विरोधात कारवाया करीत असल्याचे दिसतात. याला विकली गेलेली भारतीय आणि आंतरराष्ट्रीय प्रसार माध्यमे साथ देत आहेत. दिल्लीच्या सीमेवर करण्यात आलेले शेतकरी (खलिस्तानी) आंदोलन, कोविडवरील भारतीय लसीकरणाला अमेरिकन फार्मा लॉबीने केलेला विरोध, युक्रेन-रशिया युद्ध चालले असताना युरोपियन देशांच्या विरोधाला न जुमानता भारताने रशियाकडून घेतलेले खनिज तेल आणि अमेरिकेला भीक न घालता इराणकडून घेत असलेले खनिज तेल अशा अनेक कारणांमुळे डीप स्टेट आणि जागतिक महासत्तांना भारत आणि भारतातील नरेंद्र मोदी सरकार खलते आहे. त्यामुळे भारतातील विरोधी पक्षाला बरोबर घेऊन हे डीप स्टेट जोरात काम करते आहे. यांच्या अशांतता निर्माण करण्याच्या प्रयत्नांना हरयाणा निवडणुकीने चांगली चपराक बसली आहे. याची पुनरुक्ती महाराष्ट्रात घडणे आवश्यक आहे.

९८८१२४२२२४

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# नक्षलवादाविरुद्धची धाडसी मोहीम

गडचिरोली जिल्ह्यात अधिराज्य गाजविणारी नक्षल चळवळ आता खिळखिळी झाली असून माओवाद्यांच्या मनात पोलिसांची भीती निर्माण करण्यात प्रशासनाला यश आले आहे. गेल्या तीन वर्षांत पोलिसांनी गडचिरोली जिल्ह्यात ८५ नक्षल्यांना कंठस्नान घालून हत्या आणि जाळपोळ करणाऱ्या माओवाद्यांना सोडणार नसल्याचा जणू इशाराच दिला आहे. सन २०२१ ते आजपर्यंत पोलिसांनी कट्टर ८५ माओवाद्यांना यमसदनी धाडले. तीन महिन्यांच्या कालावधीत एकूण १७ नक्षली पोलिसांनी आपल्या गोळीने टिपले आहेत. १०९ नक्षल्यांना अटक करून त्यांना जेरबंद करणाऱ्या पोलिस प्रशासनाने जे नक्षली आत्मसमर्पण करायला तयार आहेत, अशा नक्षल सदस्यांचे स्वागतही केले आहे. वर्षभरात जवळपास ३७ नक्षल्यांनी गडचिरोली पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले आहे. जे शरण आले, त्यांना सन्मानाने मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी राबविलेले उपक्रम अतिशय स्तुत्य आहेत. मात्र जे अजूनही नक्षल चळवळीवर विश्वास ठेवून आहेत व ज्यांनी हिंसाचाराचा मार्ग सोडायला नकार दिला आहे, अशांना मात्र बंदुकीनेच उत्तर देण्याचे पोलिसांनी ठरविले आहे. याच पृष्ठभूमीवर परवा पोलिस-नक्षल्यांमध्ये उडालेल्या चकमकीत पाच माओवाद्यांचा पोलिसांनी खात्मा केला आहे. निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर गडचिरोली जिल्ह्यात दहशत व घातपाती कारवाया घडविण्याच्या दृष्टीने एकत्र आलेल्या माओवाद्यांना दोन वेगवेगळ्या ठिकाणी घेरून त्यांचे संपूर्ण शिबिर पोलिसांनी उद्ध्वस्त केले आहे. जे पोलिस पूर्वी जंगलात जाण्यासाठी घाबरत होते, त्या पोलिसांचे मनोबल आता उंचावले असून नक्षल्यांविरुद्धच्या लढ्यात पोलिसांचे पाऊल आता पुढे पडू लागले आहे. अबुझमाड व छत्तीसगडच्या सीमावर्ती भागात लपून बसलेल्या नक्षल्यांना शोधून काढत त्यांचा खात्मा करण्याच्या दृष्टीने पोलिसांनी उचललेले पाऊल गडचिरोलीच्या विकासासाठी अतिशय महत्त्वपूर्ण ठरू लागले आहे. नक्षल्यांच्या दहशतीमुळे गडचिरोली जिल्ह्यात उद्योगधंदे येत नव्हते. चांगले उद्योजक, व्यावसायिक गडचिरोलीत व्यवसाय करायला तयार नसायचे. मात्र आता चित्र बदलले असून नक्षल्यांच्या सावटाखाली असलेला गडचिरोली जिल्हा भयमुक्त झाला असून हा जिल्हा इतर जिल्ह्यांच्या तुलनेत झपाट्याने विकासाच्या मार्गावर येऊन पोहोचला आहे. गडचिरोली जिल्ह्यात उत्तम प्रकारचे खनिज, उत्तम प्रकारची वने आणि सगळीकडे नद्यांचे जाळे पसरले असतानाही या ठिकाणी पर्यटनाला चालना मिळू शकली नाही. मात्र, नक्षल्यांची दहशत हळूहळू कमी होऊ लागल्याने हा जिल्हा पर्यटनाच्या दृष्टीनेसुद्धा विकसित केला जाऊ शकतो, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. गडचिरोली जिल्ह्यातून नक्षल्यांची पाळेमुळे खोदून काढण्यात गडचिरोलीचे तत्कालीन युवा पोलिस अधीक्षक सुवेझ हक, विरेश प्रभू, संदीप पाटील, अंकित गोयल यांचादेखील तितकाच मोठा वाटा आहे. गेल्या दोन वर्षांपासून नक्षल्यांविरुद्ध उघड मोहीम राबवत अतिदुर्गम भागातील आदिवासींना विकास प्रवाहात आणण्यासाठी पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी चालविलेल्या सोशल पोलिसिंगचीही सर्वत्र चर्चा होऊ लागली आहे. ३८ लाखांचे बक्षीस असलेल्या पाच जहाल नक्षल्यांना गडचिरोली पोलिसांनी नक्षल्यांचा गड समजल्या जाणाऱ्या अबुझमाड परिसरात घुसून यमसदनी धाडले. याशिवाय तीन महिन्यांपूर्वी धानोरा तालुका परिसरात १२ नक्षल्यांना आपल्या गोळीने पोलिसांनी टिपल्यामुळे नक्षल चळवळ तिथरबिथर झाली आहे. पोलिसांना अतिदुर्गम भागातल्या आदिवासींकडून सहकार्य मिळू लागले आहे. सोबतच जे नक्षली पोलिसांपुढे शरण आले आहेत, ज्यांनी आत्मसमर्पण योजनेचा लाभ घेतला आहे असे आत्मसमर्पित नक्षली पोलिस प्रशासनाला सहकार्य करू लागले आहेत. पाच नक्षल्यांना ठार करून अबुझमाड परिसरातील नक्षल्यांचे कॅम्प उद्ध्वस्त करण्यासाठी पोलिसांना या आत्मसमर्पित नक्षल्यांचा मोठा फायदा झाला असल्याचे खुद्द वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी कबूल केले आहे. पोलिस प्रशासन नक्षल चळवळीविरुद्ध सर्व दिशेने लढण्यासाठी सज्ज झाली आहे. सोशल पोलिसिंगचा वापर करीत पोलिसांप्रती आदिवासींच्या मनात विश्वास निर्माण करणे, त्यांच्या अडचणी सोडविणे, त्यांना शहरी भागाशी जोडणे, युवक-युवतींना कौशल्य विकास उपक्रमांतर्गत प्रशिक्षण देऊन व्यवसाय करायला सहकार्य करणे, आदिवासी मुलांसाठी सहल आयोजित करणे या व इतरही काही महत्त्वपूर्ण उपक्रमांमुळे पोलिस प्रशासन आदिवासींच्या मनात घर करू शकले. पर्यायाने पोलिसांना नक्षल्यांविरोधात लढताना अतिदुर्गम भागातील लोकांचे सहकार्य मिळू लागले आणि यामुळेच पोलिस प्रशासन माओवाद्यांविरुद्ध आपली जरब बसवू शकले आहेत. गेल्या तीन महिन्यांच्या कालावधीत १७ नक्षल्यांना गडचिरोली पोलिसांनी ठार केल्याने पोलिस अधीक्षक नीलोत्पल अभिनंदनास पात्र ठरले आहेत.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# प्रियांका वढेरा लोकसभेत जाणार का?

वायनाड लोकसभा मतदारसंघात होणाऱ्या पोटनिवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल करून प्रियांका वढेरा अखेर लोकसभेत येण्याच्या तयारीला लागल्या आहेत. गेल्या पाच वर्षांपासून प्रियांका राजकारणात सक्रिय झाल्या होत्या, काँग्रेस महासचिव म्हणून त्या कामाला लागल्या होत्या. याचा अर्थ त्याच्या आधी त्यांचा काँग्रेसच्या राजकारणात हस्तक्षेप नव्हता, असे नाही; पण त्यावेळी त्या पडद्याआडून सूत्रे हलवत होत्या. सोनिया गांधी आणि राहुल गांधींचे निवडणूक व्यवस्थापन पाहात होत्या. २०१९ नंतर प्रियांका वढेरा या खऱ्या अर्थाने राजकारणात सक्रिय झाल्या. काँग्रेस महासचिव म्हणून त्यांची औपचारिक नियुक्ती करण्यात आली. वायनाडमध्ये प्रियांकांनी उमेदवारी अर्ज भरण्याच्या आधी काँग्रेसने जोरदार शक्तिप्रदर्शन केले. यावेळी काढण्यात आलेल्या रोड शोमध्ये काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी, काँग्रेसचे राष्ट्रीय मल्लिकार्जुन खडगे आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी उपस्थित होते. ३५ वर्षे मी काँग्रेससाठी प्रचार केला, मत मागितली. आता मी माझ्यासाठी प्रचार करणार, मत मागणार, असे प्रियांका यांनी यावेळी म्हटले.

वायनाडमधील जागेचा राहुल गांधी यांनी राजीनामा दिल्यामुळे याठिकाणी पोटनिवडणूक होत आहे. २०१९ ची लोकसभा निवडणूक राहुल गांधी यांनी अमेठी आणि वायनाड अशा दोन लोकसभा मतदारसंघातून लढवली होती. त्यावेळी अमेठी मतदारसंघात भाजपाच्या स्मृती इराणी यांनी त्यांचा पराभव केला; मात्र वायनाडमध्ये ते विजयी झाले. यावेळी प्रकृती अस्वास्थ्यामुळे सोनिया गांधी यांनी रायबरेली मतदारसंघातून निवडणूक लढण्यास असमर्थता दर्शवल्यानंतर प्रियांका वढेरा त्या मतदारसंघातून निवडणूक लढतील, असे वाटत होते. त्यावेळी अमेठीवरून राहुल गांधी तर रायबरेलीतून प्रियांका वढेरा लढतील, असा सगळ्यांचा अंदाज होता; पण तो खोटा ठरला. राहुल गांधी यांची अमेठीतून लढण्याची हिंमत झाली नाही, तर प्रियांका रायबरेलीतून मैदानात उतरल्या नाही. अमेठीतून काँग्रेसने गांधी घराण्याच्या एका निष्ठावंताला उमेदवारी दिली. घराणेशाहीच्या आरोपातून वाचण्यासाठी त्यावेळी प्रियांका रायबरेलीतून लढल्या नाही, अशी चर्चा होती. मग आता काय झाले? वायनाडमधून अर्ज दाखल



केल्यामुळे गांधी घराणे आणि काँग्रेस घराणेशाहीच्या आरोपातून वाचणार का, हा लाखमोलाचा प्रश्न आहे. प्रियांका वढेरा या नेहरू-गांधी घराण्याच्या राजकारणात उतरलेल्या दहाव्या व्यक्ती आहेत. यात नेहरू आडनावाची एकच व्यक्ती राजकारणात होती. गांधी आडनावाच्या आठ तर वढेरा आडनावाच्या नव्या व्यक्तीची त्यात आता भर पडत आहे. याआधी पंडित जवाहरलाल नेहरू, फिरोज गांधी, इंदिरा गांधी, संजय गांधी, राजीव गांधी, मनेका गांधी, सोनिया गांधी, राहुल गांधी आणि वरुण गांधी राजकारणात उतरले होते. प्रियांका राजकारणात उतरणाऱ्या या घराण्यातील चौथ्या महिला आहेत. इंदिरा गांधी, मेनका गांधी, सोनिया गांधी आणि आता प्रियांका वढेरा गांधी घराण्याचा वारसा चालवत आहेत.

दक्षिण भारतातून आपली राजकीय कारकीर्द चालू करणाऱ्या प्रियांका गांधी घराण्यातील दुसऱ्या महिला ठरणार आहेत. याआधी सोनिया गांधी यांनी आपली पहिली लोकसभा निवडणूक १९९९ मध्ये बेल्लारी आणि अमेठी मतदारसंघातून लढवली होती. दोन्ही ठिकाणी विजयी झाल्यानंतर त्यांनी बेल्लारीचा राजीनामा दिला आणि अमेठीची जागा कायम ठेवली. गांधी घराणे एकाच वेळी उत्तर आणि दक्षिण भारतातून निवडणूक लढवते आणि दक्षिण भारताच्या जागेचा राजीनामा देत उत्तर भारताची जागा कायम ठेवतात, हे आधी सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांनी दाखवून दिले आहे.

प्रियांका वढेरा जिंकल्या तर संसदेत गांधी घराण्याचे तीन प्रतिनिधी राहणार आहेत. यापैकी दोघे लोकसभेत तर एक राज्यसभेत होतील. लोकसभा निवडणूक लढण्यास नकार देणाऱ्या सोनिया गांधी मागच्या दरवाजाने राज्यसभेत पोहोचल्या. राहुल गांधी लोकसभेतील विरोधी पक्षनेते आहेत, प्रियांका जिंकल्या तर राहुल आणि प्रियांका लोकसभेत तर आई राज्यसभेत, असे कौटुंबिक चित्र राहील.

काँग्रेस महासचिव म्हणून प्रियांका वढेरा यांच्याकडे पूर्वी उत्तरप्रदेशची जबाबदारी देण्यात आली होती. पश्चिमी उत्तरप्रदेशची जबाबदारी तेव्हा आता भाजपात आलेले ज्योतिरादित्य शिंदे यांच्याकडे होती. नंतर शिंदे यांनी काँग्रेस सोडत भाजपात प्रवेश केल्यानंतर संपूर्ण उत्तरप्रदेशची जबाबदारी प्रियांका यांच्यावर आली. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत राज्यात काँग्रेसचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न त्यांनी केला, पण तो फसला. काँग्रेसच्या आधी उत्तरप्रदेशातून लोकसभेत दोन जागा होत्या, पण राहुल गांधी यांच्या पराभवामुळे त्या अर्ध्यावर आल्या, म्हणजे एक झाली. २०२२ मध्ये उत्तरप्रदेशातील विधानसभा निवडणुकीत प्रियांका गांधी यांनी महिला सशक्तीकरणाच्या मुद्यावरून काँग्रेसला सशक्त करण्यासाठी आपली पूर्ण ताकद लावली. 'लडकी हुं लड सकती हूं' म्हणत महिला आणि मुलींना निवडणूक रिंगणात उतरवले; पण हा प्रयत्नही फसला. ४०३ सदस्यांच्या विधानसभेत काँग्रेसला फक्त दोन जागा जिंकता आल्या.

प्रियांका वढेरा यांचा चेहरा थोडासा आजी इंदिरा गांधी यांच्यासारखा दिसत असल्यामुळे काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये त्यांची एक वेगळी क्रेझ होती. भविष्यातील पंतप्रधान म्हणून काँग्रेसचे कार्यकर्ते त्यांच्याकडे पाहात होते. त्यामुळे कोणत्याही निवडणुकीत काँग्रेसच्या उमेदवारांकडून त्यांच्या प्रचारसभांची मागणी केली जायची. पण प्रियांका वढेरा यांच्या प्रचारसभांमुळे कुठे काँग्रेस उमेदवार जिंकले, असे कधी झाले नाही. राहुल गांधी वारंवार अपयशी ठरत असल्यामुळे काँग्रेसचे नेतृत्व प्रियांकाकडे सोपवण्याची मागणीही काँग्रेस पक्षात अधूनमधून केली जात होती. आता त्या स्वत:च लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरल्यामुळे त्यांच्यासमोरील आव्हान वाढले आहे. वायनाडमध्ये प्रियांका जिंकल्या तर काँग्रेसमधील अंतर्गत समीकरण काही प्रमाणात बदलतील. काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये जोश निर्माण होईल. पण यदाकदा आपल्या पहिल्याच निवडणुकीत त्या जिंकू शकल्या नाही तर राजकारणात राहायचे की नाही, याचा विचार त्यांना करावा लागेल. प्रियांका निवडून येण्यासाठी काँग्रेस पक्ष आपली पूर्ण ताकद पणाला लावेल, तर दुसरीकडे त्या जिंकू नये म्हणून भाजपा जिद्दीने कामाला लागेल. त्यामुळे वायनाड मतदारसंघातील यावेळची पोटनिवडणूक अतिशय चुरशीची आणि देशाचे लक्ष वेधणारी राहणार यात शंका नाही.

९८८१७१७८१७

### ताबडतोब उमेदवार कशाला हवेत? फक्त तिकिटासाठी?

महाराष्ट्र विधानसभा निवडणुका जाहीर झाल्या अन् आचारसंहिता लागू झाली. विविध राजकीय पक्षांनी आजी/माजी तसेच नवोदित उमेदवार हेरले. खरे तर या पक्षांनी प्रत्येक मतदार संघातील आपले उमेदवार आधीच जाहीर करायला हरकत नसावी. पण अनेक वेळा, अनेक वर्षे लोकप्रतिनिधी राहिलेले ज्येष्ठ महाभाग पक्षाने उमेदवार म्हणून नाव जाहीर न केल्यामुळे लगेच दुसरा मार्ग शोधायला लागताना दिसत आहेत. सगळ्यात सोपा मार्ग म्हणजे पक्षांतर करणे... अर्थातच तिकीट मिळणार असे वचन मिळाले असेल तरच! दुसरी तडजोड म्हणजे जागा उपलब्ध असते, पण ती गटातील दुसऱ्या पक्षाला आवंटित झालेली असते. मग काय? एका पक्षाचा राजीनामा व दुसऱ्या पक्षात प्रवेश आणि तिकीट हातात! स्थापित सदनातील आमदारांना पक्षांतर बंदी कायदा लागू होतो. त्याच प्रकारे अशा निवडणूकपूर्व पक्षांतरास पण काही तयार करणे आवश्यक आहे, असे वाटू लागले आहे. उमेदवार ज्या पक्षाचा अधिकृत एबी फॉर्म सादर करणार असेल, त्या पक्षाचे अधिकृत सदस्यत्व घेऊन किमान तीन महिने तरी झाले असावेत, अशी अट घालावी. निवडणूक आयोग, कायदा विभाग अशांनी लक्ष घालून तत्संबंधी नियमावली व मर्यादा घालून द्याव्यात. नाहीतर 'झट मंगनी पट ब्याह' अशा उड्या मारणारे उमेदवार काय कामाचे? जनतेनेही अशा कुंपणावरील, संधिसाधू उमेदवारांबाबत आपले मत विचारपूर्वक नोंदलेले बरे! पण या उडी मारण्यावर काही बंधने आवश्यक आहेत, असे मात्र मनापासून वाटते. उत्तम म्हणजे किती टर्म्स लोकप्रतिनिधी राहता येते, यावरच बंधन घातले पाहिजे.

**प्रमोद बापट**/पुणे

●● ●●

### भरतीचा वांधा; तरीही मास्तरकीचा नाद सुटेना...

राज्यात जून २०१२ पासून शिक्षक भरतीवर बंदी घालण्यात आली होती. तब्बल सहा वर्षांनंतर २०१८ साली

## वाचक पत्रे

शिक्षकांच्या रिक्त जागांचा विचार करता महाराष्ट्र राज्य सरकारने पवित्र पोर्टलची निर्मिती करून शिक्षक अभियोग्यता चाचणीच्या आधारे शिक्षकांची पदे भरण्यास सुरुवात केली होती. पण जाचक संच मान्यतेच्या अटींमुळे शाळा व कनिष्ठ महाविद्यालये बंद पडली व काही शिक्षक हे अतिरिक्त ठरल्यामुळे त्यांचे समायोजन करण्यास सुरुवात झाली. शिक्षक भरती रखडली गेली. राज्यात गेल्या पाच-सहा वर्षांपासून तब्बल ३० हजार शिक्षकांची पदे भरली जाणार असल्याच्या घोषणा करण्यात आल्या; प्रत्यक्षात केवळ १० ते १५ हजारच शिक्षकांची भरती करण्यात येईल, असे सरकारमार्फत सांगण्यात आले. २०१२ ते २०२४ या कालखंडात शिक्षकी पेशात केवळ १० ते १५ हजार शिक्षकांची नियुक्ती झाली. दरवर्षी किमान ५० हजारांवर विद्यार्थी शिक्षक पात्रता पूर्ण करतात. यंदा मात्र तब्बल ५२ हजारांच्या वर विद्यार्थ्यांना शिक्षक व्हायचे आहे. त्यामुळे शासनाकडून अपेक्षित शिक्षक भरती होत नसतानाही विद्यार्थ्यांचा भरतीचा नाद सुटत नसल्याचे त्यांच्या बी. एड. व डी. एड.च्या नोंदणीवरून दिसून येत आहे. अभियोग्यता व बुद्धिमान चाचणीतील उमेदवार शिक्षक भरतीसाठी पात्र असतानाही नव्याने दुसरी अभियोग्यता व बुद्धिमान चाचणी घेण्यात आली. त्याचा निकालही जाहीर करण्यात आला तसेच शिक्षक भरतीचे वेळापत्रकही जाहीर करण्यात आले. परंतु का कोणास ठावूक, पुन्हा एकदा शिक्षक भरती रखडून ठेवली. दरम्यान, शिक्षक भरतीसाठी पवित्र पोर्टलवर नोंदणी केलेले किमान तीन लाखांहून अधिक उमेदवार शिक्षक भरतीच्या प्रतीक्षेत आहेत. यंदा बी. एड. अभ्यासक्रमासाठी ४२५ महाविद्यालयांमध्ये ३१ हजार ५३५ जागा उपलब्ध आहेत. त्यासाठी तब्बल ५२ हजार ९९८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे तर ४९ हजारांच्या वर विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत. यातील ४५ हजार विद्यार्थ्यांनी अर्जाची पडताळणी केली आहे. ३५ हजार विद्यार्थ्यांनी महाविद्यालयांचा पसंतिक्रम लॉक केले आहेत. यामधील सहा हजार विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. त्यामुळे एका बाजूला शिक्षक भरतीची प्रक्रिया कासवगतीने सुरू असताना दुसऱ्या बाजूला शिक्षक होण्यासाठी विद्यार्थ्यांच्या मात्र उड्यावर उड्या पडत असल्याचे चित्र दिसत आहे. म्हणूनच म्हणावेसे वाटते... 'भरतीचा वांधा, तरीही मास्तर व्हायचा नाद काही सुटेना...'

**प्रा. सचिन जाधव**/८४२५००३१२७

●● ●●

### कार्यकर्त्यांचे समुपदेशन

निवडणुकीचे वारे सर्वत्र वाहत आहेत. महाराष्ट्र विधानसभा निवडणुका या महायुती व महाविकास आघाडी या दोन महत्त्वाच्या गटामध्ये होणार हे निश्चित. सध्याच्या संक्रमण काळात हिंदू समाजाचे म्हणून एक होऊन लढणाऱ्या महायुतीचे उमेदवार जवळपास अंतिम झाले असून काही क्षेत्रांचे उमेदवार ठरायचे आहेत. अशात ही सीट भाजपाला, ती सीट अमुकाला यात कार्यकर्ते प्रचंड तणावात आहेत. आमच्या अमुकाला तिकीट मिळाल्यास अपक्ष लढू म्हणणारे जोर धरताहेत. अशावेळी महायुतीच्या समजदार कार्यकर्त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांचे नीट समुपदेशन करावे. राजकीय क्षेत्र वाद, झगडा, हाणामाऱ्या यासाठी ओळखले जाऊ नये.

**रणदीप बिसने**/७७९८१२३६९९

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# निर्धार पक्का निवडणूक लढणार आणी जिंकणारच-आ.लक्ष्मण पवार

# जो पर्यंत पंडितांची जुलूमशाही संपत नाही, तो पर्यंत मैदान सोडणार नाही-आमदार पवार यांनी जाहीर केली भूमिका

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२४ ऑक्टोबर**

गेवराई मतदारसंघातून, जो पर्यंत पंडितांची जुलूमशाही संपत नाही. तो पर्यंत , मैदान सोडणार नाही. विकास कामाच्या माध्यमातून जनतेसमोर जाणार असून, मतदारसंघातील माझ्या कार्यकर्त्यांच्या जीवावर अपक्ष म्हणून निवडणूक लढविणार असून, काहीही झाले तरी, मागे हटणार नाही. अशी घोषणा आमदार लक्ष्मण पवार यांनी येथे बोलताना केली आहे.

गेवराई मतदारसंघाचे आमदार लक्ष्मण पवार यांनी गुरूवार ता. २४ रोजी सकाळी अकरा वाजता कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत अपक्ष निवडणूक लढविणार असल्याचे जाहीर केले. यावेळी, कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणा करून, परिसर दणाणून सोडला. बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे आणि बीडच्या भाजपाने जाणीवपूर्वक डावलून विकासात अडथळा निर्माण केल्याचा आरोप आ. पवार यांनी केला होता. त्यानंतर त्यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेतली. महाविकास आघाडीकडून त्यांना तिकिट मिळणार असल्याचे चित्र निर्माण झाले होते. मात्र, महाविकास आघाडीचा घटक पक्ष असलेल्या उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून माजी मंत्री बदामराव पंडित यांना उमेदवारी जाहीर केली. त्यामुळे,आमदार पवार यांच्या भूमिकेकडे लक्ष लागले होते. गुरूवार ता. २४ रोजी आमदार पवार यांनी कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात भूमिका जाहीर करून, अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढविणार असल्याचे जाहीर केले. गेवराई मतदारसंघातील कार्यकर्त्यांनी आपली भावना व्यक्त करून, आमदार पवार यांनी अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक रिंगणात उभे राहावे. आम्ही जीवाचे रान करून तुम्हाला निवडून आणू ,असा शब्द दिला. दहा वर्षापासून आमदार पवार यांनी केलेली विकास कामे. जनतेसमोर ठेवून मते मागू आणि आमदार पवारांना निवडून आणू , असा निर्धार कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे. आ. लक्ष्मण पवार यांच्या मळ्यात गेवराई मतदारसंघातील कार्यकर्त्यांची बैठक पार पडली. यावेळी, कार्यकर्त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. आमदार पवार यांनी माघार घेऊ नये, असे आवाहन केले. आमदार पवार यांनी आपली भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, पंधरा महिन्यात माझी तब्येत चांगली नाही. म्हणून, सार्वजनिक कार्यक्रमात आलो नाही. पण, विकासाच्या कामासाठी एक ही बैठक सोडली नाही. तब्येतीकडे दूर्लक्ष करून शासकीय बैठकीला गेलो. म्हणून, विकास कामे झाली आहेत. एका दिवसात विकास निधी येत नाही. हे सर्व सामान्य माणसाला सुद्धा कळते.दहा वर्षात राजकारण बदलले आहे. असे वाटत असतानाच, पंडितांची दादागिरी संपलेली नाही. त्यामुळे, काही गोष्टी सोडता येत नाहीत. जनतेला, कार्यकर्त्यांना उघड्यावर सोडले तर देव सुद्धा मला माफ करणार नाही. अशी भावनिक साद ही आमदार पवार यांनी यावेळी बोलताना घातली. कार्यकर्त्यांची मान आमच्या खांद्यावर आहे. त्या गोष्टीचा आम्हाला कधीच विसर पडणार नाही. मात्र, माझी तब्येत ठीक नाही.दोन महिन्यांपासून पायाला जखम झाली आहे. ती अजून ही बरी झाली नाही. एक दोन दिवसात डॉक्टरांनी बोलावले आहे. फार दगदग होणार नाही. तरीही, राहीलेल्या दिवसात, मी स्वतः दिडशे गावात जाईल. पण, तुम्ही सर्वजण उमेदवार आहात ,असे समजून प्रचार करा.

विरोधक भांडवल करतील, कुठेत उमेदवार ? खर सांगतो, मी अनेक गावात गेलो ही नसेल. शिवराज बाळराजे पवार, गिताभाभी यांनी जनतेला वेळ दिला. पण, मी विकास कामात कुठेही कमी पडलो नाही. मते पडली नाहीत म्हणून, त्या गावात विकास केला नाही. असा विचार मी केला नाही. उलट त्या गावांना ही निधी दिला आहे. आजारी असून ही, कर्तव्य म्हणुन सरकार दरबारी बैठकांना गैरहजर राहीलो नाही. त्या बैठकीत गेलो. मतदारसंघातील कामांचा पाठपुरावा केला. म्हणून, मतदारसंघात विकास कामे झाल्याचे आमदार लक्ष्मण पवार यांनी यावेळे सांगितले. सोबत असलेल्या कार्यकर्त्यांच्या जीवावर अपक्ष म्हणून निवडणूक लढविणार आणि जिंकणार, असा विश्वास ही आमदार पवार यांनी शेवटी बोलताना व्यक्त केला. यावेळी कार्यकर्त्यांसह पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.



## धनंजय मुंडे यांनी भरला उमेदवारी अर्ज



**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२४ ऑक्टोबर**

कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी आपल्या भगिनी तथा विधान परिषद सदस्य आ. पंकजाताई मुंडे, माजी खासदार डॉ.प्रीतमताई मुंडे यांच्यासह परळी मतदारसंघातील लाडक्या बहिणींच्या सोबतीने आपला उमेदवारी अर्ज आज परळी येथील तहसील कार्यालयात दाखल केला आहे.

धनंजय मुंडे यांनी साध्या पद्धतीने, कोणतेही शक्ती प्रदर्शन न करता दुपारी १ वाजेच्या दरम्यान आपला उमेदवारी अर्ज दाखल केला, यावेळी स्वतः आ.पंकजाताई मुंडे यांनी सुचकाची भूमिका निभावली. अर्ज दाखल करण्यापूर्वी नाथरा येथील निवासस्थानी धनंजय मुंडे यांचे त्यांच्या मातोश्री रुक्मिणीबाई पंडितराव मुंडे यांनी औक्षण करून आशीर्वाद दिले. यावेळी सौ. राजश्रीताई धनंजय मुंडे व धनंजय मुंडे यांच्या ज्येष्ठ भगिनी शकुंतलाताई केंद्रे या उपस्थित होत्या. त्यानंतर धनंजय मुंडे यांनी नाथरा येथील ग्रामदैवताचे दर्शन घेऊन गोपीनाथराव मुंडे यांच्या स्मृतीस्थळी पांगरी येथील गोपीनाथ गडावर जाऊन स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेब यांना नमन केले.

परळी शहरात आल्यानंतर बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या प्रभू वैद्यनाथांच्या मंदिरात जाऊन विधिवत पूजन करून धनंजय मुंडे यांनी दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले. त्यानंतर पिता स्वर्गीय पंडित अण्णा मुंडे यांच्या कनेरवाडी परिसरातील समाधीस्थळी जाऊन अभिवादन करत आशीर्वाद घेतले.

परळी शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा त्याचबरोबर रेल्वे स्थानक परिसरातील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर धनंजय मुंडे हे आपल्या भगिनी आ.पंकजाताई, डॉ.प्रीतम ताई यांसह सहकाऱ्यांच्या समवेत तहसील कार्यालयात अर्ज सादर करण्यासाठी दाखल झाले.

## बाबरी मुंडे यांचा उमेदवारी अर्ज दाखल



**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२४ ऑक्टोबर**

माजलगाव विधानसभा मतदारसंघात गुरुवारी राजकीय गरमागरमीचा दिवस ठरला. गोपीनाथ गडाच्या पायथ्याशी लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या समाधीचे दर्शन घेत हजारो युवकांसोबत शक्ती प्रदर्शन करत फुलचंद उर्फ बाबरी मुंडे यांनी गुरुवारी दुपारी गुरुपुष्यामृत मुहूर्तावर माजलगाव येथे अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला.

गुरुवारी सकाळी पाच वाजता परळी येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करत फुलचंद उर्फ बाबरी मुंडे यांनी गोपीनाथ गडावरील लोकनेते गोपीनाथ मुंडे साहेब यांच्या समाधीचे दर्शन घेतले.श्रीक्षेत्र बाभळगाव हनुमान मंदिर , माता आंबा चोंडी देवी दर्शन धारूर, श्रीक्षेत्र चारदरी हनुमान मंदिर, संत श्रेष्ठ भगवान बाबा दर्शन कोठरबन , श्रीक्षेत्र चिंचवन, मकृध्वज मंदिर दर्शन, चौंडेश्वरी मंदिर वडवणी दर्शन, राजा हरिश्चंद्र पिंपरी येथे हरिश्चंद्र मंदिर दर्शन, पात्रुड येथे हजरत ख्वाजा मगदूम अन्सारी दर्गा, शुक्लतिर्थ निमगाव येथे राजमाता अहिल्यादेवी होळकर , खरात आडगाव येथे श्री सावता महाराज मंदिर व महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यास अभिवादन, माजलगाव शहरातील जुना मोंढा येथे कै . वसंतराव नाईक साहेब, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास अभिवादन केले,श्रावस्ती बुद्ध विहार वंदन करत हजारो नवयुवकांच्या उपस्थितीत निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय,तहसील माजलगाव येथे माजलगाव मतदार संघाच्या उमेदवारीचा अपक्ष अर्ज दाखल केला. यावेळी माजलगाव विधानसभा मतदारसंघातील हजारो नवतरुणांसह विविध जाती धर्मातील कार्यकर्ते बाबरी मुंडे यांच्या समवेत उपस्थित होते.

## माजलगावात गो शाळेच्या वतीने स्वस्ता मध्ये दिवाळी फराळाची विक्री

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२४ ऑक्टोबर**



माजलगाव येथील कमलाबाई मुंदडा गोशाळेच्या वतीने अल्पशा नफ्यावर माजलगावकरांसाठी प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी दिवाळी फराळाचे आयोजन करून विक्री चालू करण्यात आली आहे.

या दिवाळी फराळाच्या विक्री तुन गो शाळेस आर्थिक मदत होऊन गाईच्या चाऱ्यांचा प्रश्न मार्गी लागुन माजलगावकरांच्या हातुन सामाजिक कार्य घडावे हा मुख्य हेतू या मधे साद्या होवून गोशाळे ची प्रगती होवी.

उपक्रम मागील ८ वर्षा पासून हा अविरतपणे चालू आहे.यातील खाद्यपदार्थ स्वादिष्ट व रुचकर असतात तसेच स्वच्छतेचे सर्व बाबी लक्षात घेऊन हे पदार्थ बनवतात.

माजलगावकर या गोशाळा च्या वतीने आयोजित केलेल्या दिवाळी फराळ खरेदीसाठी गर्दी करतात.बाहेर गावारून या दिवाळी फराळाची खरेदी कराण्यासाठी लोक येतात.हा जुना मोंढा, माजलगाव येथील गणपती मंदिर येथे स्टॉल सकाळी ९ते रात्री ९ पर्यत चालू असतो.या दिवाळी फराळा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी गो शाळा समिती व गोशाळाचे कार्मचारी अहोरात्र परिश्रम घेतात.

### अनुवंशिक बदलातील परीमान शोधणारे जीवरासायनिक विश्लेषक यंत्र

## डॉ.नवनाथ काशीद यांना युकेचे पेटेंट

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२४ ऑक्टोबर**



श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था आडस संचलित, बाबुरावजी आडसकर महाविद्यालय केज, येथील वनस्पतीशास्त्र विषयातील वरिष्ठ प्राध्यापक डॉ. नवनाथ काशीद, यांच्या नावीन्यपूर्ण अशा अनुवंशिक बदलातील परिमाण शोधणारे जीव रासायनिक विश्लेषक यंत्र या नवनिर्मित उपकरणास णघ युनायटेड किंग्डम कडून पेटंटच्या माध्यमातून मान्यता देण्यात आलेली आहे. डॉ.नवनाथ काशीद व त्यांचे सहकारी यांच्या संयुक्त उपक्रमातून प्राणी व वनस्पती मधील घडून येणार अनुवंशिक बदल, त्याचे परिमाण शोधण्यासाठी जीव रासायनिक विश्लेषक यंत्र याची निर्मिती केली आहे. या यंत्राच्या उपयोगाने संशोधक विद्यार्थी, प्रयोगशाळा मध्ये कार्यरत असणारे अध्ययनार्थी यांना हे सर्व बदल एकच विश्लेषक यंत्राच्या माध्यमातून शोधणे सोयीस्कर होणार आहे . डॉ नवनाथ काशीद व त्यांच्या सहकारी संशोधक बांधवांचे संस्थेच्या वतीने श्री रमेशरावजी आडसकर , सचिव श्रीमती अर्चनाताई आडसकर संचालिका, श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था आडस तसेच बाबुरावजी आडसकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव फावडे व सर्व कर्मचारी प्राध्यापक बंधूंच्या वतीने अभिनंदन करण्यात आले आहे.

## माधव तात्या निर्मळ यांचा विधानसभा उमेदवारी अर्ज दाखल



**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.२४ ऑक्टोबर**

२४ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या एकतेच्या विचारांच्या प्रेरणेने, ऐतिहासिक परंपरेचे पालन करत, माधव तात्या निर्मळ यांनी आज माजलगाव विधानसभा मतदारसंघातून विधानसभा निवडणुकीचा अर्ज दाखल केला. या संदर्भात त्यांनी विविध सामाजिक व ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांना श्रद्धांजली अर्पण केली.

निवडणुकीपूर्वीची त्यांची ही तयारी त्यांच्यासाठी एक महत्वपूर्ण क्षण आहे. त्यांनी त्यांच्या आदर्श मानलेल्या शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहू, फुले, आणि अन्य समाज सुधारकांची मनोभावे स्मृती केली. माधव तात्या निर्मळ यांनी माजलगाव लोकांच्या कल्याणासाठी तळमळणारे विचार व्यक्त केले.

अर्ज दाखल करण्याच्या यावेळी, त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. बेहेर, गोपीनाथ गड येथे नतमस्तक होऊन स्व. गोपीनाथरावजी मुंडे यांच्याकडून आशीर्वाद घेतले, तसेच स्व. वसंतरावजी नाईक यांना श्रद्धांजली अर्पण केली.

त्यांनी माजलगावातील हनुमान मंदिरात महाआरती करून दर्शन घेतले व हजरत ख्वाजा मखदुंम अन्सारी दर्गा पात्रुड येथे चादर अर्पण करून आशीर्वाद घेतले. जनतेच्या आशीर्वादाने आज माझा उमेदवारी अर्ज दाखल झाला आहे. मी विनंती करतो की, जनता माता माऊलींनी माझ्या कामात मला मतदान रुपी आशीर्वाद देवो, जेणेकरून मी माजलगाव विधानसभा मतदारसंघाच्या सर्वसामान्य जनतेसाठी काम करू शकेन, असे माधव तात्या निर्मळ यांनी म्हटले.या निवडणुकीत त्यांच्या कार्यपद्धतीवर जनतेचा विश्वास असू शकतो, हे त्यांनी त्यांच्या कार्यकाळात अनेक सामाजिक व राजकीय उपक्रमांच्या माध्यमातून सिद्ध केले आहे.

## समाज जागृतीतून होते राष्ट्राची सुधारणा-निरगुडकर

### साहित्य निकेतन ग्रंथालयाचा उपक्रम ; उध्दवराव आपेगांवकर यांच्या पखवाज वादनाने श्रोते मंत्रमुग्ध

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२४ ऑक्टोबर**

आज समाजात संघ भावना राहिली नाही, अशी खंत व्यक्त करून डॉ.निरगुडकर यांनी प्रत्येकजन माझे कुटूंब व त्याचा वैयक्तिक विकास या गोष्टीवरच लक्ष केंद्रीत करतो आहे. त्याचा परिणाम सांघिक भावना ढासळली आहे. आज समष्टी विकासाऐवजी वैयक्तिक विकासाकडेच वाटचाल सुरू आहे, हे चित्र बदलले गेले पाहिजे, संघ भावना वाढीस लागावी यासाठी जाणिवपूर्वक प्रयत्न झाले पाहिजेत अशी अपेक्षा व्यक्त करून समाज जागृतीतून होते राष्ट्राची सुधारणा असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार डॉ.उदय निरगुडकर यांनी केले. ते अंबाजोगाईत बोलत होते.

शहरातील साहित्य निकेतन ग्रंथालय, अंबाजोगाई यांच्या वतीने प्रसिद्ध पत्रकार तथा अभ्यासू वक्ते उदय निरगुडकर यांच्या व्याख्यानाचे व जागतिक किर्तीचे पखवाज वादक उध्दवराव बापू आपेगांवकर यांच्या मंगलमय पखवाज वादनाचे आयोजन मंगळवार, दिनांक २२ ऑक्टोबर रोजी करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खोलेश्वर शैक्षणिक संकुलाचे कार्यवाह किरण कोदरकर तर व्यासपीठावर साहित्य निकेतन ग्रंथालयाचे कार्यवाह शंतनू हिरळकर हे होते. प्रारंभी दीपप्रज्ज्वलन आणि भारतमातेच्या प्रतिमापूजनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचे स्वागत दीनदयाळ बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की, शंतनू हिरळकर, अमोल जड व अक्षय खडके यांनी केले. सुरूवातीला पं.उध्दवराव बापू आपेगांवकर यांनी पखावज वादनाचा इतिहास, महत्त्व विशद केले. पखावज वादन क्षेत्रात आपण दादागुरू मख्खनजी भैय्या, पद्मश्री शंकरराव आपेगांवकर यांची परंपरा पुढे चालवत आहोत हे सांगून त्यांनी परण, पदन्यास, निकास, चाल, नाद, गजर, शब्दांचे वजन आणि लयकारी याबाबत माहिती देत. सुश्राव्य पखावज वादनाने उपस्थित रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. त्यानंतर प्रास्ताविक करताना शंतनू हिरळकर यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झालेले अंबाजोगाईतील वैभवशाली ग्रंथालय साहित्य निकेतनने नुकतेच ८० व्या वर्षांत पदार्पण केले आहे. त्यानिमित्त समाजामध्ये पुस्तक प्रेम वृद्धिंगत व्हावे, समाजातील सांस्कृतिक व चिंतनशील विचारांची देवाण - घेवाण वाढावी या हेतूने साहित्य निकेतन ग्रंथालय आपल्या परीने विशेष प्रयत्न करीत आहे. अशाच एक प्रयत्नांतून यावर्षी ऑगस्ट महिन्यात गीत रामायणाचे रचयिते व प्रख्यात साहित्यिक, कवी, गीतकार ग.दि.माडगूळकर यांच्या सिद्धहस्त लेखणीतून उतरलेली रसाळ कृष्ण कथा गीत गोपालचा संगीतमय कार्यक्रम आयोजित केला होता. त्याला अंबानगरीतील सुजाण नागरिक, रसिक श्रोत्यांनी भरभरून प्रतिसाद दिला होता. पुन्हा एकदा असाच एक वेगळा विषय घेऊन आज आम्ही आपल्यासमोर आलो आहोत असे हिरळकर यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोप करताना किरण कोदरकर यांनी साक्षरतेचे प्रमाण जास्त असलेल्या ठिकाणी मतदानाची टक्केवारी कमी तर जिथे विकास पोहोचला नाही अशा मागास भागात मतदानाची टक्केवारी अधिक आहे याकडे सभागृहाचे लक्ष वेधले. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून 'विकसित भारतासाठी महाराष्ट्राचे योगदान' या विषयावर बोलताना डॉ.निरगुडकर म्हणाले की, पुढील पाच वर्षात विकास दर व नाविन्यतेची गती कायम ठेवली तर विकसित भारत व्हायला आणि ते आपण प्रत्यक्ष पाहायला वेळ लागणार नाही, आताचा भारत बदलला आहे. २०४७ मध्ये हाच भारत अधिक सामर्थ्यवान राहील, असा विश्वास व्यक्त करून डॉ.निरगुडकर म्हणाले, नीती, गती, दिशा हे केंद्रबिंदू मानून विद्यमान केंद्र सरकारने देशवासियांचा विश्वास संपादन केला आहे. पारंपरिक उद्योगाला नाविन्यतेची जोड देणे गरजेचे आणि त्यासाठी संघटितपणे प्रयत्न व्हायला हवेत, धैर्यवान अन् बलशाली समाजच बलवान राष्ट्र निर्मितीस कारणीभूत ठरणार आहे असे सांगून डॉ.निरगुडकर यांनी सद्य:स्थितीवर अत्यंत परखडपणे मते व्यक्त केली. यथा राजा तथा प्रजा हे सूत्र आता राहिलेले नाही, तर यथा प्रजा तथा राजा हे लोकशाहीचे वैशिष्ट्य ठरले आहे, असे ते म्हणाले. समाज व्यवस्थेत स्वतःवरच्या जबाबदार्या पध्दतशीरपणे झटकण्याचे काम प्रत्येकामार्फत दिवसेंदिवस सुरू आहे. ते एवढे की, राज्य व देश चालविण्याकरीता सुध्दा ठेकेदारी दिल्याचा आव समाज आणतो आहे. त्यातून स्वतःची जबाबदारी समाज पध्दतशीरपणे टाळतो आहे. समाजाचे हे वर्तन पूर्णतः चुकीचे आहे. समाज दिवसेंदिवस अलिप्तवादी भूमिका घेतो आहे. त्यातून अनेक प्रश्न उद्भवत आहेत, चिघळत आहेत. समाजाने अलिप्तवादीपणाचे धोरण सोडले पाहिजे, सक्रियता वाढवली पाहिजे, समाजाभिमुख विषयांमध्ये लक्ष केंद्रीत केले पाहिजे, वेळप्रसंगी रोखठोक भूमिका घेतल्या पाहिजेत, जाब विचारला पाहिजे, तरच सुधारणेकडे आपण वाटचाल करू, आमूलाग्र असा बदल करू, असा विश्वास व्यक्त करतेवेळी निरगुडकर यांनी आज समाजात संघ भावना राहिली नाही, अशी खंत व्यक्त केली. प्रत्येकजण माझे कुटूंब व त्याचा वैयक्तिक विकास या गोष्टीवरच लक्ष केंद्रीत करतो आहे. त्याचा परिणाम सांघिक भावना ढासळली आहे. आज समष्टी विकासाऐवजी वैयक्तिक विकासाकडेच वाटचाल सुरू आहे, हे चित्र बदलले पाहिजे, संघ भावना वाढीस लागावी यासाठी जाणिवपूर्वक प्रयत्न झाले पाहिजेत, अशी अपेक्षाही व्यक्त केली. विकसित राष्ट्राची संकल्पना विकसित समाजाशिवाय कदापिही शक्य नाही, असे स्पष्ट करतेवेळी डॉ.निरगुडकर यांनी सत्तेतून विकास होण्यापेक्षापेक्षा समाज जागृतीतून राष्ट्राची सुधारणा हीच शाश्वत सुधारणा आहे, असे म्हटले. जपान, जर्मनी, इंग्लंड आदी देश याचे उत्तम उदाहरण आहे, असे ते म्हणाले.

# महायुतीच्या दोन उमेदवारांनी दाखल केले नामनिर्देशन पत्र

## भाजपचे तान्हाजी मुटकुळे, काँग्रेसकडून भाऊराव पाटील गोरेगावकर, कळमनुरीतून शिवसेनेचे संतोष बांगर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ आक्टोबर**



जिल्ह्यातील हिंगोली आणि कळमनुरी येथील तीनही विधानसभा मतदारसंघातून महायुतीचे दोन उमेदवारांनी दुपारी त्यांचा उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यामध्ये हिंगोली विधानसभा मतदारसंघातून भारतीय जनता पक्षाचे तान्हाजीराव मुटकुळे, कळमनुरी विधानसभा मतदारसंघातून शिवसेना शिंदे गटाचे संतोष बांगर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. तर महाविकास आघाडीकडून काँग्रेस पक्षाकडून माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर यांनीही उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

गुरूपुष्यामृताचा शुभमुहूर्तावर आज राज्यातील बड्या नेत्यांसह विविध पक्षांच्या उमेदवारानी अर्ज दाखल केले आहेत. हिंगोली जिल्ह्यातील हिंगोली आणि कळमनुरी या दोन विधानसभा मतदारसंघातून महायुतीच्या उमेदवारांनी शक्तीप्रदर्शन करीत उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. भारतीय जनता पक्षाने तीन दिवसांपूर्वीच उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली होती. पहिल्याच यादीत विद्यमान आ. तान्हाजीराव मुटकुळे यांचे नाव जाहीर झाले होते. भारतीय जनता पक्षात अनेकजण इच्छुक होते परंतु पक्षाने पुन्हा एकदा आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्यावरच विश्वास टाकत उमेदवारी दिली. तान्हाजीराव मुटकुळे यांनी शुक्रवार दि २४ आक्टोबर रोजी उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे यांचेकडे उमेदवारी अर्ज दाखल केला यावेळी प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी आ. गजाननराव घुगे, जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, माजी आ. रामराव वडकुते, प्रा दुर्गादास साकळे यांची उपस्थिती होती यावेळी तहसीलदार श्रीकांत भूजबळ यांचीही उपस्थिती होती. तर गुरूवारी शिवसेना शिंदे गटानेही त्यांची पहिली यादी जाहीर केली त्यात विद्यमान आ. संतोष बांगर यांची घोषणा करण्यात आली. शुक्रवारी मोठे शक्तीप्रदर्शन करीत संतोष बांगर यांनी उपविभागीय अधिकारी यांचेकडे उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी भाजपचे मध्यप्रदेशचे आ. मुक्कामसिंग, माजी आ. रामराव वडकुते, भाजपचे जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे यांची उपस्थिती होती. तर राष्ट्रवादी अजित पवार गटानेही गुरूवारी पहिली यादी जाहीर केली त्यात वसमत विधानसभेचे विद्यमान आ. राजू नवघरे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली.





जिल्ह्यातील महायुतीच्या तीनही उमदेवारांची नावे पहिल्याच यादीत घोषीत झाली आहेत. त्यामुळे पक्षनेतृत्वाचा त्यांच्या कामावर निश्चितच विश्वास असल्याचे दिसून आले आहे.

दुसरीकडे महाविकास आघाडीतून कळमनुरी मतदारसंघातून शिवसेना उबाठा गटाकडून पहिल्याच यादीत गुरूवारी आदिवासी नेते तथा माजी आ. डॉ संतोष टारफे यांच्या नाव जाहीर करण्यात आले आहे. परंतु हिंगोली आणि वसमत या दोन्हीही मतदारसंघासाठी काँग्रेस आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या उमेदवाराची नावे अद्याप जाहीर झाली नाहीत. परंतु माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर यांनी काँग्रेसकडून उमेदवारी अर्ज भरला आहे.

दरम्यान, उमेदवारी अर्ज भरण्याची अंतीम तारीख २९ आक्टोबर असून महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेवारांची नावे अद्याप घोषीत झाली नाहीत. परंतु वसमतमधून माजी मंत्री जयप्रकाश दांडेगावकर आणि हिंगोलीतून माजी आ. भाऊराव पाटील यांना उमदेवारी मिळणार असल्याची दाट शक्यता आहे.

# स्थागुशाकडून २ लाख ८९ हजार किंमतीची गांजाची झाडे जप्त

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ आक्टोबर**



कळमनुरी तालुक्यातील बोल्डावाडी शेत शिवारात गांजाची लागवड केल्याची गोपनीय माहीती स्थानिक गुन्हे शाखा आणि आखाडा बाळापूर पोलिसांना मिळाल्यानंतर पथकाने छापा मारला असता शासनाने प्रतिबंधीत केलेली गुंगीकारक वनस्पती गांजाची लहान, मोठी १३९ झाडे ज्यांचे वजन २८ किलो ९६० ग्रॅम असून अंदाजे किंमत २ लाख ८९ हजार ६०० रूपयांची झाडे जप्त केली आहेत.

याबाबत अधिक माहीती अशी की, कळमनुरी तालुक्यातील बोल्डावाडी शेत शिवारात विष्णू जयाजी ढोकणे रा बोल्डा याने त्याच्या शेतात शासनाने प्रतिबंधीत केलेली गुंगीकारक वनस्पती गांजाची झाडे लावली व त्याची जोपासना व संवर्धन करीत असल्याची गोपनीय माहीती स्थानिक गुन्हे शाखा व आखाडा बाळापूर पोलिसांना मिळाली. या माहीतीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेचे पथक आणि आखाडा बाळापूरचे पोनि गुठ्ठे यांच्या पथकाने दोन सरकारी पंच व वजन काटा, तलाठी, कृषी सहायक यांना सोबत घेवून विष्णू ढोकणे यांनी वहीती करीत असलेल्या बोल्डावाडी शेत गट क्र ५८ मध्ये छापा टाकला असत सदर शेतात शासनाने प्रतिबंधीत केलेला गुंगीकारक वनस्पती गांजीच लहान, मोठी १३९ झाडे मिळून आली. सदर झाडे उपटून त्यांचे वजन केले असता २८ किलो ९६० ग्रॅम भरले. ज्याची किंमत अंदाजे २ लाख ८९ हजार ६०० एवढी आहे. घटनास्थळावरून पथकाने विष्णू ढोकणे यांना ताब्यात घेत मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी पोउपनि विक्रम विठूबोने यांच्या तक्रारीवरून आखाडा बाळापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, पोनि विकास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि गुठ्ठे, उपनि विक्रम विठूबोने, अंमलदार प्रेमदास चव्हाण, लिंबाजी वाव्हळे, रवी स्वामी, राजू ठाकूर, किशोर सावंत, विशाल खंडागळे, पवार, चव्हाण यांनी केली आहे.



**हिंगोली– विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी हिंगोली शहर पोलिसांच्यावतीने शहरातील विविध भागातून पोलिसांनी पथसंचलन केले. यावेळी पोलिस निरीक्षक नरेंद्र पाडळकर यांच्यासह पोलिस कर्मचारी उपस्थित होते. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### वेतन, सण अग्रीमांची देयके कोषागारात सादर करा

हिंगोली– राज्याच्या लेखा व कोषागारे संचालनालयाचे संचालक यांनी आभासी बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार वेतन व उत्सव अग्रिम देयाकांबाबत सूचना दिल्या आहेत. त्यानुसार जिल्ह्यातील सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांनी उद्या गुरुवारी २४ ऑक्टोबर २०२४ रोजीच आपली वेतन व उत्सव अग्रिमांची देयके कोषागारात सादर करण्याची दक्षता घ्यावी. त्यानुसार वेतन वेळेवर करणे सोईचे होईल, असे जिल्हा कोषागार अधिकारी यांनी कळविले आहे. २६ ऑक्टोबर ते २९ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत कोषागाराची संगणकीय प्रणाली बंद रहाणार आहे. त्यामुळे या कालावधीत कोणतीही देयके स्वीकारली जाणार नसल्याने वेतन अथवा उत्सव अग्रिमांच्या देयकास विलंब झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील, असे जिल्हा कोषागार कार्यालयाने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

### आचारसंहिता भंगाच्या तक्रारी सीव्हीजील ॲप, १९५० वर नि:शुल्क वर दाखल करण्याचे आवाहन

हिंगोली– जिल्ह्यामध्ये विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीची आचारसंहिता लागू झाली आहे. या काळात आदर्श आचारसंहितेचे भंग झाल्यास सी–व्हीजील ॲपवर तसेच १९५० या नि:शुल्क क्रमांकावर नागरिकांनी तक्रार करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी केले आहे. विधानसभा सार्वत्रिक निवडणूक–२०२४ निवडणुकीसाठी भारत निवडणूक आयोग यांच्याकडून १५ ऑक्टोंबरला घोषणा करण्यात आल्यामुळे संपूर्ण महाराष्ट्र राज्यात व जिल्ह्यात आदर्श आचासंहिता लागू झाली आहे. आचारसंहिता लागू झालेल्या दिनांकापासून जिल्ह्यात निवडणूक संदर्भात आदर्श आचारसंहितेचा भंग होत असल्यास नागरीकांनी सी–व्हीजील पद्वारे तसेच १९५० या टोल फ्रि क्रमांकावर फोन करून तक्रारी दाखल करु शकतात. सदरील तक्रारीचे फिल्डस्तरावरील एफएसटी टिमद्वारे प्राप्त तक्रारींची शहानिशा करून तक्रार १०० मिनिटांत निकाली काढण्यात येते. त्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हा नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले आहे. नागरीक सी–व्हीजील पद्वारे जर कोणी बंदुक/पिस्तुल प्रदर्शन करणे, दारु वाटप, पैसे वाटप, सरकारी मालमत्तेचे विद्रुपन, बनावट बातमी, मतदारांची वाहतूक, भेटवस्तू वाटप, पेड न्यूज, जातीत तेढ निर्माण करणारे भाषण, धमकी इत्यादी बाबत प्रकार होत असल्यास अशा घटनांचे सी–व्हीजील ॲपद्वारे फोटो, व्हिडीओ तसेच ऑडिओ रेकॉर्ड करून ऑनलाईन तक्रारी दाखल करू शकतात. नागरिकांनी या सुविधांचा वापर करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी श्री. गोयल यांनी केले आहे.

### ३५ वाहनचालकांवर पोलिसांची कार्यवाही

हिंगोली– अवैध वाहतुक करणारे तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ३५ वाहनचालकांवर जिल्ह्यात विविध पोलिस ठाण्यांतर्गत कार्यवाही करण्यात आली असून त्यांचेकडून २५ हजार २०० रूपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

# जिल्ह्यातील विद्यार्थी पालकांना देणार मतदानाचे भेटकार्ड



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ आक्टोबर**

जिल्ह्यात महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू झाली असून, २० नोव्हेंबरला होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी स्विप समिती वेगवेगळे उपक्रम राबवत आहे. दिवाळी सणाची आणि सुट्ट्यांची चाहूल विद्यार्थ्यांना लागली असताना दिवाळी भेट कार्ड मोठ्या प्रमाणात ते तयार करून भेट देत असतात. हाच धागा पकडून शालेय–महाविद्यालयीन विद्यार्थिनींनी पालकांना निवडणुकीवर विविध प्रकारचे भेट कार्ड तयार करून भेट देण्याचे आवाहन जिल्हा स्वीप नोडल अधिकारी प्रशांत दिग्रसकर आणि संदीप सोनटक्के यांनी यावेळी केले आहे.

विद्यार्थ्यांनीस्वत:निवडणूक विषयाच्या अनुषंगाने बनवलेले भेट कार्ड पालकांना देतानाचे फोटो प्रसार माध्यम, समाज माध्यमावर प्रसारित करण्याचेही आवाहन यावेळी करण्यात आले आहे. मी मतदान करणार शश्रशलींळेप २०२४ इत्यादी हॅशटॅग वापरण्याचेही सांगण्यात आले आहे. बहुसंख्येने आणि नाविन्यपूर्ण भेट कार्ड बनवण्यासाठी प्रेरित करणाऱ्या केंद्रप्रमुखांना जिल्हाधिकारी यांच्या स्वाक्षरीच्या प्रमाणपत्राने गौरविण्यात येणार असल्याचेही जिल्हा स्विप नोडल अधिकारी प्रशांत डिग्रसकर व संदीप सोनटक्के यांनी सांगितले आहे.

# वसमतच्या लायन्स क्लब प्राईडचा पदग्रहण सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**कुरूंदा, २४ आक्टोबर**



वसमत येथे लायन्स क्लब प्राईडचा पदग्रहण सोहळा गुरूवारी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी वसमत येथील नवीन पदाधिकाऱ्यांचा सत्कारही करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ मोहन देशमुख तर प्रमुख पाहुणे व मार्गदर्शन म्हणून गिरीश सिसोदीया, रवी कडगे, सौ पारूल जैन, दिलीप मोदी, राजेश दागडीया, ऋषीकेश नेरलकर, प्रवीण देशमुख आदींची उपस्थिती होती.

यावेळी डॉ मोहन देशमुख यांनी प्रास्ताविकात लायन्स क्लबची पार्श्वभूमी सांगून कार्यप्रणालीची ओळख करून दिली. वसमत लायन्स क्लबचे अध्यक्ष योगेश चेपूरवार यांनी लायन्स क्लब आपल्या कार्याच्या रूपाने वेगळी ओळख निर्माण करेल असा आशावाद व्यक्त केला. तर जितेश लोलगे यांनी या माध्यमातून गरजूंची सेवा करण्याची संधी मिळणार असल्यामुळे आनंद व्यक्त केला.

यावेळी प्रातिनिधीक स्वरूपात वसमत येथील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना मान्यवरांच्याहस्ते शैक्षणिक साहीत्याचे वाटप करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय स्तरावर निवड झालेला व्हॉलीबॉल खेळाडू कृष्णा उमराव बुचाले व प्रशिक्षक कुणाल बोबडे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ सन्नाउला खान, डॉ सागर सातपुते, डॉ वैभव पडोळे, संदीप चव्हाण, ॲड अरूण अंबेकर, संजीवकुमार बेंडके, डॉ हरीश गोयंका, ॲड प्रदीप देशमुख, हरिहर अलसटवार, सचिन दगडू, वैजनाथ कदम, गौस बागवान, समीर कुरेशी, कल्याण कुरूंदकर आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन बाळासाहेब बेले यांनी केले तर आभार संदीप टाक यांनी मानले.

# निवडणुका पारदर्शक, निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी बारकाईने लक्ष ठेवावे–प्रधान

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ आक्टोबर**



विधानसभा सार्वत्रिक निवडणूक–२०२४ ची आदर्श आचार संहिता मतदारसंघात लागू झाली असून, नामनिर्देशन पत्रेही उमेदवारांकडून दाखल केली जात आहेत. त्यामुळे भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निवडणूक पारदर्शक व भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूकविषयक सर्व बाबींवर बारकाईने लक्ष ठेवून कामकाज करावे, अशा सूचना निवडणूक निरीक्षक (खर्च) अर्जुन प्रधान यांनी पथक प्रमुखांच्या आयोजित आढावा बैठकीत दिल्या.

हिंगोली जिल्ह्यातील ९२–वसमत, ९३–कळमनुरी व ९४–हिंगोली विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन समिती सभागृहात आयोजित बैठकीत निवडणूक खर्च निरीक्षक अर्जुन प्रधान यांनी सर्व पथक प्रमुखांचा आढावा घेतला. निवडणूक कालावधीमध्ये तक्रार असल्यास निरीक्षक अर्जुन प्रधान यांच्याशी (९९००८४५९९०) व त्यांचे संपर्क अधिकारी शशीकिरण उबाळे (९७६३७२६९९५) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिनव गोयल, पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, उपजिल्हा निवडणूक अधिकारी रामेश्वर रोडगे व्यासपीठावर उपस्थित होते.

राजकीय पक्षाचे सनियंत्रण करण्यासाठी विविध समिती व भरारी पथकांची नेमणूक करण्यात आली आहे. यामध्ये व्हिडिओ सनियंत्रण समिती (व्हीएसटी), व्हिडीओ पाहणारा चमू (व्हीव्हीटी), स्थिर संनियंत्रण चमू (एसएसटी), लेखांकन करणारा चमू, भरारी पथक, माध्यम प्रमाणीकरण आणि संनियत्रण समितीच्या पथक प्रमुखांनी खर्चाच्या नोंदी अचूक ठेवाव्यात. उमेदवाराने घेतलेल्या खर्चाचा ताळमेळ नोंदी व पथकप्रमुखाच्या नोंदी अचूक असल्याची बाब जाणीवपूर्वक तपासून घ्यावी. अभिरुप नोंदवहीतील नोंदी अद्यावत ठेवाव्यात. तसेच एसएसटी आणि एफएसटी या पथकांनी आपली जबाबदारी दक्षतेने पार पाडावी. निवडणूक कालावधीमध्ये तपासणी नाक्यांवर तपासणी करताना कोणतीही दिरंगाई करू नये, कर्तव्यावर असलेल्या पथक प्रमुख आणि पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी हलगर्जीपणा केल्यास योग्य ती दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असे निर्देश अर्जुन प्रधान यांनी यावेळी सांगितले.

विधानसभा मतदार संघनिहाय सहायक निवडणूक खर्च निरीक्षकांनी दैनंदिन नोंदी त्याच दिवशी अभिरुप ताळमेळ नोंदवहीत अचूकपणे नोंदवाव्यात. यामध्ये अजिबात दिरंगाई होणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच उमेदवारांचे निवडणुकीशी संबंधित स्वतंत्र बँक खाते असणे आवश्यक आहे. उमेदवारांच्या बँक खात्यातून दैनंदिन काढण्यात येणाऱ्या रकमेवर तसेच युपीआयद्वारे वितरीत करण्यात येणाऱ्या रकमेवर बारकाईने लक्ष ठेवावेत. निवडणुकीत गैरव्यवहार प्रकरणी नागरिकांकडून तक्रार प्राप्त होताच त्याचे तात्काळ निवारण करून निकाली काढावेत. तसेच सर्व पथक प्रमुखांनी समन्वयाने काम करावेत. इतर विभागाशी संबंधित माहिती मिळाल्यास ती माहिती संबंधित विभागास कळवावी. जेणेकरुन त्याच्यावर कारवाई करणे सोयीचे होईल. तसेच मतदार संघात मद्य वाटप होणार नाही यावर लक्ष ठेवावे, अशा सूचना श्री. प्रधान यांनी दिल्या.

बैठकीच्या सुरुवातीला जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिनव गोयल यांनी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने झालेल्या तयारीची सविस्तर माहिती सादरीकरणाद्वारे दिली. तिन्ही विधानसभा मतदारसंघाचे खर्च समितीचे प्रमुख यांच्यासह विविध कामकाज करण्यासाठी नेमण्यात आलेले पथक प्रमुख, व्हीएसटी, व्हीव्हीटी, एसएसटी, लेखांकन करणारा पथक, भरारी आदी पथकाचे प्रमुख उपस्थित होते.

# बिडकीन येथील वरद हॉस्पिटलमध्ये विविध योजना अंतर्गत मोफत उपचार

तभा वृत्तसेवा

बिडकिन दि. २४ ऑक्टोबर पैठण तालुक्यातील बिडकीन व परिसरातील गोर गरीबांना आता होणार आरोग्य विषयी मोठा लाभ बिडकीन येथे वरद हॉस्पिटल अँड आय.सी.यु संचालक डॉ.सुरेश जंगले , डॉ.सौ जागृती जंगले यांच्या येथे प्रथमच बिडकीन येथे दि. २२ ऑक्टोबर पासून सर्व रेशन कार्ड धारकांसाठी महात्मा ज्योतिराव फुले, जन आरोग्य योजना आणि प्रधानमंत्री जन आरोग्य योजना, सुरू झाली आहे. यामध्ये गंभीर आजारावर मोफत उपचार तसेच शास्त्रक्रिया ,प्रति कुटुंब प्रति पाच लाख रुपये पर्यंत मोफत उपचार, विविध गंभीर आजारावर उपचार व शस्त्रक्रिया या योजनेच्या अंतर्गत मोफत करण्यात येणार आहे. यासाठी सर्व रेशन कार्ड



धारक व गरजू रुग्णांनी महात्मा ज्योतिराव फुले आरोग्य योजना, आयुष्यमान भारत, प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत रुग्णांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा. असे आव्हान वरद हॉस्पिटल अँड आय सी यू संचालक डॉ. सुरेश जंगले, डॉ. सौ. जागृती सुरेश जंगले ,निलेश राजपुरे मॅनेजर,अक्षय महाजन इंन्शूरन्स इंन्चार्ज, बनकर, यांनी केले आहे वरद हॉस्पिटल अँड आय सी यू बिडकीन स.भु. शाळेच्या पाठीमागे माळी गल्ली,बिडकीन येथे उपचारासाठी रुग्णांनी संपर्क करणे.

## जाहीर प्रगटन

**विद्यमान श्री.व्ही. डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधीश क' स्तर साहेब कन्नड, यांचे न्यायालयात**

C.M.A. 246/2024

N.D20/11/2024

अर्जदार :- १) गणेश तुकाराम रिन्धे, वयः ४१ वर्ष धंदाः शेती, रा जेहुर, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद. (छत्रपती संभाजीनगर), २) देविदास तुकाराम रिन्धे, वयः ५५ वर्ष धंदाः शेती, रा जेहुर, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद. (छत्रपती संभाजीनगर), ३) तुकाराम यशवंता रिन्धे, वयः ७८ वर्ष, धंदाः शेती, रा जेहुर, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद. (छत्रपती संभाजीनगर), ४) रुखमनबाई अप्पासाहेब नरोडे वयः ५४ वर्ष धंदाः घरकाम, रा वसू सायगाव, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद. (छत्रपती संभाजीनगर), ५) सुनिता बाबासाहेब बोरसे, वयः ५२ वर्ष धंदाः घरकाम, रा शिरोडी, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद. (छत्रपती संभाजीनगर)

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद विषय :- वारस हक्क प्रमाणपत्र (लीगल हेअरर्शिप सर्टिफिकेट) मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने त्याचे वकील श्री संदीप ए शिरसे यांचेमार्फत या न्यायालयात अर्जदार ही वरील ठिकाणचे रहिवासी असून अर्जदारांचे मयत आई। पत्नी नामे कै. जिजाबाई तुकाराम रिन्धे असून त्यांचा मृत्यू दिनांक १२/०७/२०२४ रोजी जेहुर तालुका कन्नड जिल्हा औरंगाबाद येथे मयत झालेल्या आहे ग्रामपंचायत देवगाव रंगारी तालुका कन्नड येथील मृत्यू प्रमाणपत्र दाखल करत आहे. असे की सदरील प्रकरणात अर्जदार क्रमांक १ व २ हा मयत यांचा मुले असून, अर्जदार क्रमांक ३ मयत यांची पत्नी असून, अर्जदार क्रमांक ४ व ५ मयत यांच्या मुली आहे. असे की, सदरील अर्जदाराशिवाय मयत आई। पत्नी नामे कै. जिजाबाई तुकाराम रिन्धे यांना इतर कोणीही वारस नाही तसेच रा जेहुर तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद येथे शैक्षणिक अथवा सरकारी कार्यालय (तलाठी/ ग्रामपंचायत, तहसील इत्यादी.) यासाठी अर्जदार यांना सक्षम न्यायालयाचे वारस प्रमाणपत्राची मागणी केले आहे. सबब अर्ज दाखल करण्यास कारण घडले.

सबब या जाहीर प्रकटना द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कुणाचाही काही उजर आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रकटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत स्वतः किंवा आपल्या विधिज्ञा मार्फत मा. न्यायालयात आक्षेप सादर करावा मुदतीत आक्षेप न आल्यास वारस प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल.

दिनांक ०५/१०/२०२४

आदेशावरून

क. लिपिक — सहायक अधीक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय क. स्तर कन्नड.

## जाहीर प्रगटन

**माननिय दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर गंगापूर यांच्या न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ४७४/२०२४

अर्जदार – १. शोभाबाई उत्तम पवार, रा. लासुर स्टेशन, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर २. विजय उत्तम पवार रा. वरील प्रमाणे ३. विकास उत्तम पवार रा. वरील प्रमाणे ४. वंदना अनिल वैराळ रा. सिध्दार्थ नगर, व्हीटीसी, मुलुंड वेस्ट, मुंबई

विरुध्द

गैरअर्जदार – निरंक

विषय – कलम २ बॉम्बे रेगूलेशन कायदयाप्रमाणे वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत....

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी ॲड. भगवान एस. शिंदे यांच्या मार्फत या मा. न्यायालयात अर्जदार यांनी वारसात्ते प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज दाखल केलेला आहे, सदरील अर्जात अर्जदार यांनी म्हटले आहे की, असे की, अर्जदार कं. १ हि मयत उत्तम किसन पवार यांची पत्नी असुन, अर्जदार कं. २ ते ४ हे मुले व मुली आहेत. उत्तम किसन पवार हे दिनांक २०/०३/२०२१ रोजी मयत झालेले आहेत. मयत उत्तम किसन पवार यांना अर्जदाराशिवाय इतर कोणतेही कायदेशीर वारसादार नाहीत. अर्जदार अर्जासोबत मयत उत्तम किसन पवार यांचे मुत्युप्रमाणपत्र व अर्जदार यांचे आधार कार्ड जोडत आहे. असे की, अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय योजनाचा लाभ घेण्यासाठी ते मयत उत्तम किसन पवार यांचे कायदेशीर वारसदार आहेत असे वारसाचे प्रमाणपत्राची अवश्यकता असल्यामुळे, त्याकामी त्यांनी मा. न्यायालयातुन कायदेशीर वारसाचे प्रमाणपत्र मिळणे कामी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. असे की, मयत उत्तम किसन पवार यांना अर्जदाराशिवाय इतर कोणतेही कायदेशीर वारसदार नाहीत. अर्जदार यांनी या अर्जा व्यतिरिक्त कोणत्याही न्यायालयात ते मयत उत्तम किसन पवार यांचे वारसदार आसल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज दाखल केलेला नाही

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांना ते मयताचे कायदेशीर वारसदार आसल्यावे प्रमाणपत्र देण्यास ज्या कोणाचा उनर व आक्षेप आसेल अशानी हे नाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत त्यांचा उजर व आक्षेप या न्यायालयात नोंदवावा. मुदतीमध्ये कोणाचा उजर व आक्षेप न आल्यास अर्जदार यांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल, मुदतीनतंर आलेला उजर व आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही. पुढील तारीख १३/१२/२०२४.

आज दिनांक २४/१०/२०२४ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून

लिपीक — सहायक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क–स्तर गंगापूर

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही. एन. काटकर, दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

पुढील तारीख : ३०/११/२०२४

दि.कि.अर्ज क्र. २७५/२०२४

अर्जदार : १. हमिदाबाई तुळशीराम राठोड, वयः ७८ वर्षे, धंदाः घरकाम, रा. रामपुरा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. २. देवीदास तुळशिराम राठोड, वयः ४०वर्षे, धंदाः शेती, रा. रामपुरा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ३. भाईदास तुळशिराम राठोड, वयः ३४वर्षे, धंदाः शेती, रा. रामपुरा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ४. आनंदा तुळशिराम राठोड, वयः ३३ वर्षे, धंदाः शेती, रा. रामपुरा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ५. ध्रुवदास तुळशिराम राठोड, वयः२९ वर्षे, धंदाः शेती, रा. रामपुरा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद, ६. दुर्गाबाई सुभाष पवार, वयः ४६ वर्षे, धंदाः घरकाम, रा. मोराड, ता. जामनेर, जि. जळगांव.

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी औरंगाबाद.

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्याचे वकील ॲड. टी.डी. शिंदे यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ व ६ यांचे वडील नामे तुळशीराम चोखा राठोड राठोड हे दि. ०६/०३/२०२२ रोजी मौजे रामपुरा, ता. कन्नड येथे मयत झालेले आहे. मृत्यु प्रमाणपत्र अर्जासोबत दिलेले आहे. मयत तुळशीराम चोखा राठोड यांना अर्जदार क्र. १ ते ६ हेच कायदेशीर वारस असुन इतर कोणीही वारस नाही. अर्जदार यांना शासकीय निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांनी अर्ज केल्यानुसार वारस प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुनास कुठलाही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत आपला उजर आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दि. १९/१०/२०२४

आदेशावरून

क. लिपीक — सहायिक अधिक्षक

दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड,

## जाहीर प्रगटन

**मा. ए.आय. आवटी मॅडम, दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

पुढील तारीख : २०/११/२०२४

दि.कि.अर्ज क्र. २७४/२०२४

अर्जदार : १. साक्रीबाई रघुनाथ राठोड, वयः ६९ वर्षे, धंदाः घरकाम, रा. रामपुरा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. २. राजेंद्र रघुनाथ राठोड, वयः ४४ वर्षे, धंदाः शेती, रा. रामपुरा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ३. विजय रघुनाथ राठोड, वयः ३९ वर्षे, धंदाः शेती, रा. रामपुरा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ४. दिलीप रघुनाथ राठोड, वयः ३७ वर्षे, धंदाः वर्षे, धंदा: शेती, रा. रामपुरा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ४. सखुबाई देशमुख पवार, वयः ४७ वर्षे, धंदाः घरकाम, रा. टिटवी तांडा, ता. पारोळा, जि. जळगांव.

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी औरंगाबाद.

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्याचे वकील ॲड. टी.डी. शिंदे यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ व ५ यांचे वडील नामे रघुनाथ भारमल राठोड हे दि. ०६/०३/२०२२ रोजी मौजे रामपुरा, ता. कन्नड येथे मयत झालेले आहे. मृत्यु प्रमाणपत्र अर्जासोबत दिलेले आहे. मयत रघुनाथ भारमल राठोड यांना अर्जदार क्र. १ ते ५ हेच कायदेशीर वारस असुन इतर कोणीही वारस नाही. अर्जदार यांना शासकीय निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांनी अर्ज केल्यानुसार वारस प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुनास कुठलाही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत आपला उजर आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दि.२१ /१०/२०२४

आदेशावरून

क. लिपीक — सहायिक अधिक्षक

दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड,

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही. डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.कि. अर्ज क्र. २३४/२०२४

अर्जदार : १) सुनिता भ्र. काकासाहेब साळवे, वय ५३ वर्षे, धंदा– घरकाम, रा. स्नेहनगर, हिवरखेडा रोड कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद २) नितीश पि. काकासाहेब साळवे, वय १८ वर्षे, धंदा– शिक्षण, रा. स्नेहनगर, हिवरखेडा रोड कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद ३) वच्छलाबाई लक्ष्मण साळवे, वय ६५ वर्षे, धंदा घरकाम, रा. स्नेहनगर, हिवरखेडा रोड कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद.

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थो अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ डी. के. साळवे यांचे मार्फत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार मौजे स्नेहनगर कन्नड ता. कन्नड येथील कायमचे राहणारे असून अर्जदार क्र. १ हो अर्जदार क्र. २ यांची आई आहे तसेच अर्जदार क्र. ३ ही अर्जदार क्र. १ ची सासु आहे. अर्जदार क्र. १ यांचे पती, अर्जदार क्र. २ याचे वडील व अर्जदार क्र. ३ यांचा मुलगा नामे काकासाहेब लक्ष्मण साळवे हा होता तो दिनांक ०७/०७/२०२४ रोजी मौजे स्नेहनगर कन्नड येथे मयत झालेला आहे. तसेच अर्जदार क्र. ३ यांचे पती व अर्जदार क्र. १ यांचे सासरे नामे लक्ष्मण रखमाजी साळवे हे पुर्वीच मयत झालेले आहे. अर्जदार क्र. १ ते ३ हे त्यांचे कायदेशीर वारस आहे.

अर्जदार यांना शासकिय तसेच निमशासकिय कार्यालयात देण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तसेच महसुल दप्तरी वारसाचे मिळकतीत नोंद करण्यासाठी तसेच तहसिल, नगर परिषद कन्नड येथे मयताचे वारस असल्याची नोंद करण्यासाठी सदरील वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. वरील अधिकाऱ्यांनी न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र घेवुन येणे असे सांगीतल्यावरुन सदरील अर्जास कारण घडले आहे.

त्याअर्थी सदरील जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस सुचीत करण्यात येते की, सदरील प्रकरणाबाबत कोणाचाही काही उजर, अक्षेप अथवा वारस प्रमाणपत्र अर्जदाराला देण्याचा कोणाचीही काही हरकत असल्यास सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत स्वतः अगर आपले विधीज्ञामार्फत हजर होवुन उजर, आक्षेप नोंदवावा व मुदतीत मुदतीत उजर, आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या हक्कात वारसाचे प्रमाणपत्र देण्याचे आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी. सबब हे जाहीर प्रगटन.

दिनांक १५/१०/२०२४

आदेशावरुन

सहाय्यक अधिक्षक कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही. डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, कन्नड यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक २५२/२०२४

अर्जदार – १) मिना बाळासाहेब पगारे, वय ५३ वर्षे, धंदा नौकरी, रा. औराळा, ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर (औरंगाबाद) २) शिल्पा बाळासाहेब पगारे, वय २७ वर्षे, धंदा घरकाम रा. औराळा, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर (औरंगाबाद) ३) तेजस बाळासाहेब पगारे, वय २५ वर्षे, धंदा शिक्षण, रा. औराळा, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर (औरंगाबाद)

–विरुध्द–

गैरअर्जदार – महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हाधिकारी औरंगाबाद, जिल्हा औरंगाबाद

अर्ज : बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट प्रमाणे हे अरशिप सर्टीफिकेट मिळणे बाबत.

मा. महोदय,

ज्या अर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ डी. के. साळवे यांचे मार्फत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे राहणारे असून अर्जदार यांनी सदरील अर्ज वारसाचे प्रमाण पत्र मिळावे म्हणून विदयमान न्यायालयात प्रकरण दाखल केले आहे. अर्जदार क्रमांक १ चे पती व अर्जदार १ व ३ चे वडील नामे बाळासाहेब छगन पगारे हे दिनांक ०१/०५/२०२४ रोजी नाशिक येथे तात्पुरत्या राहत्या घरी मयत झालेले आहे, सोबत मयतांचे मृत्यु प्रमाण पत्र जिल्हा रुग्णालय नाशिक यांचे कडील अर्जा सोबत दाखल केले आहे. मयत व सर्व अर्जदार हे मुळचे औराळा ता. कन्नड येथीलच रहीवाशी आहेत.

मयतांच्या नावे भविष्यात शासकीय निमशासकीय मिळणारे फायदे तसेच मयताच्या नावाने असलेल्या नोंदी वारस कायदया प्रमाणे संबंधीत रेकॉर्डला नोंद घेणेसाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे. सबब सदरील अर्ज करणेस कारण घडले आहे. अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्याने अर्जदारां शिवाय मयतांना कोणीही ईतर वारस नाही. तसेच अर्जदार यांना सदरील वारसाचे प्रमाण पत्र हे शासकीय व निमशासकीय तसेच महसुल दप्तरी नोंद करण्यासाठी वारस कार्यवाही करणेसाठी तलाठी कार्यालय, ग्राम पंचायत कार्यालय इत्यादी ठिकाणी आवश्यक असल्याने वारस प्रमाण पत्राची अर्जदार हे मागणी करीत आहे.

मयतांचे मृत्युचे ठिकाण हे जरी नाशिक येथील असले तरी मयत व सर्व अर्जदार हे औराळा ता. कन्नड येथील मे. न्यायालयाचे कक्षेत येत असल्याने सदरील अर्ज चालविण्याचा व वारसाचे प्रमाण पत्र देण्याचा अधिकार मे. न्यायालयास आहे.

त्याअर्थी सदरील जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस सुचीत करण्यात येते की, सदरील प्रकरणाबाबत कोणाचाही काही उजर, अक्षेप अथवा वारस प्रमाणपत्र अर्जदाराला देण्याचा कोणाचीही काही हरकत असल्यास सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत स्वतः अगर आपले विधीज्ञामार्फत हजर होवुन उजर, आक्षेप नोंदवावा व मुदतीत उजर, आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या हक्कात वारसाचे प्रमाणपत्र देण्याचे आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सबब हे जाहीर प्रगटन.

दिनांक १५/१०/२०२४

आदेशावरुन

सहाय्यक अधिक्षक कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १८३/२०२४

१/– प्रदीप उखा निकम, वय ३८ वर्षे, धंदा, शेती, रा. निभौरा ता. सोयगाव छत्रपती संभाजीनगर, २/– कल्पना धर्मा गवळी, वय ४९ वर्षे, धंदा व रा. वरीलप्रमाणे.

विरूद्ध

निल

प्रकरण वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत्त

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. सचिन सुनिल गिरी, सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत उखा पांडू निकम यांचा दि. २०/०६/२०२४ रोजी मौजे निभोरा, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद येथे मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क. १ ते २ हे वारस आहेत, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क. १ ते २ हे मयत उखा पांडू निकमयांचे वारस असुन त्यांना मयत उखा पांडू निकमयांचे शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल.

आजरोजी दि २४/१०/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु. ता.१८/१२/२०२४

आदेशावरुन

क. लिपीक — सहाय्यक अधिश्वक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव)

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही.डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

पुढील तारीख : २२/११/२०२४

दि.कि.अर्ज क्र. २०४/२०२४

अर्जदार : १. इंदुबाई छगन जाधव, वयः ६० वर्षे, धंदाः घरकाम, रा. दिगर, पिशोर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. २. गणेश छगन जाधव, वयः ३८ वर्षे, धंदाः शेती, रा. दिगर, पिशोर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ३. शितल अमोल मैराळ, वयः ३५ वर्षे, धंदाः घरकाम, रा. भिलपलटन गल्ली, शिवाजी नगर कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद.

गैरअर्जदार – महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी औरंगाबाद.

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्याचे वकील ॲड. टी.डी. शिंदे यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ व ३ यांचे वडील नामे छगन आबाराव जाधव हे दि. १७/०५/२०१६ रोजी मौजे दिगर, पिशोर, ता. कन्नड येथे मयत झालेले आहे. मृत्यु प्रमाणपत्र अर्जासोबत दिलेले आहे. मयत छगन आबाराव जाधव यांना अर्जदार क्र. १ ते ३ हेच कायदेशीर वारस असुन इतर कोणीही वारस नाही. अर्जदार यांना शासकीय निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांनी अर्ज केल्यानुसार वारस प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुनास कुठलाही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत आपला उजर आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी,

दि.१९/१०/२०२४

आदेशावरून

क. लिपीक — सहायिक अधिक्षक

दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड,

## जाहीर प्रगटन

**मा. ए. आय. आवटी दिवाणी न्यायाधीश साहेब, कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात**

दि. की. अर्ज क्र. १९०/२०२४

पुढील तारिख २५/११/२०२४

अर्जदार : श्री धोंडीराम अहिलाजी अहिल्याजी जाधव वय ७६ वर्षे, धंदा– शेती, रा. शिरोडी ता. कन्नड, जि. औरंगाबाद.

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फेः जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद.

अर्ज : वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड. अनिल जी. राठोड यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार वरील ठिकाणचे कायमचे रहिवासी आहे. अर्जदार हा मयताचा मुलगा आहेत, मयत नामे अहिलाजी अहिल्याजी केरु जाधव हे अर्जदारचे वडिल होते ते दिनांक ०७/१२/१९९५ रोजी वृधापकाळाने मयत झालेले आहे. अर्जदार यांना शासकीय तसेच निमशासकीय कार्यालयात वारसाची नोंद करण्यासाठी, तसेच विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी, तसेच महसूल दप्तरी वारसाचे मिळकतीत नोंद करण्यासाठी सदरील वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. वरील अधिकाऱ्यांनी न्यायालयातून वारस प्रमाणपत्र घेऊन या असे सांगितल्यावरून सदरील प्रकरण वारस प्रमाणपत्र मिळावे म्हणून अर्ज दाखल करण्यास कारण घडले आहे. अर्जदार हा एकमेव मयताचा वारस असून अर्जदाराशिवाय मयतास इतर कोणीही वारस नाही. अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी इतर कोणत्याही न्यायालयात अर्ज केलेला नाही. तसेच वारस प्रमाणपत्र घेतलेले नाही. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास कुठल्याही स्वरूपाचा उजर अक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रकटन प्रसिद्ध झाल्यापासून तिस (३०) दिवसांच्या आत आपला उजर आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा मुदतीत उजेर अक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल त्यानंतर आलेला उजर अक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक – १५/१०/२४.

आदेशावरून

क. लिपीक — सहायिक अधिक्षक

दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड,

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय औरंगाबाद ता.जि. औरंगाबाद (मा. गुणारी साहेब)**

सिव्हिल एम.ए.क. १५९७/२०२४

अर्जदार : १. कमल भ्र. कैलास भवर, वय ५० वर्षे, धंदा–शेती. २. नंदू पि. कैलास भवर, वय ३० वर्षे, धंदा–शेती, ३. भूजंग पि. कैलास भवर, वय २८ वर्षे, धंदा–शेती, तिधे रा शरणापूर ता. जि. छत्रपती संभाजीनगर ४. अश्विनी भ्र. बंडू म्हस्के, वय ३३ वर्षे, धंदा घरकाम, रा. पढेगाव ता. जि. छत्रपती संभाजीनगर.

विरूद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टप्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदारांनी मयत कैलास कचरू भवर यांचे वारस असल्याबाबत प्रकरण या मा. न्यायालयात त्यांचे विधीज्ञ के. एस. ठोंबरे यांच्या मार्फत दाखल केला असून अर्जदारांनी अर्जात नमूद केले आहे की, अर्जदार क. १ हि अर्जदार क. २ ते ४ यांची आई असून अर्जदार क. १ चे पती व अर्जदार क. २ ते ४ यांध वडिल नामे कैलास कचरू भवर हे दि. ०५/०४/२०२२ रोजी शहापूर ता. गंगापूर येथे मयत झालेले आहे. मयत कैलास कचरू भवर यांना अर्जदारांशिवाय इतर कुणीही वारसदार नाही,

त्याअर्थी तमाम जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांनी त्यांच्या अर्जात नमूद केले आहे की. अर्जदार हे नयत कैलास कचरू भवर यांचे कायदेशीर वारसदार आहे व त्याप्रमाणे त्याचे वारस असल्याचे प्रमाणपत्र अर्जदारांचे हक्कात जारी करण्यात यावे अशी मागणी केलेली आहे. तरी सदरील मागणीस कुणाचा काही आक्षेप उजर असल्यास सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत स्वतः अथवा आपल्या विधीज्ञामार्फत न्यायालयात आक्षेप नोंदवावा मुदतीत आक्षेप न असल्यास न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी अर्जात मागणी केल्याप्रमाणे आदेश पारित करेल.

पुढील नारीख:– ३०/११/२०२४

आदेशावरून

सहायक अधिक्षक

दिवाणी न्यायालय औरंगाबाद.

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही. डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

पुढील तारीख : २७/११/२०२४

दि.कि.अर्ज क्र. २७६/२०२४

अर्जदार : १. यशोदाबाई लल्लु राठोड, वयः ७३ वर्षे, धंदाः घरकाम, रा. रामपुरा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. २. भावसिंग लल्लु राठोड, वयः ३६ वर्षे, धंदाः शेती, रा. रामपुरा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ३. अशोक लल्लु राठोड, वयः ३४ वर्षे, धंदाः शेती, रा. रामपुरा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ४. प्रेमदास लल्लू राठोड, वयः ३१ वर्षे, धंदाः शेती, रा. रामपुरा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद, ५. सावित्रीबाई सिताराम चव्हाण, वयः ५८ वर्षे, धंदाः घरकाम, रा. घोडेगांव, ता. चाळीसगांव, जि. जळगांव. ६. लताबाई भाईदास चव्हाण, वयः ३६ वर्षे, धंदाः घरकाम, रा. तळेगांव, ता. चाळीसगांव, जि. जळगांव. ७. छायाबाई बळीराम जाधव, वयः ३५ वर्षे, धंदाः घरकाम, रा. हनुमंतखेडा, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद.

गैरअर्जदार – महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी औरंगाबाद,

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्याचे वकील ॲड. टी.डी. शिंदे यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ व ७ यांचे वडील नामे लल्लु झामु राठोड राठोड हे दि. १५/०५/२०२१ रोजी मौजे रामपुरा, ता. कन्नड येथे मयत झालेले आहे. मृत्यु प्रमाणपत्र अर्जासोबत दिलेले आहे. मयत लल्लु झामु राठोड यांना अर्जदार क्र. १ ते ७ हेच कायदेशीर वारस असुन इतर कोणीही वारस नाही. अर्जदार यांना शासकीय निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांनी अर्ज केल्यानुसार वारस प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुनास कुठलाही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत आपला उजर आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दि. १९/१०/२०२४

आदेशावरून

क. लिपीक — सहायिक अधिक्षक

दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड,

**माननीय ए.आय.आवटी मॅडम दिवाणी न्यायाधीश क.स्तर कन्नड यांच्या न्यायालयातुन**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३१३/२०२४

अर्जदार :-१)भागूबाई भ्र. बाबुराव मगर वय ६४ वर्ष धंदा घरकाम रा.हिवरखेडा (ना)ता.कन्नड जिल्हा औरंगाबाद २) वंदना भ्र. भाऊसाहेब नलावडे वय ४२ वर्ष धंदा घरकाम रा.बाजारसावंगी ता.खुलताबाद जिल्हा औरंगाबाद ३) गोकुळ बाबुराव मगर वय ३७ वर्ष धंदा शेती रा.हिवरखेडा (ना) ता.कन्नड जिल्हा औरंगाबाद ४) सतीश बाबुराव मगर वय ३५ वर्ष धंदा शेती रा.हिवरखेडा (ना)ता.कन्नड जिल्हा औरंगाबाद

विरुद्ध

गैरअर्जदार :- महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी औरंगाबाद

अर्ज :- कलम ३७२ भारतीय वारसा कायद्याप्रमाणे सक्सेशन सर्टिफिकेट मिळणेबाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकिल ॲड.जे.सी.मगर यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की,अर्जदार क्र.०१ चे पती व अर्जदार क्र.०२ ते ०४ चे वडील नामे बाबुराव कचरू मगर हे होते ते दिनांक ०१-०९-२०२४ रोजी मयत झाले आहे.मयतास अर्जदार क्र.१ ते ४ हेच कायदेशीर वारस असून इतर कोणतेही वारस नाही.

मयताचे नावे दि.औ. जि. म.सह.शाखा -चिकलठाण ता.कन्नड मध्ये रक्कम रूपये ५८६१६ जमा आहे ते अर्जदार क्र.०४ च्या नावाने मिळण्यासाठी अर्जदार यांना सक्सेशन सर्टिफिकेटचे आवश्यकता आहे करीता सदर चा अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस सूचित करण्यात येते की,सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञा मार्फत हजर राहून उजर/आक्षेप सादर करावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या हक्कात अर्जदार क्र.०१ ते ०४ हे मयत बाबुराव कचरू मगर यांचे वारस असल्याचे वारस प्रमाणपत्र व अर्जदार क्र ०४ सतीश यास अर्जदार ०१ ते ०३ तर्फे बँकेतून रक्कम मिळण्यासाठी वारसा प्रमाणपत्र (सक्सेशन सर्टिफिकेट) देण्याचा आदेश पारित करण्यात येईल

दिनांक: २३/१०/२०२४

आदेशावरून

क.लिपिक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क.स्तर कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती ए.आय. आवटी मॅडम सह–दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयातुन**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक: ३१६/२०२४

पुढील तारीख २८/११/२०२४

अर्जदार – १– सुमनबाई भ्र. रावसाहेब पवार, वय ६५ वर्षे, धंदा घरकाम, रा. करंजखेडा (ज) ता. कन्नड, जि. औरंगाबाद २– वैष्णवी पिता प्रकाश पवार, वय १४ वर्षे, धंदा शिक्षण अज्ञान पालनकर्ती, आजी नामे सुमनबाई अर्जदार क्रं. १ रा. करंजखेडा ज. ता. कन्नड, जि. औरंगाबाद ३– ओमकार पिता प्रकाश पवार, वय १२ वर्षे, धंदा शिक्षण अज्ञान पालनकर्ती, आजी नामे सुमनबाई अर्जदार क्रं. १ रा. करंजखेडा ज, ता. कन्नड, जि. औरंगाबाद

– विरुध्द –

गैरअर्जदार – महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हाधिकारी संभाजीनगर, जि. संभाजीनगर

अर्ज – वारसाचे प्रमाण पत्र मिळणे बाबत. Bombay Regulation Act

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकील ॲड. व्ही. के. मोहिते यांच्या मार्फत या न्यायालयात अर्जदार हे वरील ठिकाणचे येथील राहणारे असून अर्जदार यांनी सदरील अर्ज वारसाचे प्रमाण पत्र मिळावे म्हणून या न्यायालयात दाखल केले आहे. अर्जदार क्रमांक १ चा मुलगा, अर्जदार क्रमांक २ व ३ वडील नामे प्रकाश रावसाहेब पवार हे दिनांक १८.७.२०२४ रोजी मौजे करंजखेडा ता. कन्नड जिल्हा औरंगाबाद येथे मयत झालेले आहे, तसेच अर्जदार क्रमांक १ वी सुन, अर्जदार क्रमांक २ व ३ ची आई नामे वंदना प्रकाश पवार ही दिनांक १६.४.२०१५ रोजी मौजे करंजखेडा ता. कन्नड जिल्हा औरंगाबाद येथे मयत झालेली आहे, सोबत मयतांचे ग्राम पंचायत कार्यालय करंजखेडा, ता. करड यांचे कडील मृत्यु प्रमाण पत्र दाखल केले आहे. अधिक स्पष्टीकरणासाठी अर्जदारांनी न्यायालयाच्या अवलोकनासाठी अर्जामध्ये वंशावळ खालील देखील दिली आहे, अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्याने अर्जदारां शिवाय मयतांना कोणीही ईतर वारस नाही. तसेच अर्जदार यांना सदरील वारसाचे प्रमाण पत्र हे शासकीय व निमशासकीय योजनेसाठी तसेच महसुल दप्तरी नोंद करण्यासाठी आवश्यक असल्याने वारस प्रमाण पत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार यांनी मागणी केली आहे. सबब अर्जास कारण दिनांक ३०.०९.२०२४ रोजी घडले आहे. अर्जदार सोबत स्वतःचे आधार कार्ड तसेच ग्राम पंचायत कार्यालय करंजखेडा यांचे कडील मृत्यु प्रमाण पत्र, विदयमान न्यायालयाचे अवलोकनासाठी दाखल करीत आहे. सबब वरील प्रमाणे अर्जदार यांनी या न्यायालयात मागणी केली आहे.

त्या अर्थी सदरह जाहीर प्रगटना व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात वारस प्रमाण पत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे, व त्या बाबत ईतर कुठल्याही वारसाचा उजर आक्षेप नाही या साठी प्रमाण २० देणे आहे. सबब या जाहीर प्रगटना व्दारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पुर्व इतर कुणासही आक्षेप / उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन वर्तमान पत्रात प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर वकीला मार्फत हजर व्हावे तसे न केल्यास मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना गवतांचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारसा हक्क प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल. सबब आज दिनांक २३.१०.२०२४ रोजी माझे सहीनिशी व मा. कोर्टाने शिक्यानिशी दिले.

दिनांक २३.१०.२०२४

आयेशावरुन्

लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर कन्नड

# विधानसभा व लोकसभा पोटनिवडणुकीसाठी नांदेडमध्ये व्यापक जनजागृती

## स्वाक्षरी मोहिमेत प्रधान सचिव एकनाथ डवले यांचा सहभाग; मतदान करण्याचे केले आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २४ ऑक्टोबर**




विधानसभा सार्वत्रिक निवडणूक तसेच नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीत मतदारांनी मतदान करावे, यासाठी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात येत आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा स्वीपच्या प्रमुख मीनल करनवाल यांनी काल नांदेड जिल्हा परिषदेमध्ये मतदान जनजागृती साठी स्वाक्षरी मोहीम राबवली. यावेळी ग्राम विकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले यांनी स्वाक्षरी मोहिमेत सहभाग घेऊन स्वाक्षरी केली. त्यांनी यावेळी लोकशाहीला बळकट करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने मतदान करणे आवश्यक असल्याचे आवाहन केले. या कार्यक्रमात जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, ग्रामपंचायत विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी मंजुषा कापसे, जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी नारायण मिसाळ, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी डॉ. सविता बिरगे, माध्यमिकचे शिक्षणाधिकारी माधव सलगर, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अमोल पाटील, भोजराज, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. प्रवीण घुले आदींची यावेळी उपस्थिती होती. श्री एकनाथ डवले यांच्या उपस्थितीने जिल्ह्यातील मतदान जनजागृती मोहिमेला एक नवे बळ मिळाले. त्यांनी स्वाक्षरी मोहिमेत सहभागी होत, मतदानाचे महत्त्व पटवून दिले. या उपक्रमाच्या माध्यमातून जिल्हा परिषदेने लोकशाही सुदृढ करण्याच्या उद्दिष्टाने समाजातील प्रत्येक घटकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला आहे. जनतेत मतदानाविषयी जागृती निर्माण करणे आणि आगामी निवडणुकांमध्ये मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी स्वीपकक्ष, उमेद व जिल्हा परिषदेच्या संयुक्त विद्यमाने स्वाक्षरी मोहिम घेण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रमुख कुलकर्णी यांनी केले यावेळी सहाय्यक प्रशासन अधिकारी राघवेंद्र मदनुरकर, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक शुभम तेलेवार, उमेदचे जिल्हा अभियान व्यवस्थापक गजानन पातेवार, कार्यालयीन अधीक्षक द्वारकादास राठोड, बालाप्रसाद जंगिलवाड, अरुण चव्हाण, माधव भिसे, हनमंत कंदुरके, स्वप्निल कुलकर्णी, अतिश गायवाड, बालाजी गिरी यांच्यासह जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# भीमराव केराम यांनी २४ ऑक्टोबर रोजी दाखल केला नामांकन अर्ज

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. २४ ऑक्टोबर**



किनवट विधानसभा मतदारसंघासाठी नामांकन अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाल्यानंतर आमदार भीमराव केराम यांनी माहूर येथे रेणुका देवीचे दर्शन घेऊन २४ ऑक्टोबर रोजी सहा जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी मेघना कावली यांच्याकडे उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

भारतीय जनता पक्षाने विद्यमान आमदार भीमराव केराम यांना दुसऱ्यांदा उमेदवारी जाहीर केली ८३ किनवट विधानसभा मतदारसंघासाठी नामांकन अर्ज दाखल करण्यास प्रारंभ झाल्यानंतर भीमराव केराम यांनी २३ ऑक्टोबर रोजी श्रीक्षेत्र माहूरगड येथे जाऊन आई रेणुका देवीचे दर्शन घेतले व त्यानंतर दिनांक २४ ऑक्टोबर रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालयात जाऊन सहा जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी मेघना कावली यांच्याकडे नामांकन अर्ज दाखल केला आहे. याप्रसंगी त्यांच्या समवेत भाजपनेते सुधाकर भोयर माजी नगराध्यक्ष दिनकर चाडावार, शिवना कलगोटवार व आशिष देशपांडे हे उपस्थित होते. याप्रसंगी उपविभागीय अधिकारी कार्यालयाजवळ भाजपाचे युवानेते एड प्रतीक केराम, प्रकाश कुडमते निळकंठ कातले लक्ष्मण कासाडीवार, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार,स्वागत आयनेनिवार, शिवा आंधळे, अनिल तीरमनवार, संतोष चनमनवार, श्रीनिवास नेमानीवार, दत्ता आडे संजय राठोड यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकच गर्दी केली होती.

## संक्षिप्त वृत्त

### हदगाव विधानसभेसाठी चार उमेदवारी अर्ज दाखल, तिसऱ्या दिवशी २८ अर्जांची उचल

**हदगाव**-विधानसभा निवडणूकीसाठी चार उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल कले आहेत.अर्ज दाखल करणारे उमेदवार माधवराव निवृत्तीराव पवार इंडियन नॅशनल काँग्रेस, सुनिता माधव देवसरकर अपक्ष,रमाकांत दत्तात्रय शिंदे अपक्ष,देविदास नागनाथ स्वामी अपक्ष असे आहेत.आज उमेदवारी अर्ज वितरणाच्या तिसऱ्या दिवशी १६ व्यक्तीनी २८ अर्जची उचल केली.आता पर्यत ७६ व्यक्तीना १३६ नामनिर्देशनपत्र उचल केली आहे.आज सात उमेदवारा कडून ६५००० हजार रुपये अनामत रक्कम प्राप्त झाली आहे.ज्यात माधवराव निवृत्तीराव पवार,देविदास नागनाथ स्वामी,सुनीता माधव देवसरकर,रमाकांत दत्तात्रय शिंदे,माधव दादाराव देवसरकर,सुनील हरिहरराव सोनुले,बालाजी परसराम वाघमारे यांचा समावेश असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी अविनाश कांबळे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती सुरेखा नांदे,सहा निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती पल्लवी टेमकर,मिडिया कक्ष प्रमुख अनिल तामसकर,अनिल दस्तूरकर यांनी कळविले आहे. विधानसभेसाठी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख २९ ऑक्टोबर आहे.

### मानवाडी ते बाळापूर रस्त्यावर खड्डे


**हदगांव**-तालुक्यातील निवघा बा. ही मोठी बाजारपेठ मानली जाते. या बाजारपेठेला



जवळपास २२ खेडी जुटली असल्या कारणाने बाजारपेठेत मोठी वाहतुकीची वर्दळ असते. एवढे मोठे खड्डे असुनही सा. बा. विभाग झोपले की काय असा प्रश्न उपस्थित होत आहे. हे खड्डे तात्काळ नाही बुजविले तर तेथे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तात्काळ संबंधित विभागाने लक्ष घालून लवकरात लवकर खड्डे बुजविण्याचे काम करावे. असे खेड्यातील नागरिकाचे मत आहे.

### माजी आमदार अमिताताई चव्हाण यांना बंधूशोक

**नांदेड**-माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांचे मेहुणे व माजी



आमदार सौ. अमिताताई चव्हाण यांचे मोठे बंधू विनोद शर्मा यांचे गुरुवारी दुपारी मुंबईत निधन झाले. ते ७४ वर्षांचे होते. विनोद शर्मा हे मागील काही काळापासून आजारी होते. गुरुवारी अचानक त्यांची प्रकृती गंभीर होऊन प्राणज्योत मालवली. त्यांच्यावर शुक्रवारी २५ ऑक्टोबर २०२४ रोजी दुपारी १ वाजता चंदनवाडी स्मशानभूमि, चर्नी रोड, मुंबई येथे अंतिम संस्कार होतील. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी व मोठा आप्त परिवार आहे.

### नांदेड दक्षिण स्वीप कक्षाच्यावतीने युवक मतदारांचा सन्मान

**नांदेड**-लोकशाही सक्षम करण्यासाठी युवकांनी आळस न करता प्रथम आपले नाव मतदार यादीत नोंदविणे आवश्यक आहे. अशा अनेक नवमतदार तरुणांनी यंदा प्रथमच आपले नाव मतदार यादीत नोंदवून इपिक कार्ड सुध्दा प्राप्त केले आहेत. प्रातिनिधिक स्वरूपात आज नांदेड दक्षिण स्वीप कक्षाच्यावतीने प्रतिभा निकेतन महाविद्यालयात घेण्यात आलेल्या मतदार जनजागृती कार्यक्रमात कु.वैष्णवी वसंतकुमार साहू व गौरांक ओमप्रकाश दरक या दोन तरुण मतदारांचे कौतुक व अभिनंदन करुन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. किशोर गंगाखेडकर हे तर विशेष अतिथी म्हणून स्वामी रामानंद तीर्थ विद्यापिठाचे सामाजिक शास्त्र संकुलाचे संचालक डॉ. घनश्याम येळणे, स्वीप सदस्य प्रा.राजेश कुलकर्णी, प्रा.विजय तरोडे,लेफ्टनंट प्रा.डॉ. किशोर इंगळे, मुख्याध्यापक बालासाहेब कच्छवे, सुनील दाचावार, संजय भालके, कविता जोशी आणि सारिका आचमे उपस्थित होते. याप्रसंगी युवक मतदार गौरांक ओमप्रकाश दरक यांनी असे मत व्यक्त केले ,की इपिक कार्ड प्रथमच प्राप्त करुन मला मतदार झाल्याचा अभिमान वाटला आणि मी मतदान करणारच, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. नवतरुणी मतदार वैष्णवी साहू हीने याप्रसंगी सांगितले , की लोकशाहीमध्ये एक एक मत महत्त्वाचे असून मला संविधानाने मिळेलेल्या या अधिकाराचा मी मतदान करुन माझा अधिकार या निवडणूकीत बजावणारच आहे. या मतदार जनजागृती कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रा.बालाजी यशवंतकर यांनी व्यक्त केले.

# संजय पाटील घोगरे नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातून अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा**
**नविन नांदेड,दि. २४ ऑक्टोबर**



नांदेड दक्षिण विधानसभा मतदार संघातून अपक्ष उमेदवारी संजय शिवाजी पाटील घोगरे यांनी दिनांक २४ ऑक्टोंबर रोजी हजारो मतदारांच्या उपस्थितीत अर्ज दाखल करण्यात आला. यावेळी हडको परिसरातील शिवाजी महाराज पुतळा ते चौफाळा येतील शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून चौफाळा इथून तहसील कार्यालयाकडे मोठ्या जनसमुदायाची रॅली काढून अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला.

नांदेड दक्षिण मतदार संघातील व मनापाच्या प्रभाग क्रमांक २० चे भारतीय जनता पार्टीचे माजी नगरसेवक प्रतिनिधी संजय शिवाजी पाटील घोगरे यांनी विधानसभा २०२४ च्या निवडणुकीत अपक्ष उमेदवारी अर्ज दिनांक २४ ऑक्टोंबर रोजी हजारोंच्या संख्येने रॅली काढून उमेदवारीच्या अर्ज दाखल करण्यात आला यावेळी त्यांनी चौफाळा येथील मंचावरून मनोगत व्यक्त करताना सांगितले की मी जे निवडणूक लढवत आहे ते मी आजपर्यंत केलेल्या विकास कामाच्या जोरावर लढवत आहे. आजपर्यंत आलेले आमदारांनी दक्षिण मतदार संघात गुत्तेदारी करून जनतेला भुलथापा देण्याचे काम केले त्यामुळे येथील मतदार राजा माझ्यासारख्या नवीन चेहऱ्यास न्याय देतील याची मला खात्री आहे. आणि त्यांचा आशीर्वाद घेऊन मी हा निर्णय घेतला आहे. आणि माझ्या पाठीशी मनोज जरांगे पाटील यांचा भक्कम आधार आहे. आणि ते मला दक्षिण मतदारसघातून विधानसभा निवडणूक लढवण्यास परवानगी देऊन आशीर्वाद देतील याची मला खात्री असल्याचे मत व्यक्त केले.

# भोकरची जनता सदैव माझ्या पाठिशीः रमेश राठोड



**तभा वृत्तसेवा**
**भोकर,दि. २४ ऑक्टोबर**

भोकर विधानसभा क्षेत्रातील मतदारांशी माझे अनेक वर्षापासून संबध आहेत या मतदार संघातील जनतेवर माझा संपूर्ण विश्वास असून निश्चितच मला विधानसभेवर पाठवतील असा ठाम विश्वास वंचित बहूजन आघाडीचे उमेदवार रमेश राठोड यांनी दि.२३ रोजी आयोजीत करण्यात आलेल्या कार्यकर्त्यांच्या महत्त्वपूर्ण बैठकीत व्यक्त केला. सर्वच जाती धर्मातील मतदारांसोबत माझे स्नेहाचे संबध असल्यामूळे होवू घातलेल्या विधानसभा निवडणनूकीत विजय माझाच होणार असल्याचे सांगीतले येथील वादग्रस्त जागेवर नंगाराभवन उभारण्याचा डाव असल्याचे बंजारा समाजाला कळाले हा भोळा समाज असून अशा कोणत्याही भूलथापांना बळी पडणार नाही निवडणूका येताच भोकरमध्ये नारळ फोडण्याचा कार्यक्रम पहावयास मिळते व हेच नारळ फोडणारे नेते पाच वर्ष सर्वसामान्यांच्या प्रश्नाकडे पाठ फिरवतात ह्याना नागरिकांची आठवण सुद्धा येत नसल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. या कार्यक्रमास राजेश्वर हत्ती आंबिरे सूरेशभाउ राठोड सह वंचितचे तालूका अध्यक्ष दिलीप राव सूभाष तेले आनंदराव एडके आशोक राठोड आदिंची प्रमूख उपस्थिती होती.

# लोहा विधानसभा मतदारसंघात जनसेवा पार्टीची दमदार एन्ट्री प्रा.मनोहर धोंडे यांची उमेदवारी अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. २४ ऑक्टोबर**



जनसेवा पार्टीचे संस्थापक व अध्यक्ष प्रा मनोहर धोंडे यांनी विविध घटकातील जनसमुदायाला सोबत घेऊन शक्ती प्रदर्शन केले.अधिकृत जनसेवा पार्टीच्या वतीने तहसील कार्यालयात निवडणुक विभागात उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. लोहा विधानसभा मतदारसंघात राजकिय व प्रादेशिक पक्षांत मोठी उलता पालथा होणार या राजकीय चर्चाने मतदार संघ ढवळुन निघत आहे.

अनेक विविध पक्षांचे उमेदवार गुडघ्याला बाशिंग बांधून मतदारसंघाच्या भौवल्यावर चढण्याची वाट बघत आहेत पण अधिकृत व-हाडीचा बुलावा येत नसल्याने भौवल्यावर चढणारा उमेदवार राजकीय रस्त्यावर उतरुन वरिष्ठाच्या तार्जीक अडचणीच्या भेटीला दिनरात हाजरी लावून सुध्दा ..हिरवा कंदील मिळत नसल्याने विविध पक्षातील निवडणूक लढवणारे भावी आमदार तोंडावर बोट ठेऊन सोशल मिडीयावर होणाऱ्या टिपा टीपणी वाचून हिरमुसले होत आहेत. महाविकास आघाडीतील घटक पक्ष व महायुतीच्या वरिष्ट स्थरावर मतदारसंघात उमेदवार जाहिर करण्यावरुन तार्जीक अडचणी निर्माण झाल्याचे सांगीतले जाते आहेत. पण जनसेवा पार्टीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.मोनोहर धोंडे यांनी विविध घटकातील जाती समुहाला निमंत्रीत करुन शहरात महाशक्ती प्रदर्शन रॉली काडून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. लोहा मतदारसंघातील निवडणूक विभागातुन कालच्या दिवशा अखेर पर्यंत २७ जनांनी ७० उमेदवारी अर्ज खरेदी केले पण अनेक ऑनलाईन सेन्टरवाल्यांनी अर्ज खरेदी केल्याचे कळाले. निवडणूक विभागात दोन दिवसांत एकही उमेदवाराने अर्ज दाखल केला नाही. २४ ऑक्टोबर २०२४ रोजी जनसेवा पार्टीचे अधिकृत उमेदवार प्रा मनोहर धोडे यांनी प्रथमच निवडणुक विभागात अर्ज दाखल करण्याचा प्रथम मान मिळवला आहे.

# वीर सैनिक ग्रुपतर्फे मातृभूमी प्रतिष्ठानचा गौरव




**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २४ ऑक्टोबर**

येथील वीर सैनिक ग्रुप आयोजित आजी-माजी सैनिक मेळावा देवकृपा लॉन्स, पूर्णा रोड येथे मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत हर्षोल्हासात नुकताच संपन्न झाला. यावेळी ब्रिगेडीअर सुधीर सावंत, कर्नल मुकुंद सरसर (शौर्यचक्र), अप्पर पोलीस अधीक्षक सूरज गुरव, सार्जंट रामराव थडके, सुभेदार विकास बल्फेवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

सदरील मेळाव्यात मातृभूमी प्रतिष्ठानचे सदस्य कॅप्टन प्रकाश कस्तुरे, सुधाकर बंडेवार, अशोक जोशी व गणेश जगताप यांचा अविरत सामाजिक प्रकल्प राबवित असल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला.

# विक्रांत गलगमोड यांची एमबीबीएस साठी निवड



**तभा वृत्तसेवा**
**उमरी,दि. २४ ऑक्टोबर**

उमरी तालुक्यातील बोथी येथील भुमिपुत्र विक्रांत ज्ञानेश्वर गलगमोड यांची लातूर येथील एमआयएसआर मेडिकल कॉलेजमधे एमबीबीएससाठी नियुक्ती करण्यात आली आहे. त्याबद्दल त्यांचा एका कार्यक्रमात सत्कार करण्यात आला. या प्रसंगी शिवसेनेचे माजी तालुकाप्रमुख साहेबराव पाटील शिंदे गणिपूरकर, पत्रकार नरेंद्र येरावार, ज्ञानेश्वर गलगमोड, हनुमंत गलगमोड, माधव रापतवार, प्रवीण जाधव, विकास जाधव, कृष्णा जाधव, भीमा सावरगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती. विक्रांतने बारावी परीक्षेत विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण होऊन नीट परीक्षेत ६१६ गुण घेऊन प्रथम श्रेणीत येण्याचा मान मिळवला होता. त्यामुळेच तो एमबीबीएससाठी पात्र ठरला आहे. त्याबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# हदगाव विधानसभा नाही तर आष्टी जिल्हा परिषद लढवणारः भागवत देवसरकर

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,दि. २४ ऑक्टोबर**



हदगाव विधानसभेच्या निवडणुकीच्या रिंगणात उतरणार नाही तसेच माहितीने जो उमेदवार दिला त्याचा ताकतीनिशी प्रचार करून हदगाव विधानसभेवर महायुतीचा झेंडा फडकणार व तसेच येणाऱ्या जिल्हा परिषद आष्टी गटात पूर्ण ताकदीनिशी निवडणूक लढवून जिंकणार असल्याची माहिती संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीचे अध्यक्ष तथा वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कार्यकारी परिषदेचे सदस्य भागवत देवसरकर यांनी दिली आहे. सध्या विधानसभा निवडणुकीसाठी मोठ्या प्रमाणात हालचाली सुरू असून अनेक इच्छुक भारतीय जनता पार्टी- शिवसेना - राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीच्या तिकिटासाठी लॉबिंग करत आहेत,

हदगाव विधानसभेत भारतीय जनता पार्टी व इतर गोरगरीब जनता शेतकऱ्यांसाठी अहोरात्र प्रयत्न करणारे व संजय गांधी निराधार योजना समितीच्या माध्यमातून हजारो निराधारांना आधार देणारे भागवत देवसरकर विधानसभेसाठी इच्छुक असल्याच्या सोशल मीडिया वर्तमानपत्रात बातम्या प्रकाशित झाल्यानंतर,प्रसार माध्यमांना माहिती देत भागवत देवसरकर यांनी येणाऱ्या विधानसभेमध्ये शिवसेना भाजपा राष्ट्रवादी काँग्रेस महायुती जो उमेदवार देईल त्याचा अहोरात्र प्रचार करून निवडून आणून महायुतीचा झेंडा हदगाव विधानसभेवर फडकणार असल्याचेही सांगितले,तसेच विधानसभेनंतर जिल्हा परिषद निवडणुकीत पूर्ण ताकदीनिशी उतरून आष्टी जिल्हा परिषद गटातील नागरिकांच्या सेवेसाठी कामासाठी त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी निवडणूक लढवून जिंकणार असल्याचे देखील भागवत देवसरकर यांनी सांगितले आहे.

# काव्यपौर्णिमा कार्यक्रमात वीरभद्र मिरेवाड आणि आनंद वाघमारे यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २४ ऑक्टोबर**

कोजागिरी पौर्णिमेनिमित्त येथील आकाश प्रकाशन युट्यूब चॅनलच्या वतीने सप्तरंगी साहित्य मंडळाच्या ८८ व्या काव्यपौर्णिमा कार्यक्रमांतर्गत कविसंमेलनाचे आणि गीत गायन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यात शहरातील व परिसरातील कवी, गायकांनी सहभागी होत जुन्या सुरेल गाण्यांची अविस्मरणीय बरसात केली. याच कार्यक्रमात नांदेड जिल्हा परिषदेने उत्कृष्ट शिक्षक म्हणून गौरविलेले साहित्यिक तथा बालकवी वीरभद्र मिरेवाड आणि आनंद वाघमारे यांचा चॅनलच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी गटशिक्षणाधिकारी डी. डी. सुपे हे होते. यावेळी सप्तरंगी साहित्य मंडळाचे राज्याध्यक्ष नागोराव डोंगरे, संस्थापक अध्यक्ष अनुरत्न वाघमारे, काव्यपौर्णिमेचे संकल्पक प्रज्ञाधर ढवळे, बालाजी थोटवे, आनंद वाघमारे, कवी पंडित पाटील बेरळीकर, साहित्यिक कवी विरभद्र मिरेवाड, गौतम हिंगोले, माधव कांबळे आदींची उपस्थिती होती.

# तबला वादनात पारितोषिक पटकावणाऱ्या हरिप्रसाद पांडेचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २४ ऑक्टोबर**



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत महाविद्याल यातील युवक महोत्सवावेळी तबला वादनात प्रथम तर शास्त्रीय ताल वादनात हरिप्रसाद पांडे या विद्यार्थ्यांने व्दितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकाविल्याने येथील शरदचंद्र महाविद्यालयातील प्राचार्य के. हरिबाबु यांच्या हस्ते सन्मान पूर्वक सत्कार केला.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व सहयोग सेवाभावी संस्था कॉलेज ऑफ एज्युकेशन विष्णु पुरी नांदेड यांच्या वतीने आयोजित केलेल्या २०२४ मधील युवक महोत्सवा वेळी येथील शरदचंद्र महाविद्यालयातील बी कॉम तृतीय वर्षाचा हरिप्रसाद पांडे या विद्यार्थ्याने तबला वादनामध्ये प्रथम क्रमांक तर शास्त्रीय ताल वादनातील तबला वादनात द्वितीय क्रमांक येण्याचा बहुमान मिळविला आहे तर काही उर्वरित विद्यार्थानी जिद्द अथक परिश्रम घेऊन .मूक अभिनय , एकांकिका ,मेहंदी, रांगोळी, कथा कथन,वादविवाद ,व्यंगचित्रकला,पोस्टरपेंटीग अशा विविध अभिनयात सहभाग नोंदवून यश संपादन केल्यामुळे शरदचंद्र महाविद्यालयाचे सचिव प्राध्यापक रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत प्राचार्य. डॉ. के.हरिभाऊ व उपप्राचार्य प्रा.डॉ.श्याम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली येथील महाविद्यालयात यशस्वी विद्यार्थ्यांचे सत्कार रुपी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक बलभिम वाघमारे सह ईतर प्राध्यापक वृंदानी.हारिप्रसाद पांडे सह.विविध कला क्षेत्रात यश संपादित केलेल्या विद्यार्थ्यांचे शाल श्रीफळ व पुष्पहार घालून सत्कार करुन पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. गो.रा.परडे यांनी केले कार्यक्रमाचे प्रस्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ.एन पी सानप यांनी केले.तर आभारप्रदर्शन प्रा. डॉ. संजीवनी वाडेकर यांनी केले.

या गुणगौरव कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी प्रचंड मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# टाटा मोटर्सकडून व्यावसायिक वाहनांसाठी 'कस्टमर केअर महोत्सव'

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २४ ऑक्टोबर**

टाटा मोटर्स या भारतातील सर्वात मोठ्या व्यावसायिक वाहन उत्पादक कंपनीने व्यावसायिक वाहन ग्राहकांसाठी सर्वसमावेशक ग्राहक सहभाग उपक्रम अर्थात 'कस्टमर केअर महोत्सव २०२४'च्या लाँचची घोषणा केली. हा उपक्रम २३ ऑक्टोबर ते २४ डिसेंबर पर्यंत राबवण्यात येईल. हा उपक्रम देशभरातील अडीच हजारहून अधिक अधिकृत सर्विस आऊटलेट्समध्ये आयोजित करण्यात आला आहे. . या महोत्सवाच्या माध्यमातून ग्राहक अनेक फायद्यांचा आनंद घेऊ शकतात, वाहन तपासणी, इंधन बचत या संदर्भात तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जाईल. कस्टमर केअर महोत्सव २०२४ एडिशन लाँच करताना टाटा मोटर्सचे कार्यकारी संचालक गिरीश वाघ म्हणाले, ''आम्हाला यंदा २३ ऑक्टोबरपासून कस्टमर केअर महोत्सव सुरू करण्याचा आनंद होत आहे. या दिवसाचे आमच्यासाठी खास महत्त्व आहे, जेथे आम्ही १९५४ मध्ये आमच्या पहिल्या व्यावसायिक वाहनाची विक्री केली होती आणि आम्ही आता हा दिवस कस्टमर केअर डे म्हणून साजरा करतो. या महोत्सवामधून सखोल वेईकल चेक-अप्स आणि अनेक फायदे देत दर्जात्मक सेवा देण्याप्रती आमची कटिबद्धता दिसून येते. महोत्सव देशभरातील प्रत्येक टचपॉइण्ट्सवर ग्राहकांना आनंदित करण्याची खात्री घेत आमचा आमच्या सर्व भागधारकांसोबतचे नाते दृढ करण्याचा मनसुबा आहे. आम्ही सर्व ग्राहकांना जवळच्या टाटा अधिकृत सर्विस सेंटर्समध्ये येण्याचे आमंत्रण देतो आणि मला विश्वास आहे की, हा उपक्रम त्यांच्या व्यवसायांमध्ये अधिक मूल्याची भर करेल

तरुण भारत
Solapur Tarun Bharat


# छत्रपती संभाजीनगर



### आचारसंहिता कालावधीत लोकशाही दिनाचे आयोजन नाही

छत्रपती संभाजीनगर, दि.२४(जिमाका):- दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. तथापि, भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान सभेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम घोषीत केला असून त्यानुसार दि.२५ नोव्हेंबर पर्यंत निवडणूक आदर्श आचारसंहिता लागू असणार आहे. तरी या कालावधीत येणाऱ्या सोमवार दि.४ नोव्हेंबर रोजी होणारा लोकशाही दिन होणार नाही असे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने कळविण्यात आले आहे.

### जितो महिला महाराष्ट्र अध्यक्षपदी डिंपल पगारीया



छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधित जितो महिला शाखा छत्रपती संभाजीनगर च्या अध्यक्षा डिंपल पगारीया यांची नुकतीच जितो महाराष्ट्र महिला विग च्या अध्यक्ष पदी आगामी २ वर्षासाठी निवड करण्यात आली आहे. मागील दोन वर्षाच्या अध्यक्ष पदाच्या आपल्या उल्लेखनीय सामाजिक धार्मिक व बहु उपयोगी उपक्रमाचे यशस्वी आयोजना च्या पार्श्वभुमिवर त्यांची निवड करण्यात आली त्यांच्या निवडीचे सर्वत्र अभिनन्दन होत आहे निवड होताच संभाजीनगरात भविष्यात मोठ्या प्रमाणावर सामाजिक कार्यक्रम व पर्यावरण व हितपयोगी उपक्रम व महिला सक्षमीकरणासाठी उपक्रम राबविण्याचा संकल्प त्यानी व्यक्त केला.

### आचारसंहिता भंगाच्या तक्रारींसाठी टोल फ्रि क्रमांक

छत्रपती संभाजीनगर, दि.२४(जिमाका):- विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी आचारसंहिता लागू झाली आहे. या कालावधीत आदर्श आचारसंहिता भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास नागरिकांनी भारत निवडणूक आयोगाच्या सी-व्हिजील मोबाईल ॲपवर किंवा १९५० या टोल फ्री क्रमांकावर तक्रार करावी,असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी केले आहे.

विधानसभा निवडणूक आचारसंहिता लागू झाल्यापासून आदर्श आचारसंहितेचा भंग होत असल्यास नागरीक लतखत्रक्षखङ ॲपद्वारे तसेच १९५० या टोल फ्रि क्रमांकावर फोन करुन तक्रारी दाखल करु शकतात. क्षेत्रिय पथकाद्वारे प्राप्त तक्रारींची शहानिशा करुन तक्रार १०० मिनिटात निकाली काढण्यात येते. त्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हा नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले आहे. तसेच प्रत्येक विधानसभा क्षेत्रनिहायही नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. बंदुक/पिस्तुल प्रदर्शन करणे, दारु वाटप, पैसे वाटप, सरकारी मालमत्तेचे विद्रुपन, बनावट बातमी, मतदारांची वाहतुक, भेटवस्तू वाटप, पेड न्यूज, जातीत तेढ निर्माण करणारे भाषण, धमकी इत्यादी प्रकार होत असल्याचे निदर्शनास आल्यास नागरिक अशा घटनांचे लतखत्रक्षखङ ॲपद्वारे फोटो, व्हिडीओ तसेच ऑडिओ रेकॉर्ड करुन ऑनलाईन तक्रारी दाखल करु शकतात. नागरिकांनी या सुविधांचा वापर करावा असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे.

### खट्याळ पिट्या...




## लोकशाही व्यवस्थेचे महत्त्व मतदानाच्या अधिकारात- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

छत्रपती संभाजीनगर, दि.२४(जिमाका):- लोकशाही व्यवस्था ही जगातील सर्वोत्कृष्ट व्यवस्था आहे. आपल्याला मिळणाऱ्या विविध सोई, सुविधा आपले शिक्षण, रोजगार प्राप्त करण्याचा हक्क लोकशाहीमुळे व त्यात दिलेल्या मतदानाच्या अधिकारात आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले.

येथील शासकीय ज्ञानविज्ञान महाविद्यालयात मतदार जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला. स्वीप नोडल अधिकारी अंकुश पांढरे, सहा. नोडल अधिकारी स्वप्निल सरदार, प्राचार्य रोहिणी कुलकर्णी, प्रा. भगवान कांबळे आदी उपस्थित होते.



जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, विद्यार्थी जिवनात विद्यार्जन करणे हे आपले आद्यकर्तव्य आहे. तसेच लोकशाहीचे संवर्धन आणि जतन करणे हे सुद्धा आपले आद्यकर्तव्य आहे. त्यासाठी युवकांनी आपले नाव मतदार यादीत नोंदवून मतदान करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या भवतालच्या सार्वजनिक प्रश्नात लक्ष घालून पर्यावरण रक्षण, प्रदूषण नियंत्रण, वृक्षरोपण अशा विविध विषयांत विद्यार्थ्यांनी कार्यरत असणे आवश्यक आहे,असे जिल्हाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.

ते पुढे म्हणाले की, आपल्या आई वडील, गुरुजनांचा आदर करणे, सुसंस्कारित होणे यासारख्या बाबी ह्या व्यक्तिमत्व विकासाला पूरक असतात. या संस्कारांपासून दुर जाणाऱ्या पिढीला संस्कारक्षम बनवून देश, राज्य आणि समाजाभिमुख युवक घडविणे हे आजच्या शिक्षक आणि पालकांचे उद्दिष्ट असायला हवे. समाजात विद्यार्थी आत्महत्या, गर्भलिंगनिदान आणि कन्या भ्रूण हत्या, व्यसनाधिनता अशा विविध समस्यांमागे संस्कारहिनता हे कारण आहे. आजचा समाज शिक्षित झाला आहे तितका तो सुसंस्कारित झालेला नाही. त्यासाठी महाविद्यालयातील शिक्षकांनी व पालकांनी सतर्क रहायला हवे,असे आवाहन त्यांनी केले. प्रास्ताविक स्वप्निल सरदार यांनी केले तर उपायुक्त अंकुश पांढरे यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य रोहिणी कुलकर्णी यांनी केला.

## राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत कल्याणी नरवडे कास्यपदक विजेती



बिडकीन दि २४ ऑक्टोबर : क्रीडा व युवक सेवा संचालनालय,पुणे व महाराष्ट्र राज्य कुस्ती संघ आयोजित राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत पैठण तालुक्यातील श्री सरस्वती भुवन प्रशाला बिडकीन येथील विद्यार्थीनी कु. कल्याणी नरवडे ही चौदा वर्षे वयोगटातील बेचाळीस किलो वजन गटात कांस्यपदकाची मानकरी ठरली आहे. परभणी येथे झालेल्या राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत कल्याणी नरवडे हिने हे नेत्रदीपक यश संपादन केले आहे. तिला क्रीडा शिक्षक मोहम्मद आसिफ शेख, अनिल कांबळे, यांचे मार्गदर्शन लाभले. या घवघवीत यशाबद्दल कल्याणी नरवडे हिचे संस्थेच्या नियामक मंडळाचे सदस्य तसेच शालेय समितीचे सर्व सदस्य, व पर्यवेक्षिका मनिषा मिश्रा,प्रभारी पर्यवेक्षक राजू शिंदे, ज्ञानेश्वर चाटूपळे,रायभान ठाणगे, बाबासाहेब सोकटकर,व शिक्षक शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे .

## तीन उमेदवारांनी निवडणूक नामनिर्देशन पत्र केले दाखल





**उबाठा गटाचे विद्यमान आ. उदयसिंग राजपूत, अजित पवार गटाचे संतोष कोल्हे तर एक अपक्ष**

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.२४ ऑक्टोबर - विधानसभेच्या रणधुमाळीत उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल केले आहेत कन्नड सोयगाव विधानसभेत दि.२४ रोजी तीन नामनिर्देशन पत्र दाखल केले आहेत

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे विद्यमान आमदार उदयसिंग राजपूत, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाचे संतोष कोल्हे,तर अपक्ष संगीता गणेश जाधव यांनी नामनिर्देशन पत्र दि.२४ रोजी दाखल केले तर दि.२३ रोजी माजी आमदार हर्षवर्धन जाधव यांनी आपले नामनिर्देशन पत्र दाखल केले होते.

कन्नड सोयगाव विधानसभेची जागा महाविकास आघाडीकडून शिवसेना उद्धव बाळासाहेब गटाला सुटली आहे तर महायुतीचा तिढा मात्र अद्यापपर्यंत सुटला नाही,महायुती कडून संतोष कोल्हे यांनी नामनिर्देशन पत्र दाखल केल्याने विधानसभेची जागा अजित पवार गटाला सुटली की काय असा प्रश्न उपस्थित झाला आहे ? महायुती कडून इच्छुकांची भाऊगर्दी असल्याने कन्नड सोयगाव विधानसभा मतदार संघात सगळेच उमेदवार दावा करत असल्याने मोठा पेच निर्माण झाला आहे,पक्षश्रेष्ठी कोणाला ही संधी देतात हे चित्र आगामी काळात स्पष्ट होईल पण सद्या नेते मंडळी सह नागरिक संभ्रमात आहेत,त्यामुळे वेगवेगळ्या चर्चा रंगत आहे

## अठरा पगड जातींना शिवरायांनी सोबत घेऊन स्वराज्य निर्माण केले होते

### माजी आमदार हर्षवर्धन जाधव यांची उर्स मैदानात सभा

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.२४ ऑक्टोबर - मनोज जरांगे माझा भाऊ आहे मला त्यांचा अभिमान आहे मात्र अहंकार नको. मला त्रास झाला तर राज्यातील मराठा समाज तुम्हाला माफ करणार नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरा पगड जातींना सोबत घेऊन स्वराज्य निर्माण करून राज्य चालविले.

सर्व जाती एकमेकांसाठी पूरक आहेत, आम्ही जातीयवादी नाहीये, तुम्हीही जातीयवाद करु नका. मराठा आरक्षणासाठी, जातीसाठी मी सर्वप्रथम राजीनामा दिला आहे. त्यामुळे मनोज जरांगे यांनी माझ्या उमेदवारीला जाहीर पाठिंबा द्यावा, असे आवाहन माजी आमदार हर्षवर्धन जाधव यांनी केले आहे.

हर्षवर्धन जाधव यांनी आज गुरुवार २४ ऑक्टोंबर रोजी आपला अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला.



यानंतर कन्नड शहरातील पिशोर नाका येथून, ढोल - ताशांच्या गजरात वाजत गाजत मोठी रॅली काढण्यात आली. मेनरोड, तहसील कार्यालय, सिद्दिक चौक मार्गे निघालेल्या या रॅलीचे उर्स मैदानात सभेत रूपांतर करण्यात आले. या सभेला संबोधित करताना ते बोलत होते.

या वेळी हर्षवर्धन जाधव यांच्या मातोश्री तथा माजी आमदार तेजस्विनीताई जाधव यांच्यासह स्व. रायभान जाधव यांच्या फळीतील जुने कार्यकर्ते यांची मंचावर उपस्थिती होती.

या वेळी बोलताना हर्षवर्धन जाधव पुढे म्हणाले की, मातीत बसणारी आणि मातीतून सोनं पिकविनारी माणसं स्व. रायभान जाधव यांनी तयार केली, त्यांनी तालुक्यात ठिकठिकाणी धरणे बांधली, तालुका सुजलाम् सुफलाम् करत, तालुक्याचा विकास केला. मात्र माझं चुकलं नसतं तर ही गाढवं निवडून आली नसती. मला माफ करा, मतदार संघातील जनतेच्या घरोघरी जाऊन त्यांच्या पाया पडलो, त्यांचे आशिर्वाद घेतले, तालुक्यातील सर्व जाती धर्मातील माणसे माझ्यासोबत आहेत.

मतदार संघात, पंचायत समितीतीत, सर्वत्र एजंट फिरताहेत. जनतेला आपल्या हक्काच्या कामासाठी पैसै मोजावे लागणार असतील तर राजकीय पक्ष आणि त्यांचे नेते कशाला पाहिजे. माझ्याकडे पैसा नाही, माझ्याकडे गाड्या नाहीत एव्हढेच काय माझ्याकडे मानसी नाईक नाही पण माझ्याकडे अभ्यास आहे, माझ्याकडे बुद्धी आहे. येथे पाहिजे जातीचे येड्या - गबाळ्याचे काम नव्हे. येणाऱ्या २० तारखेला इतके मतदान करा की, यांच्या ५ पिढ्यांनी पुन्हा निवडणुकीचा फार्म भरण्याचा विचार नाही केला पाहिजे. यांना येतयं काय? रात्रभर वाचली गीता अन् कालचा गोंधळ बरा होता अशी यांची अवस्था आहे.

राज्य कारभारासाठी सर्वांना सोबत घ्यावेच लागते. असे म्हणत उपस्थितांना त्यांनी भावनिक आवाहन करुन येत्या २० तारखेला प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन केले.या प्रसंगी कन्नड शहरासह मतदार संघातील कार्यकर्ते व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थित होते

### एक महाराष्ट्र, श्रेष्ठ महाराष्ट्र या विषयावरील व्याख्यानाचे देवगिरी बँके तर्फे यशस्वी आयोजन

## आयटी म्हणजे फक्त इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी नाही तर इंडीयाज टुमारो : डॉ. उदय निरगुडकर

छत्रपती संभाजीनगर : देवगिरी नागरी सहकारी बँक लि., छत्रपती संभाजीनगर तर्फे दि. २१ ऑक्टोबर २०२४ रोजी एक महाराष्ट्र, श्रेष्ठ महाराष्ट्र या महत्त्वपूर्ण विषयावर प्रसिद्ध पत्रकार, वक्ते आणि लेखक डॉ. उदय निरगुडकर यांच्या व्याख्यानाचे आयोजन लोकनेते गोपीनाथराव मुंडे वंजारी समाज भवन येथे करण्यात आले होते.

आपल्या प्रभावी भाषणात डॉ. निरगुडकर यांनी भारताच्या अर्थकारणात महाराष्ट्राच्या महत्वपूर्ण योगदानाचे महत्व विषद केले भारताच्या प्रगती मध्ये



सगळ्यात जास्त वाटा महाराष्ट्राचा आहे हे त्यांनी तपशीलवार महिती सह स्पष्ट केले. तसेच महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक परंपरेवर प्रकाश टाकत राज्याच्या प्रगतीसाठी ठोस विचार मांडले

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड उपस्थित होते. देवगिरी बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे, सामाजिक कार्यकर्ते मंगलमूर्ती शास्त्री, संचालक नागनाथ काजळे, तसेच संचालिका अमिता लेकुरवाळे यांची मंचावर उपस्थिती होती.

डॉ. कराड यांनी आपल्या प्रस्ताविकात देवगिरी बँकेच्या विविध सामाजिक उपक्रमांचा विशेष उल्लेख करत बँकेचे अध्यक्ष शितोळे यांचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन देवगिरी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. प्रवीण नांदेडकर यांनी केले या व्याख्यानास शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांसह नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या प्रसंगी बँकेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी दत्ता शिंदे, अधिकारी आणि कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## पैठणला महायुतीतुन बंडखोरी

तभा वृत्तसेवा

पैठण दि २४ :- राज्यातील विधानसभेची प्रथम उमेदवारी जाहीर करत भारतीय जनता पक्ष, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई आठवले गट यांच्या महायुतीच्या वतीने पैठण विधानसभेसाठी शिवसेनेचे विलास संदीपान भुमरे यांना अधिकृत उमेदवारी जाहीर केली असता आता भाजपचे विधानसभा प्रमुख डॉ सुनील शिंदे यांनी बंडखोरी करत पैठण निवडणूक अधिकारी यांच्याकडे आपला अपक्ष उमेदवारी अर्ज सादर केल्याने भाजपचे वरिष्ठ याबाबत काय निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

शिवसेना-मनसे-भाजपा अशी वारी करून आलेले डॉ



सुनील शिंदे हे वर्षभरापूर्वी भाजपचे पैठण तालुकाध्यक्ष होते. आता त्यांच्याकडे भाजपा विधानसभा प्रमुख हे पद असून आता त्यांनी महायुतीतुन बंडखोरी करत पैठण विधानसभेसाठी आपला अपक्ष उमेदवारी अर्ज निवडणूक अधिकारी नीलम बाफना यांच्याकडे भरला आहे. महाशक्ती परिवर्तन आघाडीच्या वतीने उमेदवारी अर्ज भरल्याची माहिती डॉ सुनील शिंदे यांनी दिली.याप्रसंगी विठ्ठल मोगल, अप्पासाहेब सोलाट, प्रशांत आव्हाड, मुस्तफा पठान, शिवाजी गाडे,अशोक कार्डीले, संतोष फासाटे, राजधर फसलें, सुरेश खराद, सूरज घुले, कृष्णा शिंदे, गोवर्धन नाटकर,प्रवीण धोडगे,आकाश कुलथे, सुदाम मोगल आदी उपस्थित होते. डॉ सुनील शिंदे यांनी केलेल्या बंडखोरी विरुद्ध भाजपा वरिष्ठ काय निर्णय घेतात याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## महायुतीकडून भाजपचे आ. प्रशांत बंब यांचा उमेदवारी अर्ज दाखल

### महायुतीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची उपस्थिती, गंगापुर खुलताबाद मतदार संघातून चौथ्यांदा उमेदवारी

तभा. वृत्तसेवा,

गंगापूर दि.२४ ऑक्टोबर:( गिरीष गंगापूरकर)

महायुतीकडून गंगापूर खुलताबाद मतदारसंघातून अधिकृत उमेदवारी मिळालेले भाजपचे आमदार प्रशांत बंब यांनी चौथ्या टर्म साठी गुरुवारी (दि.२४) आपला उमेदवारी अर्ज मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी सुचित्रा शिंदे, गंगापूरचे तहसीलदार नवनाथ वगवाड खुलताबाद चे तहसीलदार स्वरूप कंकाळ यांच्याकडे




सुपूर्द करण्यात आला.यावेळी पोलीस उपविभागीय अधिकारी दिलीप भागवत पोलीस निरीक्षक कुमारसिंग राठोड उपस्थित होते.

यावेळी भारतीय जनता पार्टीचे राज्य कार्यकारणी सदस्य किशोर धनायत भाजपचे जिल्हाध्यक्ष संजयजी खंबायते कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती भाऊसाहेब पदार लासुर स्टेशन कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती शेषराव नाना जाधव भाजपचे तालुकाध्यक्ष रवींद्र चव्हाण खुलताबाद तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर नलावडे विधानसभेचे निवडणूक प्रमुख विकास कापसे संजय ठोकळ युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष अमोल जाधव राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष विजय वरकड राष्ट्रवादीचे युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष मनोज वरकड जिल्हा सरचिटणीस अशोक मंत्री नंदकुमार गांधीले शिवसेना गंगापूर तालुकाध्यक्ष दिलीप निरफळ आरपीआयचे तालुकाध्यक्ष फकीरा भालेराव शिवसेना शिंदे गटात तालुकाध्यक्ष विशाल खोसरे निखिल चव्हाण प्रदीप भुजबळ रामेश्वर मुंदडा जिल्हा उपाध्यक्ष शिवनाथ मालकर युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष वैभव धनायत शहराध्यक्ष मारुती खैरे नगरसेवक प्रदीप पाटील अविनाश गायकवाड दीपक साळवे शहर सरचिटणीस प्रशांत मुळे कृष्णकांत व्यवहारे अतुल रासकर अमोल शिंदे गोपाल वर्मा रज्जाक पठाण अप्पासाहेब पाचपुते कृष्णा सुकाशे दीपक बडे संजय अभंग उपस्थित होते.

गंगापूर खुलताबाद मतदारसंघात केलेल्या पंधरा वर्षाच्या विकास कामाच्या जोरावर भारतीय जनता पक्षाने महायुती कडून मला उमेदवारी दिली या उमेदवारीमुळे या निवडणुकीत भरघोस मतांनी निवडून येण्याची मला खात्री आहे. विकास आणि विश्वास या जोरावर मला विजयाची खात्री आहे.

\- आ. प्रशांत बंब



# प्रियांका वढेरा उतरल्या निवडणूक रिंगणात!

### वायनाडमधून उमेदवारी अर्ज दाखल

◆ **वायनाड, २४ ऑक्टोबर**

काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियांका वढेरा अखेर निवडणूक रिंगणात उतरल्या आहेत. त्यांनी बुधवारी केरळमधील वायनाड लोकसभा मतदारसंघात उमेदवारी अर्ज दाखल केला. तत्पूर्वी, त्यांनी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासोबत वायनाडमध्ये भव्य रोड शो करीत जाहीर सभाही घेतली.

लोकसभा निवडणुकीत काँग्रेस नेते राहुल गांधी उत्तरप्रदेशातील रायबरेली आणि केरळमधील वायनाड अशा दोन मतदारसंघांतून निवडून आले होते. त्यानंतर त्यांनी वायनाडची जागा सोडली. त्यामुळे ही जागा रिक्त झाली होती. राजीनामा दिला असला, तरी वायनाडसोबत मी कायम जुळला आहे, असे राहुल गांधी म्हणाले होते आणि तेव्हाच काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनी प्रियांका वढेरा यांची उमेदवारीही जाहीर केली होती.



उमेदवारी अर्ज दाखल करताना प्रियांका वढेरा

#### १३ नोव्हेंबरला मतदान

वायनाड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी भाजपाने नव्या हरिदास यांना उमेदवारी दिली आहे. भारतीय कम्युनिस्ट पक्षाने (सीपीआय) ज्येष्ठ नेते सत्यान मोकेरी यांना उमेदवारी दिली आहे. वायनाड पोटनिवडणुकीसाठी १३ नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होईल.

काँग्रेस नेत्या प्रियांका वढेरा यांनी वायनाड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे, काँग्रेसच्या जेष्ठ नेत्या व संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी, लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी आणि पक्षाचे वरिष्ठ नेते उपस्थित होते. तत्पूर्वी, त्यांनी राहुल गांधी यांच्यासोबत वायनाडमध्ये भव्य रोड शो केला.

रोड शोनंतर जाहीर सभेला संबोधित करताना प्रियांका वढेरा म्हणाल्या, मी वेगवेगळ्या निवडणुकांसाठी प्रचार करीत ३५ वर्षे झाली आहेत. मी पहिल्यांदाच तुमच्या समर्थनासाठी प्रचार करीत आहे.

यावेळी मल्लिकार्जुन खडगे म्हणाले की, राहुल यांनी सोनिया गांधी यांचा मतदारसंघ असलेल्या रायबरेलीतून निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला होता. तेव्हा वायनाडमधील जनतेची मागणी आणि गांधी कुटुंबावरील प्रेम यामुळे आम्ही प्रियांका वढेरा यांना वायनाड पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी देण्याचा निर्णय घेतला. *(वृत्तसंस्था)*

# अजित पवारांनी दिले निवृत्ती घेतलेल्या आमदाराला तिकीट

### पुतण्याला नाकारून काकांना उमेदवारी

◆ **बीड, २४ ऑक्टोबर**

राजकारणात निवृत्ती जाहीर केलेल्या प्रकाश सोळंके यांना अजित पवारांनी मैदानात उतरवले आहे. योग्य वयात निवृत्त व्हायला पाहिजे, असे आ. प्रकाश सोळुंके यांनी शरद पवारांना उद्देशून म्हटले होते. मात्र, आज त्यांचे नाव यादीत जाहीर झाल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.



बीड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसने कंबर कसली असून, दोन उमेदवारांच्या नावांची घोषणा करण्यात आली आहे. त्यामध्ये, परळी मतदारसंघातून धनंजय मुंडेंची उमेदवारी जाहीर झाली आहे, तर माजलगाव मतदारसंघातून विद्यमान आमदार प्रकाश सोळंके यांना तिकीट देण्यात आले. राजकारणातून निवृत्ती घोषित केलेल्या नेत्याला अजित पवारांनी यंदाच्या विधानसभा निवडणुकीच्या मैदानात उतरवले.

बीडमधील माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके यांनी आगामी विधानसभा निवडणूक लढवणार नसल्याची घोषणा केली होती. प्रकाश सोळंके आगामी २०२४ च्या विधानसभा निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर मतदारसंघातील गावांचे दौरे करीत होते. त्याचवेळी त्यांनी यंदाची विधानसभा लढवणार नसल्याची घोषणा केली. आपले राजकीय वारसदार म्हणून त्यांचा पुतण्या जयसिंह सोळंके यांच्या नावाची घोषणा देखील केली होती. अजित पवारांनी मात्र पुतण्याला नाकारून काकाच्या हाती उमेदवारी सोपवली. *(वृत्तसंस्था)*

### राष्ट्रवादी काँग्रेसची यादी

| नाव | मतदारसंघ |
|---|---|
| अजित पवार | बारामती |
| छगन भुजबळ | येवला |
| दिलीप वळसे पाटील | आंबेगाव |
| हसन मुश्रीफ | कागल |
| धनंजय मुंडे | परळी |
| नरहरी झिरवाळ | दिंडोरी |
| **धर्मराव बाबा अत्राम** | **अहेरी** |
| अदिती तटकरे | श्रीवर्धन |
| अनिल भाईदास पाटील | अंमळनेर |
| संजय बनसोडे | उदगीर |
| **राजकुमार बडोले** | **अर्जुनी मोरगाव** |
| प्रकाश दादा सोळंके | माजलगाव |
| मकरंद पाटील | वाई |
| माणिकराव कोकाटे | सिन्नर |
| दिलीप मोहिते पाटील | खेड आळंदी |
| संग्राम जगताप | अहमदनगर शहर |
| दत्तात्रेय भरणे | इंदापूर |
| बाबासाहेब पाटील | अहमदपूर |
| दौलत दरोडा | शहापूर |
| अण्णा बनसोडे | पिंपरी |
| नितीन पवार | कळवण |
| आशुतोष काळे | कोपरगाव |
| किरण लहामटे | अकोले |
| चंद्रकांत उर्फ राजू नवघरे | वसमत |
| शेखर निकम | चिपळूण |
| सुनील शेळके | मावळ |
| अतुल बेनके | जुन्नर |
| यशवंत माने | मोहोळ |
| चेतन तुपे | हडपसर |
| सरोज आहिरे | देवळाली |
| राजेश पाटील | चंदगड |
| हिरामण खोसकर | इगतपुरी |
| **राजे कारमोरे** | **तुमसर** |
| **इंद्रनील नाईक** | **पुसद** |
| **सुलभा खोडके** | **अमरावती शहर** |
| भरत गावित | नवापूर |
| निर्णला विटेकर | पाथरी |
| नजीब मुल्ला | मुंब्रा-कळवा |

# गुलाल नाय उधळला तर फास घेऊन मरेन

### शहाजीबापूंचे संजय राऊतांना 'चॅलेंज'

◆ **सोलापूर, २४ ऑक्टोबर**

उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे खा. संजय राऊत यांनी शहाजीबापूंना पाच रुपयांवरून चांगलेच ट्रोल केले होते. त्यातच सांगोल्यातून पुन्हा उमेदवारी जाहीर झाल्यानंतर शहाजीबापू पाटील यांनी तुफान टोलेबाजी केली आहे.

संजय राऊत हा महाराष्ट्रात भुंकणारा कुत्रा आहे. माझ्याविरोधात संजय राऊत, त्याचा बाप, आजा यांनी एक नाही तर दहा सभा घेऊ देत...मी त्याला पालथा पाडून तुडवून पुढे जाऊन दाखवणार...उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांच्याकडे कोणतेही व्हिजन नाही. माझ्यावर टीका करण्याशिवाय त्यांच्याकडे काही मुद्दाच नाही. आज संजय राऊतांना सांगतो, तुम्ही सात-आठ सभा घ्या, मी विजयाचा गुलाल उधळला नाही, फास घेऊन मरेन, असेही शहाजीबापू म्हणाले.



**पाच कोटींबाबत प्रतिक्रिया**

खेड-शिवापूर टोलनाक्यावर इनोव्हामध्ये सापडलेल्या पाच कोटींबाबतही बापूंनी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले की, पुणे येथे सापडलेले पैसे हे रफिक शेख यांचे होते त्यांनी ते कबूलही केले असून, ते मोठे व्यापारी आहेत. त्यांचे पैसे आहेत, अशी जबाबदारी त्यांनी घेतली आहे. हे पैसे एका गाडीत असताना विनाकारण एकनाथ शिंदे यांना बदनाम करण्याचा प्रयत्न संजय राऊत, जितेंद्र आव्हाड आणि रोहित पवार करीत आहेत. पाठवलेले पैसे पाच कोटींपेक्षा जास्त असल्याचा आरोप करणारे रोहित पवार रफिक भाईंचे पैसे मोजायला गेले होते का, असा टोला शहाजीबापू पाटील यांनी लगावला. *(वृत्तसंस्था)*

# ठाकरे गटाला झटका देत संभाजी ब्रिगेडचा स्वबळाचा नारा

### ५० पेक्षा जास्त उमेदवार करणार जाहीर

◆ **पुणे, २४ ऑक्टोबर**

संभाजी ब्रिगेडने उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाला झटका देत राज्यात ५० पेक्षा जास्त उमेदवार उभे करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. ठाकरे गटासोबत अडीच वर्षे असणारी संभाजी ब्रिगेडची आघाडी तुटणार आहे. त्यामुळे शिवसेना ठाकरे गटाच्या अडचणी वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

संभाजी ब्रिगेड नाराज असून त्यांनी आता स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतल्याच्या चर्चा आहेत. संभाजी ब्रिगेड शिवसेना ठाकरे गटासोबत असणारी अडीच वर्षांची आघाडी तोडणार आहे.

लवकरच संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष मनोज आखरे भूमिका जाहीर करणार असल्याची माहिती समोर आली. संभाजी ब्रिगेडच्या या निर्णयामुळे शिवसेना ठाकरे गटाला निवडणुकीत मोठा धक्का बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

संभाजी ब्रिगेडच्या एका शिष्टमंडळाने काही दिवसांपूर्वी मराठा आरक्षणासाठी आंदोलनाचा लढा उभारणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली होती. मराठा आरक्षणाच्या मुद्यावरून संभाजी ब्रिगेड मनोज जरांगे यांच्याबरोबर जाणार आहेत. मराठा क्रांती मोर्चाकडून आता नेमकी कोणाकोणाला उमेदवारी जाहीर केली जाईल, हे पाहणेही महत्त्वाचे असणार आहे. *(वृत्तसंस्था)*

# हेमंत सोरेन यांचा पराभव करणाऱ्या भाजपा माजी आमदाराने पक्ष सोडला

◆ **रांची, २४ ऑक्टोबर**

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर झारखंड मुक्ती मोर्चाने भाजपाला मोठा धक्का दिला आहे. भाजपाच्या तीन माजी आमदारांनी झारखंड मुक्ती मोर्चात प्रवेश केला आहे. यामध्ये लुईस मरांडी, सारंगी आणि लक्ष्मण तुडू यांचा समावेश आहे.

काही दिवसांपूर्वीच, तीन वेळा भाजपाचे आमदार राहिलेले केदार हाजरा आणि एजेएसयू पार्टी पक्षाचे उमाकांत रजक यांनी देखील झामुमोमध्ये प्रवेश केला होता. त्यातच आता भाजपाचे माजी आमदार लुईस मरांडी यांनीही या पक्षात प्रवेश केला. यावेळी त्यांनी भाजपावर अनेक आरोप केले आहेत. लुईस मरांडी यांनी झारखंडमधील दुमका मतदारसंघातून तीनदा निवडणूक लढवली आहे. २०१४ च्या निवडणुकीतही त्यांनी हेमंत सोरेन यांचा पराभव केला होता. त्यामुळे त्यांच्या पक्ष प्रवेशाचा झामुमोला मोठा फायदा होऊ शकतो. याशिवाय दुमकाच्या आसपासच्या जागांवरही फायदा होऊ शकतो. लुईस मरांडी यांनी पक्षात प्रवेश केल्यानंतर मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी त्यांचे स्वागत केले. आम्ही भाजपाचे माजी उपाध्यक्ष आणि ज्येष्ठ नेते आदरणीय लुईस मरांडी यांचे झामुमो परिवारात मनापासून स्वागत करतो, असे सोरेन यांनी म्हटले आहे. *(वृत्तसंस्था)*



कर्नाटकातील भाजपाचे नेते आणि माजी मंत्री सी. पी. योगेश्वर यांनी बुधवारी बंगुळुरूत काँग्रेस पक्षात प्रवेश केला. कर्नाटकचे उपमुख्यमंत्री व काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष डी. के. शिवकुमार यांनी त्यांचे स्वागत केले

# हजाराच्या आतील मताधिक्याने विजयी झालेले पाच आमदार

◆ **मुंबई, २४ ऑक्टोबर**

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत कमी मताधिक्याने विजयी झालेल्या उमेदवारांवर टांगती तलवार होती. त्यातील काहींना तिकीट मिळाले असून, आतापर्यंतच्या यादीत एका उमेदवाराच्या पदरी मात्र निराशा आली आहे. हजारपेक्षा कमी मताधिक्य घेऊन पाच आमदार विजयी झाले होते.

कोपरगाव मतदारसंघातून आशुतोष काळे हे ८२२ मतांनी विजयी झाले होते. त्यांना यंदाही अजित पवारांनी तिकीट दिले आहे. शिवसेनेचे शहाजी बापू पाटील हे गत निवडणुकीत ७६८ मतांनी विजयी झाले होते. यंदा त्यांना शिवसेनेकडून तिकीट देण्यात आले आहे. सांगोला मतदारसंघातून ते मैदानात आहेत.

दौंड मतदारसंघातील राहुल कूल यांच्या मतदारसंघाचा निर्णय अद्याप बाकी आहे. मात्र, २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांना ७४६ मतांनी विजय मिळाला होता. राष्ट्रवादी काँग्रेसकडून विद्यमान मनोहर चंद्रिकापुरे यांना उमेदवारी नाकारण्यात आली. चंद्रिकापुरे यांना गत निवडणुकीत ७१८ मतांनी विजय मिळाला होता. यंदा तेथून राजकुमार बडोले यांना राकाँने तिकीट दिले आहे. शिवसेनेने विद्यमान आ. दिलीप लांडे यांनाही तिकीट दिले आहे. मात्र, २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांना केवळ ४०९ मतांनी विजय मिळाला होता. *(वृत्तसंस्था)*

# आदित्य सत्तेत असताना निवडणूक लढला

### अमित ठाकरे यांचे भावाबाबत पहिल्यांदाच नाव घेत भाष्य

◆ **मुंबई, २४ ऑक्टोबर**

पक्षाला गरज होती. इतके नेते आले, त्यांची मुले सत्तेत असताना आली. शिवसेनेचे बघू, आदित्यने सत्तेत असताना निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला. चांगला निर्णय होता, पण तो सत्तेत होता, असे म्हणत मनसे नेते अमित ठाकरे यांनी पहिल्यांदाच आदित्य ठाकरे यांचे नाव घेत मत व्यक्त केले.

माहिममधून उमेदवारी जाहीर झाल्यानंतर पत्रकारांशी बोलताना अमित ठाकरे यांनी मनमोकळेपणाने सर्व प्रश्नांची उत्तरे दिली. ते म्हणाले, जे काही २०१९ मध्ये झाले, जरी त्यांनी भाजपाची साथ सोडली, तरी ते सत्तेत बसले आणि मंत्रिपद मिळवले, आता पक्षाची तशी परिस्थिती नाही. त्यामुळे साहेबांनी तसा निर्णय घेणे आणि माझ्यावर विश्वास टाकणे ही माझ्यासाठी मोठी गोष्ट होती. मी दादर माहिम भागात लहानपणापासून वाढलो आहे, माझे आई-बाबा इथेच राहणारे आहेत. तीन पिढ्या आम्ही इथे जवळून ओळखतो. ऑफिसला मी चालत जातो. अनेक जण मला समस्या सांगतात, मी त्या सोडवतो. त्यामुळे इथल्या लोकांसोबत माझा कम्फर्ट झोन तयार झाला आहे. देवाने मला खूप काही दिले आहे, त्यामुळे मी काही मागायला जात नाही, असे अमित ठाकरे म्हणाले.



#### अर्धा समुद्र भावाच्या मतदारसंघात, स्वच्छ करणार का?

अमित ठाकरे यांनी समुद्र किनाऱ्यांच्या स्वच्छतेसाठी कायम विविध मोहिमा राबवल्या आहेत. अर्धा समुद्रकिनारा भाऊ आदित्य ठाकरेच्या मतदारसंघात येतो, असा प्रश्न पत्रकारांनी अमित ठाकरेंना विचारला. आदित्य ठाकरेंनी हो म्हटले तर, तो समुद्रकिनाराही स्वच्छ करून देऊ, अशी तत्काळ प्रतिक्रिया अमित ठाकरे यांनी दिली.

राज साहेब भूमिका ठामपणे घेतात, ती उपकाराची भावना नसते. त्यांची कधीही परतफेडी इच्छा नसते. ते नेहमी म्हणतात की हे राजकारण आहे, समोरचा माणूस कसा आहे, हे आपण ओळखायला हवे, लोकसभेला त्यांनी मोदींना पाठिंबा दिला. त्यांचे जवळचे मित्र असतील, राणे साहेब किंवा मोहोळ.. त्यांच्यासाठी त्यांनी प्रचार केला, सभा घेतल्या, पण त्यांनी परतफेड करावी ही सवयही नाही आणि इच्छाही नाही. तुमचे राजकारण तुम्ही करा, आमचे आम्ही करू, असे अमित ठाकरे यांनी स्पष्ट केले. *(वृत्तसंस्था)*

# हर्षवर्धन पाटील-दत्तामामा भरणे तिसऱ्यांदा येणार समोरासमोर

◆ **इंदापूर, २४ ऑक्टोबर**

राज्यात चर्चेत असणाऱ्या इंदापूर विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसने विद्यमान आमदार दत्तात्रय भरणे यांना संधी दिली आहे. त्यामुळे इंदापूरमध्ये तिसऱ्यांदा हर्षवर्धन पाटील विरुद्ध भरणे असा समान रंगणार आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ साठी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने आज आपली उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. या पहिल्या यादीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या बड्या नेत्यांचा समावेश आहे. यामध्ये धनंजय मुंडे यांना परळीतून, दिलीप वळसे पाटील यांना आंबेगावमधून, आशुतोष काळे यांना कोपरगावमधून उमेदवारी देण्यात आली आहे. अजित पवार हे बारामतीमधून, छगन भुजबळ हे येवलामधून, हसन मुश्रीफ हे कागलमधून निवडणुकीच्या रिंगणात राहणार आहेत.



विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर गेल्या काही दिवसांपासून महाविकास आघाडीत मोठे इनकमिंग सुरू आहे. अशातच काही दिवसांपूर्वी भाजपा नेते हर्षवर्धन पाटील यांनी शरद पवार गटात प्रवेश केला होता. हा भाजपासाठी धक्का मानला जात आहे. तुतारी हाती घेताच हर्षवर्धन पाटलांना शरद पवार गटाकडून मोठे गिफ्ट मिळाल्याचे दिसून येत आहे. कारण, शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी इंदापूरचे शिवधनुष्य हर्षवर्धन पाटील यांनी हाती घ्यावे, असे वक्तव्य केले होते. शरद पवार यांनी देखील हर्षवर्धन पाटील यांच्या उमेदवारीबाबत सुतोवाच केला आहे. त्यामुळे एकप्रकारे इंदापूर विधानसभा मतदारसंघातून हर्षवर्धन पाटील यांच्या उमेदवारीची घोषणा झाल्याची चर्चा होती. त्यामुळे या मतदारसंघात पुन्हा हर्षवर्धन पाटील विरुद्ध दत्तामामा भरणे असाच सामना रंगण्याची शक्यता आहे. *(वृत्तसंस्था)*

# निवडणुकीच्या रिंगणात नात्यांचे 'महाभारत'


### राज्यात आता रंगणार घराण्यांच्या लढती ● घर एक, पक्ष दोन

◆ **मुंबई, २४ ऑक्टोबर**

महाराष्ट्रात अनेक राजकीय घराण्यांमध्ये स्वकीय गोंधळ हा याशिवाय आणखीही काही मतदारसंघांत पाहायला मिळत आहे. वडील एका पक्षात, तर मुलगी दुसऱ्या पक्षात अशा लढतीही महाराष्ट्रात होऊ घातल्या आहेत. राजेंद्र शिंगणे हे शरद पवार गटातून, तर त्यांची पुतणी गायत्री शिंगणे या अजित पवार गटाकडून लढणार आहेत.

**बारामतीत पुन्हा काका-पुतणे**

बारामतीमध्ये अजित पवार विरुद्ध योगेंद्र पवार असा काका पुतण्याचा सामना रंगणार आहे.



राज्यातील या घराण्यामध्ये लढती लक्षवेधी ठरणार आहेत. धर्मरावबाबा आत्रामविरुद्ध भाग्यश्री आत्राम, जयदत्त क्षीरसागरविरुद्ध संदीप क्षीरसागर, नीलय नाईकविरुद्ध इंद्रनील नाईक, अशा राष्ट्रवादी काँग्रेस विरुद्ध राकाँ लढती महाराष्ट्रात लक्षवेधी ठरतील. महाराष्ट्रात एका बाजूला महाविकास आघाडी, मनसे तिसरी आघाडी, अशा पंचरंगी लढती असताना त्या अधिक लक्षवेधी ठरू लागल्या आहेत.

**राणे पिता-पुत्र महायुतीत, पण वेगवेगळ्या पक्षांत**

कोकणातील दिग्गज नेते एका पक्षात, त्यांची मुले दुसऱ्याच पक्षात असा नवा राजकीय ट्विस्ट पाहायला मिळत आहे.




नारायण राणे हे भाजपाचे नेते आहेत, तर त्यांचे चिरंजीव माजी खासदार डॉ. नीलेश राणे हे आता शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करीत आहेत.

दुसऱ्या बाजूला नवी मुंबईत गणेश नाईक यांना भाजपाने ऐरोली विधानसभा मतदारसंघात उमेदवारी जाहीर केली आहे. मात्र, त्यांचे चिरंजीव संदीप नाईक यांनी मंगळवारी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटात प्रवेश केला. ते बेलापूरमधून भाजपाच्या मंदा मात्रे यांच्या विरोधात निवडणूक लढवणार आहेत.

**तटकरे पिता-पुत्र**

तिसऱ्या बाजूला सुनील तटकरे यांचे पुत्र अनिकेत तटकरे पेण विधानसभेतून भाजपाच्या तिकिटावर निवडणूक लढवण्याची शक्यता आहे. सुनील तटकरे हे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष आहेत. एकंदरीत नव्या राजकीय समीकरणांमुळे मतदारही गोंधळलेल्या अवस्थेत आहेत.



**झिरवळ पिता-पुत्र**

राजकीय नेत्यांची दिशा वेगळी त्यांच्या मुलांची दिशा वेगळी, हे चित्र केवळ कोकणात आहे, असे नाही, तर उत्तर महाराष्ट्रात नरहरी झिरवाळ हे सध्या अजित पवार गटात आहेत, तर त्यांचे पुत्र गोकुळ झिरवाळ हे शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाऊन निवडणूक लढवणार आहेत. दिंडोरी मतदारसंघात वडील विरुद्ध मुलगा हा सामना पाहायला मिळणार आहे.



**खडसे घराण्याची स्थिती**

जळगावमध्ये एकनाथ खडसे हे कुठल्या पक्षात आहेत, याचा पत्ता अजून लागलेला नाही. ते भाजपामध्ये प्रवेश करणार होते; मात्र त्यांचा प्रवेश भाजपा गिरीश महाजन यांनी अडवला. त्यानंतर ते ना भाजपामध्ये ना शरद पवारांच्या गटात अशा अवस्थेत मध्येच थांबलेले आहेत. ते सध्या शरद पवार गटाकडून विधान परिषदेवर आमदार आहेत. त्यांची सून रक्षा खडसे भाजपाची खासदार असून, सध्या केंद्रीय मंत्रिपदावर आहे. त्यांची कन्या रोहिणी खडसे शरद पवारांच्या गटात आहे. *(वृत्तसंस्था)*



धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ४ विधानसभा मतदार संघात १२ नामांकन अर्ज दाखल

### ४९ व्यक्तींनी केली ८३ अर्जाची खरेदी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ ऑक्टोबर -**

जिल्ह्यातील ४ विधानसभा मतदारसंघात आज २४ ऑक्टोबर रोजी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या तिसऱ्या दिवशी ६ उमेदवारांनी १२ नामांकन अर्ज दाखल केले. तर ४९ अर्जदारांनी ८३ अर्ज खरेदी केले.

आज २४०- उमरगा विधानसभा मतदारसंघात दोन उमेदवारांनी नामांकन अर्ज दाखल केले. तर १० अर्जदारांनी १९ नामांकन अर्जाची खरेदी केली. २४१- तुळजापूर विधानसभा मतदारसंघात ३ उमेदवारांनी ५ अर्ज दाखल केले. यामध्ये भाजपच्या वतीने विद्यमान आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी एक अर्ज, काँग्रेसच्या वतीने माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांनी दोन अर्ज आणि बहूजन समाज पार्टीच्या वतीने तांबोळी यांनी एक अर्ज दाखल केला तर ९ इच्छुक उमेदवारांनी २१ अर्ज खरेदी केले. २४२- उस्मानाबाद विधानसभा मतदारसंघात बहुजन समाज पार्टीच्या वतीने सुभाष गायकवाड यांनी नामांकन अर्ज दाखल केला. तर २० अर्जदारांनी २६ अर्ज खरेदी केले आणि २४३ -परंडा विधानसभा मतदारसंघात पालकमंत्री प्रा.डॉ.तानाजीराव सावंत शिवसेना (शिंदे गट) यांनी दोन अर्ज दाखल केले. अपक्ष योगीराज तांबे आणि नाना मदने यांनी प्रत्येकी एक नामांकन अर्ज दाखल केले. १० व्यक्तींनी १७ अर्ज आज खरेदी केले.



## संक्षिप्त वृत्त...



### आमदार ज्ञानराज चौगुले यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**लोहारा, दि.२४ ऑक्टोबर -**

उमरगा लोहारा तालुक्याचे आमदार ज्ञानराज चौगुले यांना शिवसेना पक्षाच्या वतीने महायुतीकडून अधिकृत उमेदवारी जाहीर झाल्यानंतर गुरुवार दि.२४ ऑक्टोबर रोजी त्यांनी निवडणूक निर्णय अधिकारी, उमरगा यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे. यावेळी माजी खासदार प्रा. रविंद्र गायकवाड, ज्येष्ठ नेते जितेंद्र शिंदे, युवा सेना विभागीय निरीक्षक किरण गायकवाड, शिवसेना जिल्हाप्रमुख मोहन पणुरे, यांची उपस्थिती होती.



### भाजप जिल्हाध्यक्ष चालुक्य यांच्या हस्ते सोनटक्के यांचा सत्कार

**परंडा, दि.२४ ऑक्टोबर -**

भारतीय जनता पक्ष ओबीसी मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी भाजपाचे माजी तालुकाध्यक्ष दत्ताभाऊ सोनटक्के यांची निवड झाल्याबद्दल जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य यांच्या हस्ते सोनटक्के यांचा सत्कार करण्यात आला. सोनटक्के यांनी भारतीय जनता पार्टीचा कार्यकर्ता ते तालुकाध्यक्षपदापासून काम करीत पक्षाची ध्येयधोरणे व कार्य सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न केले आहेत. तसेच समाजकारण करताना अनेक गरजू निराधार यांची देखील कामे करून त्यांना शासकीय योजनेचा लाभ मिळवून दिला आहे. त्यांच्या कार्याची पक्षाने दखल घेऊन त्याची भारतीय जनता पक्ष ओबीसी प्रदेश उपाध्यक्षपदी निवड केली. त्याबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी बाळासाहेब शिरसागर, प्रदीप शिंदे, दत्ताभाऊ राजमाने, गुलचंद व्यवहारे, इंद्रजीत देवकते, ननवरे आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.



### धाराशिव जिल्हा वृत्तपत्र विक्रेता संघटनेची बैठक संपन्न

**धाराशिव, दि.२४ ऑक्टोबर -**

धाराशिव जिल्हा वृत्तपत्र विक्रेता संघटनेची बैठक बुधवार दि.२३ ऑक्टोबर रोजी धाराशिव येथे पार पडली. यावेळी बैठकीसाठी महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे कार्याध्यक्ष बालाजी पवार हे प्रमुख उपस्थित होते. बैठकीच्या सुरुवातीला जिल्हाध्यक्ष सुरज बागल यांनी नूतन सचिव म्हणून तानाजी घोडके उमरगा यांची निवड केली असल्याचे जाहीर केले. त्यानंतर संघटनेच्या आगामी काळातील रुपरेषा तसेच शासनाने स्थापन केलेल्या वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी मंडळच्या संदर्भात वृत्तपत्र विक्रेत्यांना मिळणारे लाभ यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी नांदेड जिल्हा कोषाध्यक्ष बाबू जलदेवार, लातूर जिल्हाध्यक्ष संगम खंदारे, धाराशिव जिल्हाध्यक्ष सुरज बागल, उपाध्यक्ष अरविंद शिंदे, सचिव तानाजी घोडके, कोषाध्यक्ष रामलिंग गाढवे, शोएब मोमीन, लहू पडवळ, अकबर शेख, गणेश भातुसे, दादासाहेब नन्नवरे, दिलीप जळके, रोहीत थोरवे, युवराज वटे, प्रदीप नागदे, विकास मदने, रमेश बसगुंडे, देवसिंग राजपूत, प्रकाश जोजन यांच्यासह जिल्ह्यातील वृत्तपत्र विक्रेते उपस्थित होते.



### ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाची उत्साहात सांगता

**नळदुर्ग, दि.२४ ऑक्टोबर -**

नळदुर्ग येथील व्यासनगर येथे दि.१८ ऑक्टोबर पासुन सुरु झालेल्या श्री ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरीनाम सप्ताह सोहळ्याची सांगता दि.२४ ऑक्टोबर रोजी मोठ्या उत्साहात व पालखी मिरवणुकीने झाली. सालाबादाप्रमाणे याहीवर्षी नळदुर्ग शहरातील व्यसनगर येथे माऊली महिला भजनी मंडळ, पारायण समिती, श्री विठ्ठल रुक्माई मंदिर व्यवस्थापक मंडळ व जय हिंद तरुण गणेश मंडळाच्या संयुक्त विद्यमाने दि.१८ ऑक्टोबर रोजी श्री ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरीनाम सप्ताह सोहळा सुरु करण्यात आला होता. हा सोहळा सात दिवस सुरु होता. या सात दिवसात याठिकाणी रात्रंदिवस भजन, कीर्तन, प्रवचन, भारूड यासह विविध कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडले. या कार्यक्रमामुळे व्यासनगर मधील वातावरण पुर्णपणे भक्तिमय झाले होते. या सर्व कार्यक्रमासाठी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. गेल्या ४५ वर्षांपासुन हा पारायण सोहळा याठिकाणी संपन्न होत आहे.

## मुरुम ठाणे हद्दीत कल्याण मुंबई मटका व जुगार अड्डे जोरात; कायदा, सुव्यवस्थेचे तीनतेरा

**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.२४ ऑक्टोबर -**

मुरूम पोलिस ठाणे हद्दीत कल्याण-मुंबई मटका मोठ्या प्रमाणात खेळविले जात आहे. तसेच क्लबच्या स्वरुपात पत्या कुटण्याचे जुगाराचे अड्डे देखील राजरोसपणे सुरु आहेत. नेमलेल्या ठरावीक फंटराकरवी हप्तेगिरी गोळा करून अश्या अवैद्य धंद्यांना पाठबळ कोण बरे देत असतील? याविषयी लोकांत शंका निर्माण होत असून उलट सुलट चर्चाही रंगत आहेत.



सध्या मुरूम परिसरातील सर्व स्तरावरील नागरिक, शालेय विद्यार्थीसह तरुण वर्ग मटका व जुगाराच्या जाळ्यात आडकले आहेत. त्यामुळे यात अनेक कुटुंबाचे वाताहत होत आहे. याचे वास्तव चित्र सहज पाहता येत आहे अश्या प्रकारामुळे कायदा आणि सुव्यवस्था धोक्यात आले आहे. परंतु या अवैध धंद्याकडे मुरूमचे पोलीस अधिकारी संदीपान दहीफळे दुर्लक्ष करत (का) असल्याने ऐन पोलिसांच्या कर्तव्यावरच नागरीक प्रश्न विचारत आहेत. विशेष म्हणजे असे प्रकार बिनधास्त सुरू असल्याने नागरिकात प्रचंड नाराजगी पसरली आहे निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर असे प्रकार राजरोसपणे सुरू असणे म्हणजे हे शांततेला धोका नाही का? याबद्दल चिंताही लोक करत आहेत.

मुरूम परिसरातील येणेगुर आष्टा कासार, आष्टामोड, दस्तापूर, भोसगा, दाळिंब, नाईकनगर, अचलेर, तुंगाव आदी गावांत व आदी ठिकाणी टपरी व दुकानात कल्याण मुंबई नावाचा मटक्याचे चार्ट लटकलेल्या स्थितीत सहज दिसून येतात यात जाळ्यात युवाकांचे प्रमाण अधिक आहे. लवकर पैसे मिळविण्याच्या नादात नागरिक मटक्याच्या आहारी गेले आहेत. तर मटका चालवणारे त्यास पाठबळ देणारे बक्कळ पैका मिळवत आहेत विशेष म्हणजे गावागावात मटका बुक्की घेण्यासाठी अनेकजण महिन्याकाठी चढाओढ करत असल्याचे बोलले जात आहे. यासोबतच मुरूम परिसरातील गावांत पत्यांचा जुगार राजरोसपणे खेळविला जात आहे. जुगार अड्ड्यावर हजारो रुपयांची उलाढाल असल्याची बातमी दररोज ऐकण्यासाठी मिळत आहे.

येवढ्या मोठ्या प्रमाणात व राजरोसपणे परिसरात मटका व जुगार खेळविला जात असताना पोलिसांचे मात्र याकडे दुर्लक्ष होत आहे. हे नवल आहे. दरम्यान अवैद्य धंदे बंद करावे यासाठी निवेदन देण्यात येणार आहे. याबद्दल लवकरच रितसर मार्गाने आवाज उठवण्यात येईल असे विविध सामाजिक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी तरुण भारतला बोलताना सांगितले आहेत.

## तानाजीराव सावंत यांचा उमेदवारी अर्ज दाखल



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२४ ऑक्टोबर -**

धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महाराष्ट्र राज्याचे आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तानाजीराव सावंत यांनी परांडा विधानसभेचा उमेदवारी अर्ज महायुतीकडून शिवसेना शिंदे गटाचे वतीने आज दि.२४ रोजी उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयात जाऊन दाखल केला.

यावेळी भाजपाचे सरचिटणीस सुजितसिंह ठाकूर, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नवनाथ जगताप, जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत, शिवसेना जिल्हाप्रमुख दत्ता साळुंखे, संघटक जयदेव गोफणे, संजय गाढवे, गौतम लटके आदींसह महायुती मधील भाजप राष्ट्रवादी अजित पवार गट व शिवसेना शिंदे गट यांचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. परंडा विधानसभा मतदारसंघात महायुतीकडून ही जागा शिवसेना शिंदे गटाला सोडण्यात आले आहे. सन २०१९ मध्ये शिवसेनेकडून ही जागा तानाजी सावंत यांनी लढवली होती आणि ते मोठ्या मताधिक्याने निवडून देखील आले होते. तीन वेळा आमदार राहीलेले राहुल मोटे यांचा त्यांनी पराभव केला होता.

सावंत यांना २०२४ च्या निवडणुकीत महाविकास आघाडी कडून प्रतिस्पर्धी कोण असणार हे काही तासात जाहीर होणार आहे.

सावंत हे शेतरस्ते, बोगद्यामधुन उजनीचे पाणी सिना कोळेगाव मध्ये आणणे, तिन्ही तालुक्यात एमआयडीसी मंजूर करणे, आरोग्य विषयक सुविधा, नवीन दवाखान्याच्या उभारण्या, शिवजल क्रांतीच्या माध्यमातून केलेली सिंचनाची कामे आशा प्रकारची अनेक कामाच्या माध्यमातुन सावंत रिंगणात उतरले आहेत. आता या स्पर्धेत कोण बाजी मारणार हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

## विधानसभेच्या रणधुमाळीला सुरुवात; ४० व्यक्तींनी घेतले ७८ अर्ज

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२४ ऑक्टोबर -**

विधानसभेची रणधुमाळी चांगलीच पेटली आहे. उमरगा विधानसभेसाठी इच्छुकांची संख्या बहुसंख्येने वाढली असून निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या निवडणुक कार्यक्रम अर्ज विक्रीच्या मंगळवारी दि.२२ रोजी पहिल्याच दिवशी उमरगा मतदार संघात १९ व्यक्तींनी ३५ अर्ज घेतले तर दुसऱ्या दिवशी बुधवारी दि.२४ रोजी ११ व्यक्तींनी २४ अर्ज घेतले तर तिसऱ्या दिवशी १० व्यक्तींनी १९ अर्ज घेतले. तीन दिवसांमध्ये उमरगा विधानसभेसाठी गुरुवार दुपारी चार वाजेपर्यंत ४० व्यक्तींनी घेतले ७८ अर्ज घेतले. तर ज्ञानराज धोंडीराम चौगुले, गुरुबसय्या निळकंठय्या स्वामी यांनी निवडणूक अधिकारी यांच्याकडे नामनिर्देशन दाखल केले. अशी माहिती निवडणूक अधिकारी तथा तहसीलदार गोविंद येरमे यांनी दिले.

२९ ऑक्टोबर ही अर्ज भरण्याची शेवटची तारीख असल्याने येणाऱ्या काही दिवसांत उमरगा तालुक्यातून किती इच्छुक उमेदवार अर्ज दाखल करणार याची उत्सुकता नागरिकांमध्ये निर्माण झाल्याचे दिसून येत आहे.

## भाजपा परंडा शहराध्यक्षपदी उमाकांत गोरे; 'भायुमो'च्या शहराध्यक्ष अविनाश विधाते यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२४ ऑक्टोबर -**

भारतीय जनता पार्टी, परंडा शहराध्यक्ष पदी उमाकांत गोरे आणि युवा मोर्चा शहराध्यक्षपदी अविनाश विधाते यांची निवड करण्यात आली. या निवडीचे पत्र भाजपा नेते मा.आ. सुजितसिंह ठाकूर यांच्या हस्ते देऊन त्यांचा भाजपा कार्यालयात सत्कार करण्यात आला.



यावेळी भाजपा जिल्हा सरचिटणीस विकास कुलकर्णी, प्र. कार्यकारिणी सदस्य ॲड. झहीर चौधरी, किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष ॲड. संतोष सुर्यवंशी, जिल्हा उपाध्यक्ष सुखदेव टोंपे, तालुकाध्यक्ष ॲड. गणेश खरसडे, युवा युवा मोर्चा तालुकाध्यक्ष अरविंद रगडे, जिल्हा चिटणीस सुजित परदेशी, तालुका उपाध्यक्ष बाबासाहेब जाधव, शिवाजी पाटील, तालुका सरचिटणीस तानाजी पाटील, धनाजी गायकवाड, किसान मोर्चा तालुकाध्यक्ष तुकाराम हजारे, साहेबराव पाडुळे, जिल्हा युवा मोर्चा उपाध्यक्ष सारंग घोगरे, श्रीमंत शेळके, धाराशिव जिल्हा युवा मोर्चा सरचिटणीस अनिल पाटील, तालुका चिटणीस रामकृष्ण घोडके, मिलिंद शिंदे, धनंजय काळे, मनोहर पवार, सुरज काळे, गौरव पाटील, आकाश मदने, अमर ठाकूर तसेच इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संत मिरा पब्लिक स्कूलचे जिल्हास्तरीय कराटेमध्ये सुयश



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२४ ऑक्टोबर -**

क्रीडा व युवा सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय क्रीडा स्पर्धा २०२४-२५ या जिल्हास्तरीय कराटे क्रीडा स्पर्धा दि.२३ ऑक्टोबर रोजी श्री तुळजाभवानी स्टेडियम धाराशिव या ठिकाणी पार पडल्या. या स्पर्धेमध्ये संत मिरा पब्लिक स्कूल, परंडा मधील १४ वर्ष व १७ वर्षीय अनुक्रमे मुली व मुलेमध्ये सिध्दी हरिदास भिल्लारे (६ वी), प्रतिक प्रकाश शिंदे (८ वी), ओम हरिदास भिल्लारे (१० वी) यांनी जिल्हास्तरावर प्रथम येण्याचा बहुमान मिळवला व यज्ञेश भांगे (१० वी) यांनी जिल्हास्तरावर द्वितीय क्रमांक मिळवला आहे. यांची नांदेड येथे होणाऱ्या विभागास्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. या विद्यार्थ्यांना कराटे ट्रेनर करणसिंह कंचे व भीमराज शिंदे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. यावेळी तायक्वादो जिल्हास्तरीय स्पर्धेत अनुकल्प खैरे (८ वी ) याने ३५ किलो वजनगटात द्वितीय क्रमांक पटकावल्याबद्दल व प्रणव करळे व ओम भिल्लारे यांनी विभागीय वुशू स्पर्धेत अनुक्रमे तृतीय व चतुर्थ क्रमांक मिळवल्याबद्दल सत्कार करण्यात आला. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा, क्रीडा शिक्षक पंकज रणदिवे व सुमित कोकाटे यांचा सन्मान शाळेच्या वतीने प्राचार्य संतोष भांडवलकर यांच्या हस्ते करण्यात आला.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थापक डॉ. प्रतापसिंह पाटील, उपाध्यक्ष डॉ. राहुल पाटील, सचिव डॉ. उदयसिंह पाटील व डॉ. शिल्पा पाटील यांनी अभिनंदन केले आहे.

## नळदुर्ग रोडवर अनोळखी इसमाचा मृतदेह आढळला

**तुळजापूर, दि.२४ ऑक्टोबर -**

नळदुर्ग रोडवरील रोहीत भोसले यांच्या गाळ्यात रामचंद्र लकुळ धोत्रे (वय अंदाजे ८५) हे रविवार दि.२० रोजी सकाळी मृतअवस्थेत आढळले सदरील व्यक्ती पन्नास वर्षापासुन तुळजापूर येथे राहत आहे.

त्याचा रंग सावळा, सडपातळ बांधा उंची, १६२ सेमी आहे. अंगावर लुंगी असुन दाढी आहे. तरी ज्यांचे सदरील मयत व्यक्ती नातेवाईक आहे, यांची ओळख पटवून त्यांनी तुळजापूर पोलिस स्टेशन येथे संपर्क साधावा, असे आवाहन पोलिस निरक्षक तुळजापूर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

## किसन गावडे यांची ५२ व्या वर्षी सरकारी नोकरीत समावेश

**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.२४ ऑक्टोबर -**

सलगरा मड्डी (ता. तुळजापूर) येथील सुपूत्र सध्या मुरुम येथे राहणारे किसन बिरु गावडे यांची आंबाजोगाई येथील पाटबंधारे विभागात तब्बल ५२ वर्षानंतर नुकतीच मोजणीदार या पदावर नियुक्ती झाल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.



त्यांची १ जानेवारी २०२४ मध्ये सरळसेवा परिक्षेत उत्तीर्ण होऊन पदवीधर अंशकालीन कोट्यातून मराठवाडा विभागातून एन.टी. (क) या प्रवर्गातून दुसऱ्या क्रमांकामध्ये निवड झाली. आतापर्यंत किसन गावडे यांनी अनेक वेळा परीक्षा दिली पण अपयश आले. शेवटी कठीण परिस्थितीतही संघर्ष करुन उमरगा, मुरूम व नळदुर्ग साखर कारखाना येथे विविध प्रकारची कष्टाची कामे केली. वयाच्या ५२ व्या वर्षी अखेर सरकारी नौकरी मोठ्या जिद्द, चिकाटीने घरीच अभ्यास करुन कुठलाही क्लास न लावता सरकारी नौकरी मिळविली.


या त्यांच्या यशाबद्दल प्रा.डॉ. महेश मोटे, आण्णासाहेब चव्हाण, काशीनाथ निर्मळे, दयानंद साखरे, अमोलराजे नागराळकर, अब्दुल मुजावर, प्रा. दत्ता लोभे, रविभाऊ सुरवसे, राजेंद्र सोनटक्के आदींनी त्यांचे विशेष कौतुक करुन अभिनंदन केले.

## नळदुर्ग शहरातील दोन मतदान केंद्रांची दुरावस्था; दुरुस्तीची मागणी

**तभा वृत्तसेवा / विलास येडगे**
**नळदुर्ग, दि.२४ ऑक्टोबर -**

नळदुर्ग शहरातील मराठा गल्ली येथे असणाऱ्या दोन मतदान केंद्राची मोठी दुरावस्था झाली आहे. या मतदान केंद्रावर जायला साधा व्यवस्थित रस्ता नाही त्याचबरोबर हे मतदान केंद्र झाडे, झुडपे आणि गवतांनी वेढले आहे. विधानसभा निवडणुकीच्या मतदानापुर्वी या मतदान केंद्राची दुरावस्था दुर करावी, अशी मागणी होत आहे.





विधानसभा निवडणुकीसाठी दि.२० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. या मतदानाला एक महिन्यापेक्षा कमी कालावधी उरला आहे. केंद्रीय निवडणुक आयोगाने महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करत असतांना मतदारांनी मतदान केंद्रावर जाऊन मोठ्या प्रमाणात मतदान करावे. त्याचबरोबर प्रत्येक मतदान केंद्रावर मतदारांना पिण्याचे पाणी, टॉयलेट यासह सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यास सांगितले आहे.

मात्र नळदुर्ग शहरातील मराठा गल्ली येथे असणाऱ्या दोन मतदान केंद्राची मोठी दुरावस्था झाली आहे.

त्यातल्या त्यात मराठा गल्ली येथील व्यायाम शाळेत असणाऱ्या मतदान केंद्राची मोठी दुरावस्था झाली आहे. या मतदान केंद्रावर मतदारांना जाण्यासाठी व्यवस्थित रस्ता नाही.

तसेच या मतदान केंद्राभोवती सर्वत्र झाडे, झुडपे आणि गवत मोठ्या प्रमाणात आले आहे. अशा परीस्थितीत या मतदान केंद्रावर जाऊन मतदार आपल्या मतदानाचा हक्क कसा बजाविणार हा एक प्रश्नच आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासन तसेच नगरपालिका प्रशासनाने तात्काळ या मतदान केंद्राची पाहणी करून या मतदान केंद्रापर्यंत मतदारांना जाण्यासाठी व्यवस्थित रस्ता तयार करून देण्याबरोबरच या मतदान केंद्राभोवती मोठ्या प्रमाणात असलेले झाडे, झुडपे व गवत काढुन मतदान केंद्र परीसर स्वच्छ करावे, अशी मागणी होत आहे.

या मतदान केंद्राची इतकी वाईट अवस्था झालेली असतांना प्रशासन मात्र याकडे पाहायला तयार नाही. विधानसभा निवडणुकीच्या मतदानाला अगदी कांही दिवस शिल्लक आहेत.

निवडणुक आयोग प्रत्येक मतदान केंद्रावर मतदारांसाठी सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यास सांगत असतांना या मतदान केंद्राची इतकी मोठी दुरावस्था का? असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांतून विचारला जात आहे.

## सहजीवनाची चटकदार 'पाणीपुरी' भेटीला

चित्रपटाचं लाजवाब कथानक हे त्याचं 'युएसपी' असतंच पण त्याच्या साथीला कलाकारांच्या नव्या जोड्या हा रंगतदार चौफेर विषय. आगामी 'पाणीपुरी' या मराठी चित्रपटात तब्बल एक नाही तर चार नव्या जोड्या प्रेक्षकांचं मनोरंजन करण्यासाठी येणार आहेत. वेगवेगळ्या कलाकृतीच्या माध्यमातून सातत्याने नवं करू पाहणारा अभिनेता कैलास वाघमारे त्याच्या जोडीला 'हास्यजत्रा' फेम अभिनेत्री शिवाली परब, आपल्या विनोदाच्या भन्नाट टायमिंगने रसिकांना खळखळून हसवणारे अभिनेते भारत गणेशपुरे-प्राजक्ता हनमघर, बिनधास्त आणि मिश्किल स्वभावाने आपली प्रत्येक भूमिका गाजवणारे ऋषिकेश जोशी त्यांच्या जोडीला ब्युटीफुल अभिनेत्री प्रतीक्षा जाधव सोबत सचिन बांगर-अनुष्का पिंपूटकर हे दोन नवे तरुण चेहरे यात धमाल करणार आहेत. या जोड्यांच्या सोबतीला अभिनेता मकरंद देशपांडे, सायली संजीव, विशाखा सुभेदार हे अनुभवी कलाकार कथेत जबरदस्त रंग भरणार आहेत. एस.के प्रॉडक्शन निर्मित आणि रमेश चौधरी यांचे लेखन-दिग्दर्शन असलेला 'पाणीपुरी' चित्रपट येत्या १५ नोव्हेंबरला चित्रपटगृहात दाखल होणार आहे. संजीवकुमार अग्रवाल या चित्रपटाचे निर्माते आहेत तर सहनिर्माते चंद्रकांत ठक्कर, अनिकेत अग्रवाल आहेत.

या चित्रपटाच्या निमित्ताने पहिल्यांदाच एकत्र काम करणाऱ्या या कलाकारांची पडद्यावरील नवी केमिस्ट्री प्रेक्षकांसाठी नक्कीच मनोरंजक ठरेल. 'पाणीपुरी' चित्रपटाचा मजेशीर टिझर नुकताच प्रदर्शित झाला. नर्म विनोदी, खेळकर पद्धतीने जीवनदर्शन घडवत या जोड्यांच्या प्रेमाची परिणीती, त्यांचा प्रवास भविष्यामध्ये कशाप्रकारे होतो याची गमतीशीर कथा म्हणजे 'पाणीपुरी' चित्रपट.

आयुष्याचा समतोल साधायचा असेल तर असे दोन परस्परविरुध्द, भिन्न स्वभावाची व्यक्तिमत्त्वं एकत्र असणं ही देखील सहजीवनाची गरज असते. सहजीवनाची ही गंमत उलगडणारा 'लज्जतदार नात्यांची चटकदार गोष्ट' सांगणारा 'पाणीपुरी' चित्रपट आपलं मनोरंजन नक्की करणार आहे. चित्रपटाचे छायांकन आणि संकलन सिद्धेश संतोष मोरे यांचे आहे. पटकथा-संवाद संजय नवगिरे यांनी लिहिले आहेत. संगीत अजित परब तर पार्श्वसंगीत अमर मोहिले यांचे आहे. गीतकार मंदार चोळकर यांच्या गीतांना गायक मंदार आपटे, अजित परब यांचे स्वर लाभले आहेत.

## इंडियन आयडॉल मध्ये बादशाहने अविवाहित राहण्याची शपथ का घेतली?

छत्रपती संभाजीनगर - देशाचा लाडका गायन रियालिटी शो इंडियन आयडॉलचा १५वा सीझन सोनी एन्टरटेन्मेंट टेलिव्हिजनवर २६ ऑक्टोबर रोजी रात्री ९ वाजता सुरू होत आहे. या सीझनच्या ऑडिशनपासूनच या सीझनबद्दलच्या चर्चेने वेग पकडला आहे. सृजन पोरैल एक जबरदस्त परफॉर्मर आहे, पण इकडे तो फक्त आपली प्रतिभा प्रदर्शित करण्यासाठी आलेला नाही, तर एका मिशनवर आला आहे! सृजनने अत्यंत आत्मविश्वासाने, ठामपणे जाहीर केले, प्रेमसंबंध वाट बघू शकतात, माझे करियर नाही!

सृजनने 'लाइफ इन अ मेट्रो' चित्रपटातील 'अलविदा' गाणे इतके काही आवेगाने म्हटले की, सर्व परीक्षक अगदी मंत्रमुग्ध होऊन गेले. त्याच्या परफॉर्मन्सला त्याच्या एका अनुभवाची देखील जोड होती. पूर्वी आपला प्रेम-संबंध होता, पण ते नाते फिस्कटले असे त्याने सांगितले. तो गंमतीने म्हणाला, रिलेशनशिपपेक्षा ती इंटर्नशिपच होती आणि त्याचा स्टायपेन्ड होता 'धोका; त्याने सांगितले आपल्या प्रेमभंगाच्या दुःखातून प्रेरणा घेऊन त्याने स्वतःची 'छऋऌ- नॉन-गर्लफ्रेंड ऑर्गनाइझेशन' कशी सुरू केली आणि आपल्या मित्रांना त्यात सामील व्हायला सांगितले.

या छऋऌ ची एक प्रतिज्ञा होती, जी सृजनने म्हणून दाखवली. मी, सृजन परैल, अशी शपथ घेतो की, आजपासून कोणत्याही रिलेशनशिप किंवा प्रेमा-बिमाच्या फंदात मी पडणार नाही आणि माझ्यासोबत माझ्या मित्रांनाही त्याच्या पासून दूर ठेवेन. आमचे एकच काम असेल, आपल्या कारकीर्दीवर फोकस करणे, त्या व्यतिरिक्त काहीही नाही. त्याचे बोलणे ऐकून प्रभावित झालेल्या बादशाहने तर तत्काळ जाहीर करून टाकले, तथास्तु! आणि मी देखील तुझ्या सोबत आहे. त्यानेही अविवाहित राहून आपल्या कामाप्रति समर्पित राहण्याची शपथ घेतली. बादशाहच्या हातावरील टॅटू पाहून जेव्हा सृजनने टिप्पणी केली, तेव्हा बादशाह आपल्या शायराना ढंगात म्हणाला, याद नहीं शरम तो आती होगी, झूठी ही सही कसम तो खाती होगी.. माझीही छऋऌ आहे, पण त्या छऋऌ मध्ये मी एकटाच आहे. पण, एक मुख्य प्रश्न हा राहतोच की, सृजनचा हृदयस्पर्शी आणि वेधक परफॉर्मन्स त्याला पुढच्या फेरीत घेऊन जाणार का? होतकरू गायक आणि अफाट लोकप्रियता यांच्यातील अंतर दूर करण्यासाठी येत आहे इंडियन आयडॉल, २६ ऑक्टोबरपासून, आणि दर शनिवारी-रविवारी रात्री ९ वाजता त्याचे प्रसारण करण्यात येईल.

## पुंडलिक नगरातील संविधान रॅलीला उस्फूर्त प्रतिसाद

छत्रपती संभाजीनगर : धम्मचक्र परिवर्तन दिनानिमित्त भारतीय दलित कोब्रा संघटनेच्या वतीने मंगळवारी रात्री पुंडलिकनगर येथील शिवाजी महाराज यांचा पुतळा ते गजानन महाराज मंदिर चौकपर्यंत संविधान रॅली काढण्यात आली. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास भारतीय दलित कोब्रा संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष अशोक दादा बोर्डे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर या रॅलीस सुरुवात झाली. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांचा विजय असो, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो, संविधानाचा विजय असो अशा जोरदार घोषणा कार्यकर्त्यांनी दिल्या. या रॅलीचा समारोप गजानन महाराज चौकात झाला. यावेळी बोलताना अशोक बोर्डे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी हे हर घर संविधान अभियान राबवले असे सांगतात. परंतु कुणाच्याही घरी संविधान पोहोचले नाही. त्यामुळेच संघटनेला संविधान रॅली काढावी लागली. बौद्ध समाज समाजातील सर्व घटकांना आपल्यात सामावून घेतो. जो उमेदवार संविधानाला सर्वोच्च मानून पुढील वाटचाल करेल असे वचन देईल आणि जात वर्गीकरणाच्या विरोधात उभा राहील. तसे आपल्या जाहीरनाम्यात उल्लेख करतील त्या उमेदवाराला भारतीय दलित कोब्रा संघटनेचे कार्यकर्ते पदाधिकारी मतदान करण्याचा विचार करतील असेही बोर्डे यावेळी म्हणाले. या रॅलीमध्ये युवा नेता आनंद बोर्डे, सागर बोर्डे, जितेंद्र कुंटे, निलेश गायकवाड, विनोद गडकर, जयश्री मुदीराज, उषा वैष्णव, आशा पवार, दीपा करणवार, मेघा नाटेकर, संध्या साठे, स्वाती पाटील, गावंडे, गायकवाड यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.



### लक्ष्मीबाई बाळा पवार

तभा.वृत्तसेवा

चिंचोली(लिंबाजी) : येथील लक्ष्मीबाई बाळा पवार(६८)यांचे गुरूवारी सकाळी आठ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांच्यावर येथील स्मशानभूमीत दुपारच्या सुमारास अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पती,पाच मुले,दोन मुली,सुना,जावाई,नातवंडे असा परिवार आहे.सामाजिक कार्यकर्ते विनायक पवार यांच्या त्या आई होत.



### विष्णू सोहनी यांचे निधन

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२४ ऑक्टोबर

शिवाजीनगर-आमराई येथील रहिवाशी विष्णू काशिनाथ सोहनी (वय.६८) यांचे गुरुवार रोजी सकाळी ९:१५ वा. हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर गुरुवारी दुपारी ३:०० वा.सोयगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात,पत्नी,दोन मुले,दोन मुली,सुना,नातवंडे,असा परिवार आहे.ते कृषीभूषण अरुण सोहणी व मंगेश सोहनी यांचे आजोबा होत.



### माधव सरोदे यांचे निधन

सोयगाव,दि.२४ ऑक्टोबर

तालुक्यातील जरंडी येथील माधव नारायण सरोदे (वय. ६७)यांचे बुधवारी सकाळी ७ वा.निधन झाले.त्यांचेवर दुपारी-तीन वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पत्नी,एक मुलगा,दोन मुली,सुन,नातवंडे असा परिवार आहे.

# मसालाकिंग धनंजय दातार यांच्यातर्फे फुफ्फुस विकारग्रस्तांना प्राणवायू उपकरण संचांची भेट

छत्रपती संभाजीनगर , २४ ऑक्टोबर २०२४ : करोनाची प्राणघातक साथ मानवजातीला खूप काही शिकवून गेलीय. शरीराचे तापमान, रक्तदाब, रक्तशर्करेचे प्रमाण, हृदयाचे ठोके याप्रमाणेच आजकाल श्वासोच्छवासातील प्राणवायूच्या (ऑक्सिजन) पातळीवरही काटेकोर लक्ष ठेवणे गरजेचे बनले आहे. फुफ्फुसांच्या आजारांनी दुर्बळ रुग्णांसाठी शुद्ध प्राणवायूचा तत्काळ पुरवठा अत्यंत मोलाचा ठरत आहे आणि एका श्वासाची किंमत जगाला आता उमगू लागली आहे.

'प्रतिभा प्रभाकर पल्मोनरी रिहॅबिलीटेशन सेंटर'च्या वतीने श्वसन संस्थेचे आरोग्य आणि प्राणवायूचे महत्त्व अधोरेखित करणारा एक कार्यक्रम नुकताच गोरेगावमध्ये आयोजित करण्यात आला. समाजोपयोगी उपक्रमांना मदतीचा हात देणारे सुप्रसिद्ध उद्योजक मसालाकिंग



धनंजय दातार या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते. फुफ्फुसाच्या विकाराने ग्रस्त, परंतु आर्थिक असहाय्यतेमुळे प्राणवायू पुरवठा उपकरणे खरेदी न करु शकणाऱ्या ३ गरजू रुग्णांना दातार यांनी स्वखर्चाने असे उपकरण संच भेट दिले. प्रत्येक संचात घरात हवा तेव्हा प्राणवायू पुरवठा करणारे ऑक्सिजन कॉन्संट्रेटर, घराबाहेर किंवा प्रवासात प्राणवायू पुरवणारे पोर्टेबल ऑक्सिजन मशीन व ऑक्सिमीटर या उपकरणांचा समावेश होता.

याप्रसंगी बोलताना धनंजय दातार म्हणाले, माझ्या आईच्या अखेरच्या दिवसांत ती फुफ्फुसाच्या आजाराने गलितगात्र झाली होती. श्वासोच्छवासासाठीची तिची धडपड मला बघवत नव्हती. आजही अशा आजारांनी ग्रस्त गरीब रुग्णांचे हाल मला अस्वस्थ करतात. करोना साथीच्या काळात तत्काळ प्राणवायू न मिळाल्याने अथवा वाहनाच्या अनुपलब्धतेमुळे रुग्णालयात वेळेवर पोचू न शकल्याने अनेक रुग्ण दगावले. त्यावर उपाय म्हणून मी व माझ्या समूहाने ऑक्सिजन सिलेंडरने सज्ज 'रिक्षा म्ब्युलन्स' या अभिनव उपक्रमाला आर्थिक पाठबळ पुरवले. गेल्या वर्षी आणि यंदाही पैशाअभावी प्राणवायू उपकरणे खरेदी करु न शकणाऱ्या रुग्णांना आम्ही प्राणवायू संच भेट दिले आहेत आणि यापुढेही गरीब गरजूंना अशीच मदत करत राहणार आहोत.

फुफ्फुसाच्या आजारांनी ग्रस्त रुग्णांच्या पुनर्वसन कार्याचा दीर्घ अनुभव असणाऱ्या डॉ. पूर्वी देवानी यांनी सूत्रसंचालन केले. प्रास्ताविकात त्या म्हणाल्या, सकारात्मक दृष्टीकोण, योग्य उपचार, नियमित व्यायाम या जोरावर फुफ्फुसाच्या आजारांचे रुग्ण सर्वसाधारण आयुष्य जगू शकतात. आम्ही अशा रुग्णांचे समुपदेशन तथा यशस्वी पुनर्वसन करुन त्यांना आनंदी जीवन जगायला शिकवतो.

'प्रतिभा प्रभाकर पल्मोनरी रिहॅबिलीटेशन सेंटर'चे संस्थापक चालक डॉ. प्रल्हाद प्रभुदेसाई व त्यांच्या पत्नी वैशाली प्रभुदेसाई यांनी यावेळी संस्थेच्या कार्याची माहिती दिली. डॉ. प्रभुदेसाई म्हणाले, आयुष्य आरोग्यपूर्ण घालवणे महत्त्वाचे असते आणि त्यासाठीच सर्वांनी आरोग्य, योग्य जीवनशैली व श्वासाचे महत्त्व ओळखणे गरजेचे आहे.

## सोयगावात रूट मार्च;-विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोयगाव पोलीस अलर्ट

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२४ ऑक्टोबर

सोयगाव शहरासह हद्दीतील आमखेडा,गलवाडा आदी गावात बुधवारी दुपारी दोन वाजता सीमा सुरक्षादलाच्या जवानांसह सोयगाव पोलीसांनी रूट मार्च केला दरम्यान शहरात निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी पोलीसांनी खबरदारी घेतली आहे. त्यासाठी सोयगाव पोलीस अलर्ट झाले आहे.



शहरातील जुना बाजार चौक,सोनार गल्ली,छत्रपती शिवाजी महाराज चौक,बस स्थानक,रामजीनगर,आमराई,आमखेडा, गलवाडा,या परिसरात बुधवारी दुपारी दोन वाजता रूट मार्च हाती घेण्यात आला.सोयगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल यांच्या नेतृत्वाखाली सीमा सुरक्षा दलाच्या एका तुकडी सह सोयगाव पोलीसांनी हा रूट मार्च केला.यावेळी शहरात शांतता पसरली होती दरम्यान आचारसंहितेच्या कालावधीत कोणताही गैरप्रकार होवू नये त्यासाठी सोयगाव पोलीस अलर्ट झाले आहे. सोयगाव सह तालुक्यात निवडणुका शांततेत व्हाव्यात यासाठी हा रूट मार्च घेण्यात आला आहे.यावेळी सीमा सुरक्षा दल (इडऋ) अधिकारी सह पोलीस उपनिरीक्षक रज्जाक शेख,नारायण जिरी,दिलीप पवार,रवींद्र तायडे,गजानन दांडगे,अजय कोळी,रवींद्र सोनवणे,प्रवीण देवरे,श्रीकांत तळेगाव होते.

## विद्यार्थ्यांनी दिली महावितरण कंपनीला भेट

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.२३ ऑक्टोबर -शहरातील श्री महालक्ष्मी माता बहुउद्देशीय संस्था संचालित ज्ञानदा कौशल्य विकास संस्थेच्या विद्यार्थ्यांनी महावितरणला दि.२३ बुधवार रोजी शैक्षणिक भेट दिली आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी येथे ३३ के. वी.उपकेंद्र येथे भेट देऊन कामकाजाची माहिती घेतली, डिप्लोमा कोर्स इन इलेक्ट्रिशियन या कोर्सेला प्रवेश घेतलेल्या



विद्यार्थ्यांना सर्किट प्रमाणे ले आउट बाबत प्रत्यक्ष मार्गदर्शन करण्यात आले तर ११ के.वी.विद्युत प्रवाह कसा पाठवला जातो अशा अनेक बाबी विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले आहे. यावेळी कार्यकारी अभियंता वाघचौरे, उपकार्यकरी अभियंता खिल्लारे, शहर अभियंता पी.पी.शेट्टी प्राचार्या अमृता इंगळे,उपप्राचार्य सचिन पिंपळे ,आदी उपस्थित होते.

## 'ग्रेट इंडिया हेल्थकेअर लीडर्स समिट आणि अवॉर्ड्स'मध्ये डॉ. जॉर्ज नोएल फर्नांडिस यांचा तिहेरी सन्मान

छत्रपती संभाजीनगर- प्रसिद्ध हेल्थकेअर लीडर्स 'ग्रेट इंडिया हेल्थकेअर लीडर्स समिट आणि अवॉर्ड्स २०२४' सोहळ्यात कमलनयन बजाज हॉस्पिटल आणि नर्सिंग कॉलेजचे सीईओ डॉ. जॉर्ज नोएल फर्नांडिस यांना वेगवेगळ्या कॅटगिरीत तीन पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. सत्तर आरोग्य सेवा देणाऱ्या नामांकित संस्था आणि दीडशेहून अधिक आरोग्य सेवा क्षेत्रातील व्यावसायिकांच्या उपस्थितीत हा पुरस्कार वितरण सोहळा रंगला.

मुंबईतील रेडिसन ब्लू हॉटेलमध्ये (१७ ऑक्टोबर) प्रतिष्ठित असा 'ग्रेट इंडिया हेल्थकेअर लीडर्स समिट आणि अवॉर्ड्स २०२४' या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये कमलनयन बजाज हॉस्पिटल आणि नर्सिंग कॉलेजचे सीईओ डॉ. जॉर्ज नोएल फर्नांडिस यांना 'द ग्रेट इंडियन हेल्थकेअर व्हिजनरीज- हॉल ऑफ फेम', 'द ग्रेट इंडियन हेल्थकेअर लीडर्स' व 'द ग्रेट हेल्थकेअर लीडर्स' या पुरस्कारांना मान्यवरांच्या हस्ते गौरवण्यात आले. शानदार अशा या सोहळ्यात मान्यवरांनी डॉ. जॉर्ज नोएल फर्नांडिस यांचे कौतुक केले.

डॉ. जॉर्ज नोएल फर्नांडिस यांना त्यांच्या दूरदर्शी नेतृत्वासाठी आणि आरोग्य सेवा व्यवस्थापनातील उत्कृष्ट योगदानाबद्दल आणि उज्वल भविष्याची प्रेरणा देण्यासाठी 'द ग्रेट इंडियन हेल्थकेअर व्हिजनरीज-हॉल ऑफ फेम' पुरस्कार प्रदान करण्यात आला. शाश्वत आणि स्थायी हेल्थकेअर सिस्टीम तयार करण्यासाठी सीईओंच्या व्हिजनवर ज्ञानाची देवाण-घेवाण केल्याबद्दल 'द ग्रेट इंडियन हेल्थकेअर लीडर्स' हा पुरस्कार देण्यात आला. शिवाय सातत्याने ज्ञानार्जन करत विकास साधल्याबद्दल 'द ग्रेट हेल्थकेअर लीडर्स' या अत्यंत मानाच्या पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी टाळ्यांच्या माध्यमातून डॉ. जॉर्ज नोएल फर्नांडिस यांच्या कार्याचा गौरव केला.

'ग्रेट इंडिया हेल्थकेअर लीडर्स समिट आणि अवॉर्ड्स २०२४' सोहळ्यावेळी संपूर्ण भारतातील सत्तरहून अधिक आरोग्य सेवा प्रदाते आणि दीडशेहून अधिक आघाडीच्या आरोग्यसेवा व्यावसायिकांची उपस्थिती होती. हा प्रतिष्ठित कार्यक्रम आरोग्यसेवा नेतृत्व, नाविन्य आणि उत्कृष्टता यामधील उत्कृष्ट कामगिरीचा उत्सव ठरला.

तिहेरी पुरस्कार प्रेरणादायी ठरणार

'ग्रेट इंडिया हेल्थकेअर लीडर्स समिट आणि अवॉर्ड्स २०२४' सोहळ्यात तिहेरी पुरस्कारांनी मला सन्मानित करण्यात आल्याचा नक्कीच आनंद आहे. हे यश आमच्या कार्यसंघाच्या अथक प्रयत्नांचा आणि सकारात्मक अशा आरोग्य सेवा देण्याच्या आमच्या वचनबद्धतेचा पुरावा आहे. या मान्यतेबद्दल मी कृतज्ञ आहे आणि आगामी काळात आरोग्य सेवेमध्ये अधिक सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहणार आहोत, अशी प्रतिक्रिया कमलनयन बजाज हॉस्पिटल आणि नर्सिंग कॉलेजचे सीईओ डॉ. जॉर्ज नोएल फर्नांडिस यांनी दिली.

## श्री ज्ञानदेवांचे साहित्य हे वारकऱ्यांची सर्वांगिण शक्ती होय - ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड

मंठा-जगाला ज्ञानाचा प्रकाश देणारी श्री ज्ञानेश्वर माऊलींची ज्ञानेश्वरी, हरिपाठ, अमृतानुभव, अभंगगाथा, चांगदेव पासष्टी हे साहित्य म्हणजे प्रत्यक्ष ज्ञानेश्वर माऊलींच आहेत, असे वारकरी मानत असल्याने व हे सत्य असल्याने ज्ञानदेवांचे साहित्य ही वारकऱ्यांची खरी शक्ती होय. म्हणून वारकरी खऱ्या अर्थाने सर्वांगाने बलवान असतात, असे प्रतिपादन ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड यांनी केले.

पाडोळी या गावातील धार्मिक सप्ताह सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात फड कीर्तन प्रसंगी बोलत होते. ज्ञानदेवांना सद्गुरू या नात्याने निवृत्तीनाथांनी ज्ञानाचा अथांग सागर सर्वांसाठी



खुला करण्यास परवानगी देऊन समाजावर फार मोठे उपकार केले आहेत. या उपकाराची परतफेड म्हणून का होईना, भाविकांनी श्रीज्ञानेश्वरी, चांगदेव पासष्टी, हरिपाठ, माऊलींचे स्फुट अभंग, अमृतानुभव प्रत्यक्ष आचरणात आणले पाहिजेत. बंधू भगीणीवर कसे प्रेम करावे, त्यांना कसे घडवावे, अभ्यास कसा करावा, आचरण कसे ठेवावे, सामाजिक ऋणांची परतफेड कशी करावी, वडिलधाऱ्यांचा आदर कसा करावा, नैतिक मूल्यांची जोपासणा कशी करावी हे श्री निवृत्तीनाथ व ज्ञानदेवांकडून शिकण्यासारखे आहे. ईर्षा, व्देष, मत्सर, क्रोध, अहंकार आदी विकारांनी भरलेल्या संसारामध्ये खऱ्या अर्थाने विश्रांती, आनंद व समाधान मिळवायचे असेल तर ज्ञानदेवांचे साहित्य वाचण्याची व आचरणात आणण्याची गरज आहे, असे ते महणाले. ज्ञानदेवांचे साहित्य वाचणाऱ्याच व त्याप्रमाणे आचरण करणाऱ्यांस आनंद वेगळयाने शोधावा लागत नाही, असेही फड म्हणाले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गायनाचार्य रमेश केसकर, रामराव पुणेकर, बाबासाहेब पुणेकर, ज्ञानोबा केसकर, दिनकर पुणेकर, बाच्चेराव घोरसड, भगवान नाना आदींनी पुढाकार घेतला होता. डॉ. फड यांचे कीर्तन आमच्या डोळयात अंजन घालणारे झाले तसेच तरुणांना दिशादर्शक झाले असे संयोजकांनी बोलून दाखवले. ज्ञानदास फड हे मानधन घेत नसल्याने उपस्थित भाविकांनी त्यांचे टाळया वाजवून आभार मानले.

## बजाजनगरातील जुगारावर सायबर क्राईमचा छापा; ९.३६ लाखांचा ऐवज जप्त

वाळूज महानगर (प्रतिनिधी) : बजाजनगरातील बजाजनगरातील सुरभी हॉटेलच्या टेरेसवर सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर सायबर क्राईमच्या पथकाने बुधवारी छापा मारून ११ जुगाऱ्यांकडून ९ लाख ३६ हजार १६० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला.

हॉटेल सुरभीच्या टेरेसवर दीपक संतराम सवई (३६, रा. रांजणगाव) हा जुगार अड्डा चालवत असल्याची माहिती पोलिसांना खबऱ्यामार्फत मिळाली. या माहितीवरून स्थानिक पोलिसांच्या मदतीने पोलिसांनी छापा मारला असता, टेरेसवर तयार केलेल्या पत्र्याच्या शेडमध्ये ११ जुगारी तीन पत्ती नावाचा जुगार खेळताना आढळले.

यामध्ये दीपक संतराम सवई (३६, रा. गट नं. ३०, रांजणगाव), संतोष गोरखनाथ जोजारे (३३, रा. मंगलमूर्ती कॉलनी), विठ्ठल प्रल्हाद रोडे (५०, रा. गंगा कॉलनी), अनिल पंडित मेश्राम (४५, रा. इंद्रप्रस्थ कॉलनी), राजू रामदास गायकवाड (४४, रा. गाडेकरनगर), शिवाजी वामनराव कांबळे (३८, रा. मगलमुर्ती कॉलनी), अमोल भानुदास शेळके (३२, रा. दत्तनगर), माधव धोंडजी कावरखे (४८, रा. शिवनेरी कॉलनी), मनोज हरिभाऊ चव्हाण (३८ रा. शिवराणा कॉलनी), सुभाष वामन कांबळे (५३, रा. मगलमूर्ती कॉलनी) आणि सुभाष दौलतराव ठोसे (५१, रा. बजाजनगर) हे जुगार खेळतांना आढळून आले. या प्रकरणी एमआयडीसी वाळूज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# 'नाद - द हार्ड लव्ह' २५ ऑक्टोबरला प्रेक्षकांच्या भेटीला

छत्रपती संभाजीनगर - २५ ऑक्टोबरला एक धडाकेबाज रोमँटिक ॲक्शनपट मराठी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'नाद - द हार्ड लव्ह' हा प्रेमाची नवी व्याख्या सांगणारा चित्रपट खऱ्या अर्थाने मराठी चित्रपटांच्या कक्षा रुंदावणारा ठरणार आहे. 'नाद - द हार्ड लव्ह'च्या रूपात दर्जेदार निर्मितीमूल्ये असलेला संगीतप्रधान रोमँटिक चित्रपट प्रदर्शित होणार आहे. 'देवमाणूस' या मालिकेद्वारे महाराष्ट्राच्या घरोघरी लोकप्रिय झालेला अभिनेता किरण गायकवाड या चित्रपटात मुख्य भूमिकेत दिसणार असून, त्याचे एक वेगळेच रूप यात आहे.

टिझर आणि ट्रेलरला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्यानंतर निर्माते संजय पगारे आणि रुपेश दिनकर यांनी शकुंतला क्रिएशन प्रोडक्शन आणि जिजाऊ क्रिएशन मेकरच्या बॅनरखाली बनवलेला 'नाद - द हार्ड लव्ह' चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. रुपाली दिपक पवार आणि वैशाली नितीन पवार या चित्रपटाचे निर्मिती व्यवस्थापक आहेत. दिग्दर्शनाची धुरा प्रकाश जनार्दन पवार यांनी सांभाळली आहे. आपल्या कल्पक दिग्दर्शन शैलीद्वारे पवार यांनी 'नाद'मध्ये एक अनोखी प्रेमकहाणी सादर केली आहे. या चित्रपटात उदय आणि शुभ्रा यांची प्रेमकहाणी पाहायला मिळेल. या चित्रपटातील अजिंक्य ही आणखी एक महत्त्वाची व्यक्तिरेखा आहे. 'नाद' हा म्हणजे दोन प्रेमी जीवांची आवड पूर्ण करण्याचा प्रवास आहे. या चित्रपटात जरी आजवर कधीही न पाहिलेली लाल मातीतील ॲक्शनदृश्ये पाहायला मिळतील. सकस कथानकाला मुद्देसूद कथानकाची जोड आणि सहजसुंदर अभिनयाच्या साथीने सादर केलेली प्रेमकथा हे 'नाद'चं वैशिष्ट्य आहे. या चित्रपटामध्ये दोन रोमँटिक, एक सॅड आणि एक धमाल नाचो गीत अशी एकूण चार गाणी आहेत. मराठी सिनेसृष्टीतील आजचे आघाडीचे संगीतकार पंकज पडघन यांनी गीतकार वैभव देशमुख आणि विनायक पवार यांनी लिहिलेल्या गीतांना संगीतसाज चढवला आहे. 'डोळ्यांत तूच आहे...', 'तुझ्यामुळे जिंदगी सपान वाटते रे...', 'नादखुळा डान्स करा रे...' आणि 'जीवाचे हाल...' ही चारही गाणी चित्रपटामध्ये वेगवेगळ्या प्रसंगी येतात आणि मनाला भुरळ घालतात. अर्थपूर्ण शब्दांना सुरेल संगीताची जोड हे या गाण्यांचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. नयनरम्य लोकेशन्सवर चित्रीकरण करण्यात आल्याने पडद्यावर चित्र पाहताना ते सुखावह वाटेल.

किरण गायकवाडची मुख्य भूमिकेसाठी करण्यात आलेली निवड आणि त्याची सपना माने या नवोदित अभिनेत्रीसोबत जमलेली जोडी चित्रपटाचे मुख्य आकर्षण ठरणार आहे. किरण गायकवाडसाठी हा चित्रपट इमेज ब्रेकिंग ठरणारा असून, त्याने आपल्या व्यक्तिरेखेसाठी खूप मेहनत घेतल्याचे दिग्दर्शक जनार्दन पवार म्हणाले. ते म्हणाले की, चित्रपटातील व्यक्तिरेखांसाठी अचूक कलाकारांची निवड करण्यात आली आहे. किरणसारखा तगडा अभिनेता मुख्य भूमिकेत असल्याने 'नाद' एका वेगळ्याच उंचीवर पोहोचला आहे. त्याला सपनाची सुरेख साथ लाभली आहे. इतर कलाकारांनी आपापल्या व्यक्तिरेखांना न्याय देण्यासाठी खूप मेहनत घेतली आहे. यातील गाणी संगीतप्रेमींच्या ओठांवर रुंजी घालणारी असून, चित्रपटगृहातून बाहेर पडणारे प्रेक्षकांच्या चेहऱ्यावर एक परिपूर्ण कलाकृती पाहिल्याचा आनंद पाहायला मिळेल अशी आशाही पवार यांनी व्यक्त केली आहे.

संतोष दाभोळकर आणि दिपक पवार यांनी या चित्रपटाची कथा लिहिली असून, पटकथा व संवादलेखन डॉ. विनायक पवार यांनी केलं आहे. किरण गायकवाड आणि सपना माने यांच्यासह यशराज डिंबळे, तानाजी गालगुंडे, किरण माने, विजय पाटकर, जयवंत वाडकर, कमलेश सावंत, टिशा संजय पगारे, सूरज पवार, विनायक पवार, श्रीकांत गायकवाड, गणेश पदमाळे, आशिष वारंग, ईश्वर सातलिंग बोरामणी आदी कलाकारांच्याही या चित्रपटात महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. कला दिग्दर्शन सतीश चिपकर यांनी केले असून, डिओपी अमित सिंह यांनी सिनेमॅटोग्राफी केली आहे. कोरिओग्राफी सिद्धेश दळवीने केली असून, वेशभूषा निगार शेख यांची आहे. रमेश शेट्टी या चित्रपटाचे कास्टिंग डायरेक्टर असून आमिरा शेख क्रिएटिव्ह हेड आहेत. लाइन प्रोड्युसर संकेत चव्हाण असून, सुजित मुकटे कार्यकारी निर्माते आहेत.